Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

प्र(क)

कीचक-वध

बी०
२०८

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

॥ श्री ॥

कीचक--वध

हें नाटक

श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

'संगीत द्रौपदी', 'संगीत स्वयंवर', 'संगीत मानापमान', 'संगीत मेनका', 'संगीत सावित्री', 'संगीत त्रिदंडी संन्यास', 'कीचक वध', 'प्रेमध्वज', 'सत्त्वपरीक्षा', भाऊबंदकी', 'बायकांचें बंड', 'कांचनगडची मोहना', 'सवाई माधवराव यांचा मृत्यु', 'सवती मत्सर' इत्यादि नाटकाचे कर्ते यांनीं लिहिलें.

मुद्रक प्रकाशक

श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर

'नवाकाळ प्रिंटिंग प्रेस', १३ शेणवीवाडी, खाडिलकर रोड, गिरगांव, मुंबई ४.

आवृत्ति आठवी.

सन १९६१

किंमत २॥ रुपये.

NAVAL GRANTH BHANDAR
Appa Balwant Chowk.
POONA 2.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

(कै. कृ. प्र. खाडिलकर यांचें 'कीचक–वध' नाटक आणि त्यांची सर्व नाटकें यांचे प्रयोग व प्रकाशन याबद्दलचे, त्याचप्रमाणें इतर सर्व अधिकार श्री. य. कृ. खाडिलकर यांचेकडे असून, रॉयल्टी देऊन आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय या नाटकांचे प्रयोग कोणी केल्यास अगर त्यांतील उतारे कोणी घेतल्यास त्यांच्यावर कायदेशीर इलाज केले जातील. कै. कृ. प्र. खाडिलकरांच्या इतर पुस्तकांबद्दलचे सर्व अधिकार श्री. य. कृ. खाडिलकर यांच्याकडे आहेत:)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

कां पहिल्या आवृत्तींत फेरफार न करतां ही दुसरी आवृत्ती छापिली असून, " सैरंध्री कीचक-वध " नाटकाचे प्रयोगास व पुस्तकास झालेली बंदी उठविण्याचे कामाचे विषयीं प्रथम नागपुरास व नंतर मुंबईस केलेल्या उद्योगाबद्दल, ह्या पुस्तकांत घातलेल्या चित्रांचे त्या त्या प्रसंगाचे फोटो दिल्याबद्दल, आणि "कीचका"ची प्रथम भूमिका घेणारे प्रसिद्ध नट कै. भागवत यांच्या वेळचा नटांचा संच नाहींसा झाला असतांहि पूर्वीच्याच जोमानें व कौशल्यानें "कीचक-वध" रंगभूमीवर आज पुन्हां त्यांच्या नेहमीच्या आस्थेनें व टापटिपीनें करीत असल्या-बद्दल "महाराष्ट्र नाटक मंडळी" व मंडळीचे मालक रा. देशपांडे व रा. दाते ह्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच होणार आहेत.

"नवाकाळ" ऑफिस, मुंबई)
ता. १-११-१९२६)

ग्रंथकर्ता.

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

पांडवांचा वनवास संपल्यानंतर अज्ञातवासाचे दिवस त्यांनीं "विराट-नगरींत' काढण्याचें ठरविलें. इतर देशांपेक्षां "मत्स्य" देश पांडवांनीं कां पसंत केला, ह्याचें कारण विराट-पर्वाचें प्रथमाध्यायांत श्रीव्यासांनीं युधिष्ठिराचें तोंडी येणेंप्रमाणें दिले आहे:-" मत्स्यो विराटो बलवानभिरक्तोऽथ पांडवान् । धर्मशीलो वदान्यश्च वृद्धश्च सततं प्रियः ॥" राजा विराट पांडवांचा कैवारी म्हणजे सत्पक्षाचा अभिमानी आहे, इतकेंच नव्हे तर वृद्ध, धर्मशील, व उदार-बुद्धीचा (वदान्य) आहे, असें युधिष्ठिरानें आपल्या भावांना सांगून, मत्स्य-देशाचा आश्रय करण्याचा निश्चय केला. अशा रितीनें उदारबुद्धीच्या विराट-राजाचे छत्राखालीं असतांना राजाचे सेनापति 'कीचक' व 'अनुकीचक' ह्यांचा वध करण्याचा प्रसंग पांडवांवर कां आला ? ह्या प्रश्नाचें उत्तर 'विराट-पर्वा'-

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

शोधीत असतां मला असें आढळून आलें कीं, विराट स्वत: ह्यावेळीं 'बलवान' नसून हें विशेषण मत्स्यदेशांतील व इतर देशांतील लोक 'कीचका'मुळें त्याला लावीत असत. 'विराट' स्वत:चे राज्यांत 'कीचका'स दाबांत ठेवण्यास नव्हता, व त्यामुळें त्याची धर्मनिष्ठा व त्याचें औदार्य एवढ्यावरच ि राहून 'कीचक' व 'अनुकीचक' यांच्या त्रासापासून पांडवांचें संरक्षण होणें नव्हतें. विराट धर्मशील व वदान्य खरा, पण त्याचा अधिकार त्याच्या धर्मशीलावर किंवा उदारबुद्धीवर अवलंबून नसून 'कीचक' व 'अनुकीचक' यांजवर अवलंबून होता. ह्या विधानास 'विराट' पर्वांत खालील आधार सांपडतात. भीमसेनानें 'कीचक' व 'अनुकीचक' यांना मारल्यानंतर कौरवेश्वराचे दरबारांत मत्स्यदेशच्या बलाबलाविषयीं वाटाघाट चालली असतां त्रिगर्तांच्या सुशर्मा राजानें दुर्योधनास उद्देशून खालील भाषण केलें:—"असकृन्मत्स्यराज्ञा मे राष्ट्रं बाधितमोजसा । प्रणेता कीचकस्तस्य बलवानभवत् पुरा ।। क्रूरोऽमर्षी स दुष्टात्मा भुवि प्रख्यातविक्रमः । निहतः स तु गंधर्वैः पापकर्मा नृशंसवान् ।। तस्मिन् विनिहते राजा हतदर्पो निराश्रयः । भविष्यति निरुत्साहो विराट इति मे मतिः ।।" त्रिगर्तांचा पराभव करणारा महाबली, अशी 'कीचका'ची मत्स्यदेशांत व आसपास ख्याति होती. 'कीचक' मारला गेल्यानंतर दुर्योधनाचे बातमीदारांनींहि 'कीचका'चें येणेप्रमाणें वर्णन केलें आहे:—'येन त्रिगर्ता निहता बलेन महता नृप । सूतेन राज्ञा मत्स्यस्य कीचकेन पुनः पुनः ।।' 'कीचक' वधानंतर त्रिगर्तांनीं कौरवांशीं संगनमत करून मत्स्य देशावर हल्ला केला असतां विराटास त्यांना सहज जिवंत पकडून नेतां आलें, व अखेरीस धर्माज्ञेनें भीमानें त्याला सोडविलें; ह्यावरून खुद्द राजा विराटाची शक्ति किती होती ह्याची कल्पना करतां येण्यासारखी आहे. खुद्द 'कीचका'लाहि आपल्या शक्तीची विशेष घमेंड होती व 'विराट' राजाला तो सिंहासनावरील बाहुलें समजत होता. सैरंध्रीशीं बोलतांना स्वत:च्या सामर्थ्याविषयीं व विराटाचे निर्बलतेविषयीं त्यानें येणेंप्रमाणें वर्णन केलें आहे:—"अहं हि सुभ्रु राज्यस्य कृत्स्नस्यास्य सुमध्यमे । प्रवासयिता चैव वीर्ये चाप्रतिमः क्षितौ ।। पृथिव्यां मत्समो नास्ति कश्चिदन्यः पुमानिह । रूपयौवनसौभाग्यैर्भोगैश्चानुत्तमैः शुभैः ।। मयादत्तमिदं राज्यं स्वामिन्यास्मिन् शुभानने । भजस्व मां वरारोहे भुंक्ष्व भोगानुत्तमान् ।।" सैरंध्री

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

बोलानें कबूल होत नाहीं असें पाहून कीचकानें राजा विराटाचे दरबारांत मारून तिला खालीं पाडलें. ह्यावरून असें दिसते कीं, कामांधतेपेक्षां आज्ञा-भंगापासून उत्पन्न होणाऱ्या क्रोधाचे प्राबल्य कीचकाचे अंगी विशेष होते. ...ळीं सैरंध्रीनें विराटाची व इतर सभाजनांची अतिशय आर्जवे केली, पण ...ा'चे विरुद्ध जाण्याची कोणाचीच प्राज्ञा नसल्यामुळें त्या वृद्ध, धर्मशील ...र बुद्धीच्या (वदान्य) विराट राजानें उडवाउडवीची उत्तरें देऊन ...ी'चा पक्ष घेण्याचे नाकारलें. धर्मराज त्यावेळीं सभेंत होता. ह्या अपमानाचा सूड जागचेजागीं उगवावा म्हणून 'शरणं ये प्रपन्नानां ...त शरणार्थिनाम् । मर्षयन्ति यथा क्लीवा बलवन्तोऽमितौजसः ।। " ...ब्दांनीं त्याचा राग प्रदीप्त करण्याचा द्रौपदीनें विचार केला. त्यावेळीं ...ं सैरंध्रीस तूं 'अकालज्ञा' आहेस असें उत्तर देऊन "मन्ये न कालं ...य प्रश्यन्ति पतयस्तव । तेन त्वां नाभिधावंति गन्धर्वाः सूर्यवर्चसः ।।" ...श्लोकानें स्वतःच्या धोरणाचे अविष्करण केलें; व यथाकाली पांडव ...काचा वध करून द्रौपदीच्या मनांतील हेतु तडीस नेतील असें ध्वनित ... त्यानें पर्यायानें लगेच तिचें शांतवन केलें. सैरंध्रीस लाथ मारून ...ावर कीचकास कीमपिहि वाईट वाटलें नाहीं, तर उलट 'विराटा'स आपण ...ाप्रमाणें कसें लेखतो हें सैरंध्रीनें यावरून समजून ध्यावें असें त्यानें सैरंध्रीस ...्या भाषणांत बजावून सांगितलें. त्या प्रसंगाचे श्लोक येणेप्रमाणें आहेत– ...ार्यां पश्यतो राज्ञः पातयित्वा पदाहनम् । न चैवा लभसे त्राणमभिपन्नां ...यसा ।। प्रवादेनैव मत्स्यानां राजा नाम्नायमुच्यते । अहमेवहि मत्स्यानां ...वै वाहिनीपतिः । " धर्मशील व उदारबुद्धीचा राजा विराट 'नांवाचा ... अशा रीतीनें ठरल्यामुळें, 'प्रख्यातविक्रम' आणि 'पापकर्मा' व 'दुष्टात्मा' ...क' द्रौपदीस भर सभेंत लाथ मारण्यापर्यन्त उन्मत्त झाल्यामुळें ...ा पतीना पर्यायानें 'क्लीव' म्हणण्याइतक्या क्रुद्ध झालेल्या द्रौपदीस ...करण्याकरितां, कालाची अपेक्षा करीत बसणाऱ्या धर्माला कीचक– ... आपली संमति आहे, असें पर्यायानें सुचविणें भाग पडलें.

कीचक–वधा'ची अशी हकीकत देतांना 'कीचक', 'विराट', 'द्रौपदी', ...धर्म' यांच्या स्वभावाचें वर्णन श्रीव्यासांनीं 'विराटपर्वांत' वरीलप्रमाणें

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

म्हणून, कीं त्याच्या तालीमबाजीला पाकशाळेंतील खादीनें विशेष बाळसें आलें आहे म्हणून ?—कां सैरंध्री, आतां कां तोंड मिटलें ?—रागावू नकोस हो. अग पुरुष नाहीं का बायकांच्या रुपाची तारीफ करीत ? दोघे चौघे चारगट गप्पा झोकायला बसले म्हणजे हजर असलेल्या बायका तेवढ्या पतिव्रता, इतरांच्या आपल्या तशाच, असें समजून, त्यांच्या नटण्यामुरडण्यावर, बोलण्याहांसण्यावर, टीका करीत नाहींत काय ?

सैरं०—अग, चारगट पुरुषांचा कित्ता का आम्ही साळसूद बायकांनीं गिरवायाचा ?

सौदा०—मग काय दासींनीं बाईसाहेबांसारखें थोरपणानें उठावें, बसावें, होय ?—मी तशी वागलें असतें; पण मला किनई खरोखरच बाईसाहेब झाल्या-शिवाय, दासी असतांनाच तुझ्यासारखा बाईसाहेबांचा टेंभा मिरवायला येत नाहीं. आणि आजच्यासारखा हा सुंदर पुरुषांचा मेळ्याचा देखावा पाहिला म्हणजे माझी जीभ कशी चुरुचुरु बोलायलाच लागते !—मत्स्यनगरींतले सर्व सुंदर पुरुष बायकांना मोहित करण्याच्याच हेतूनें मोठा थाटमाट करुन रस्त्यानें आपल्या रूपाचे प्रदर्शन करीत चालले असतां, मी म्हणें गप्प बसावें ! हें होईल तरी कसें ? आणि असें पहा, आजचा दिवस पुरुषांनींच तोऱ्यानें सर्व रस्ते गजबजून टाकण्याचा आहे. कारण मत्स्यनगरींतल्या सर्व पुरुषांत अत्यंत सुंदर जे कीचक महाराज, ते आतां थाटानें राजवाड्यांत प्रवेश करणार आहेत. सैरंध्री, तूं अजून कीचक महाराजांना पाहिलें नाहींस नव्हे ?

सैरं०—आमच्या बाईसाहेबांनीं मला नोकरीस ठेवण्याचे पूर्वींच ते एथून गेले होते.

सौदा०—नोकरीला लागून तुला दहाच महिने झाले, नव्हे ? आणि कीचक महाराज त्या पूर्वींच हस्तिनापुराला गेले. हस्तिनापुरांत तर आठ महिने कौरवेश्वरानें त्यांना आग्रहानें ठेवून घेतले होते ; आणि बाईसाहेब म्हणत होत्या, हस्तिनापुरांत त्यांचा जयजयकार फारच झाला. कौरवेश्वर सुयोधन महाराज यांची पक्की दोस्ती संपादन करून कीचक महाराज आज परत येत असल्या-मुळें ह्यावेळीं मत्स्यपुरी उल्हासानें व शृंगारानें हांसत व नाचत असल्यासारखी दिसत आहे !—सैरंध्री, मी मघापासून पाहते आहे, तुझाच तेवढा चेहरा कां ग असा उतरलेला ?

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सैरं०—दुसऱ्याला आरती ओवाळायची आणि दृष्ट काढायची, हीं कामें मला आवडत नाहींत. म्हणून मी राणीसाहेबांना विनंति केली कीं, आजच्या समारंभांत महादरवाजाजवळचे कामच मला नको.—राणीसाहेबांनीं माझी विनंति मान्यहि केली होती, मग पुन्हां का बाई हुकूम फिरला कोण जाणें !

सौदा०—वागवा ! मी तर मुद्दाम म्हणून राणीसाहेबांच्यापाशीं रदबदली केली, कीं सैरंध्रीला मजबरोबर ओवाळण्याच्या कामावर नेमा म्हणून. अग तुला माहित नाहीं, तुझा तो बल्लभ आचारी किंवा कंकभट यांच्यापेक्षां शंभरपटीनें कां सहस्त्रपटीनें कीचक महाराज सुंदर आहेत हो !—दुनियेंत असा मदनाचा पुतळा सांपडावयाचा नाहीं, अशी माझी खात्री आहे. अग ओवाळायला आम्ही पुढें झालो नाहीं—दृष्ट काढायला जर आम्ही पुढें सरसावलो नाहीं तर त्या सौंदर्याच्या गडुयाच्या अगदी जवळ आम्हांला केव्हांग जावयाला मिळणार ?—मी तुझ्यावर हे उपकारच केले आहेत. त्या मंदहासिनी, शशिमुखी, कमला, चपला, सगळ्याजणी माझ्या नांवानें खडे फोडीत आहेत.

सैरं०—तें कां ग बाई ?

सौदा०—त्यांना मागें टाकून, मी तुला पुढें केलें म्हणून.

सैरं०—खरेच गडे माझ्यावर एवढे उपकार केले नसतेस तर फार चांगले झालें असतें.

सौदा०—कीचक महाराजांना पाहिले नाहींस तोपर्यंत तुझ्या ह्या वल्गना ! एकदां का त्या मनोहर मूर्तीचे दर्शन झालें, म्हणजे जन्मभर माझ्या आजच्या उपकाराची आठवण करशील. अग वेडे, जवळ उभें राहून डोळे भरून कीचक महाराजांना पाहिले म्हणजे जन्माचे सार्थक झाल्यासारखें वाटते हो !

(मंदहासिनी येते)

मंद०—गडे सौदामिनी, राणीसाहेब येऊन पोहचल्याच म्हणून समज. बरोबर रत्नप्रभाबाईसाहेबहि आहेत. आरतीची—ओवाळणीची नीट तयारी आहे ना ?

सौदा०—मोठी आली आहे माझ्या कामावर देखरेख करायला ! तुला ग कुणी इथें यायला सांगितलें ?—राणीसाहेब आयत्यावेळीं आल्या म्हणजे तूं त्यांच्याबरोबर ये.—पुढेंपुढें करायला पाहिजे !—जमलेल्या पुरुषांना चेहरा मोहरा, एव्हांपासूनच कांहीं नको दाखवावयाला! जा, त्या तेथें जाऊन बैस जा, राणीसाहेब आल्या म्हणजे कीचक महाराज येईतो त्या तिथें पडद्यांत बसणार आहेत; तिकडे जाऊन आपली धिडका तेथें बसू द्या.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

मंद०—पुढें जाऊन तयारी पहा म्हणून राणीसाहेबांनीं सांगितले म्हणून आलें हो! नाहीं तर तुझ्याशीं बोलायला माझें अडलें आहे खेटर.

सौदा०—पहा, तयारी पहा हो, नीट पहा,—हे कलश बघ—हे कुंकवाचे पट्टे पहा—ते आंब्याचे डहाळे उचलून पाणी तुडुंब भरलें आहे कीं नाहीं नीट तपास कर—महादरवाजावर लाविलेली हीं तोरणें ध्यानांत ठेव—आणि पताकाहि विसरू नकोस. शिवाय कीचक महाराजांना ओवाळण्याकरितां हें—आरतीचें आणि ओवाळणीचें—सामान घेऊन आम्ही—दोघीजणी—जिवंत जागच्या जागीं उभ्या आहोंत—नीट डोळे फाडून बघ.—कां ? झालें समाधान ?—आहेना सर्व तयारी ?—जा आतां, जा हं !

(मंदहासिनी जाऊ लागते.)

सैरं०—अग मंदहासिनी, तुला हें आरतीचे काम आवडत असेल तर तूं राहिनास उभी येथें ? मी आपली राणीसाहेबांच्या जवळ राहतें. (मंदहासिनी परत येऊं लागते.)

सौदा०—वाग वा ! जा तूं आपल्या कामाला. तुझ्या तोंडाला पुष्कळ पाणी सुटेल, पण मी ऐकायला पाहिजे ना ? (मंदहासिनी जाते) खरेच गडे सैरंध्री, ही मंदहासिनी इतकी कुरूप असतांना पुरुषांच्या पुढेंपुढें करावेसें हिला वाटते तरी कसें ? लंगडें तें लंगडें आणि गांवदरीला चरेना !

सैरं०—पण माझ्या जागीं ती असती तर तुझें काय बिघडत होतें ?

सौदा०—मी नाहीं कधी तिला माझ्याबरोबर घ्यायची . दोन तीनदां माझ्याबरोबर देवदर्शनाला आली होती, आणि बाई तिच्या चेहऱ्याचें ते कळकटलेलें खापर पाहून इतक्या मेल्या पुरुषांपैकीं एकानें तरी पुन्हां वळून आमच्याकडे पहावयाचे होतें ! एखाद्या चारगटानें देखील पाहिले असेल तर शपथ; आणि तीच तूं बरोबर असलीस किंवा मी एकटीच असलें म्हणजे निर्लज्ज पुरुष राहूं देच, पण तो बघ तो मोठा विद्वान – तो दुसरा मोठा प्रतिष्ठित – तो तिसरा धार्मिक म्हणून मिरवणारा—कसें मेले वळून वळून पहात आहेत ! – गिधाडाची नजर जशी मासाच्या तुकड्यावर असते, तसे मेले—अग बाई ! राणीसाहेबांची स्वारी आली ! निरांजनें पेटवून ठेवूं या !

(सुदेष्णा , रत्नप्रभा, व मंदहासिनी प्रवेश करतात.)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सुदे०––काय ग सौदामिनी, अग सैरंध्री,–नीरांजनें पेटवून ओवाळायची तयारी आहे ना ?

सौदा०––होय बाईसाहेब, सर्व तयारी करून आम्ही कीचक महाराजांची वाट पहात बसलो आहोंत.

सुदे०––दादा इतक्यांत येऊन पोंहोचेल; हं ऐक, शिगें वाजली, स्वारी अगदीं जवळ आली आहे.

मंद०––होय बाईसाहेब, ते पहा विराट महाराज व कीचक महाराज, अंबारीं-तून उतरून गुरु–पुरोहितांचा आशिर्वाद घेत आहेत! वाड्यांत प्रवेश करण्या–करितां आतां इतक्यांत येथें येतील.

सौदा०––(सैरंध्रीस एकीकडे) कशी कंजारीण आयत्यावेळीं पुढें झाली? सर्वांच्या अगोदर हिनेंच कीचक महाराजांना पाहिलें! तुला दिसले कां ?

सुदे०––काय ग मंदहासिनी ; रत्नप्रभाराणीसाहेब कोठें आहेत ?

मंद०––ह्या येथेंच आहेत, बाईसाहेब.

सुदे०––अग वहिनी, अशी तूं आतां मागें मागें कां उभी ? दादाला पहाव-याला इतका वेळ तूं उत्सुक होतीस,–आणि दादाला 'महाराज' ही पदवी मिळून, तो जवळ आला असतां, तुझें आपलें पाऊल मागेंच! खरेच वहिनी, माझे दादा कीचक महाराज यांच्या अंगावर फुलें उधळून त्यांचा जयजयकार करायला त्यांच्याच बायकोला लाज वाटावी, हें आश्चर्य आहे बाई!

रत्न०––खरेच वन्सं, अशा आनंदाच्या वेळीं माझ्या जिवाला हुरहुर कां वाटावी बरे ? मी जयजयकार करून, त्यांच्यावर फुलें उधळीन खरी, पण तिकडून मजकडे पहाणेंच झालें नाहीं तर ?

सुदे०––इश्श्–भलतीच शंका कशाला ग वहिनी, मनांत आणतेस ? (जवळ घेऊन) दादा आठ नऊ महिने हस्तिनापुरांत होता, तरी आपल्या पट्टराणीवरचें त्याचें प्रेम कधीं वेडे कमी होईल काय ?

रत्न०––हस्तिनापुरच्या बायका फारच सुंदर असतात म्हणून मी ऐकलें आहे.

सुदे०––आमच्या दादासारखा सुंदर पुरुषहि जगांत मिळायचा नाहीं; आणि वहिनी, तुझ्यासारखी सुंदर स्त्रीहि मिळायची नाहीं.

रत्न०––वन्सं, तुम्ही उगीच माझी कांहींतरी थट्टा करितां झालें.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सौदा०—खरेच बाईसाहेब, उत्तरेकडच्या बायका फारच सुंदर असतात, म्हणून म्हणतात. माझी आईदेखील उत्तरेकडची होती म्हणे.

मंद०—म्हणूनच तूं अशी सुंदर दिवटी जन्मास आलीस वाटतें !

सौदा०—गप्प बैस चावटे ! आणि खरंच सांगू का बाईसाहेब ? उत्तरेकडचे पुरुष मात्र कळाहीन आणि कंगाल दिसतात. दख्खन कंगाल म्हणून कितीहि नाकें मुरडोत ; पण इकडचे पुरुष कसे सतेज असतात. कीचक महाराजांना सर्वांनीं हौसेनें ठेऊन घेतलें, तें उगीच नव्हे ; शिवाय हातच्या कांकणाला आरसा कशाला ? पांडवांच्या द्रौपदीराणीसाहेबांच्या जवळ असणारी ही सैरंध्री कशी नक्षत्रासारखी आहे पहा ! नाहीं तर तो बल्लभ आचारी, किंवा कंकभट, मेल्यांच्या निस्तेज चेहऱ्याकडे पहावतच नाहीं.

सैरं०—गडे सौदामिनी, वीज एखादे वेळेस चमकली तर लोक तिचे कौतुक करतात, पण एकसारखी जर कडाडत राहिली तर भीति वाटून लोकांना नकोशी होते हो !

रत्न०—खरेंच वन्सं, ही आपली नवीन दासी रुपानें फारच चांगली असून, तिचें भाषण मधुर व मार्मिक आहे.—हस्तिनापुरच्या सगळ्याच बायका जर अशा असतील तर मत्स्यदेशच्या बायकांनीं आपल्या नवऱ्यांना तिकडे फिरकू देखील देता कामा नये.

(पडद्यांत शिंगे वाजतात. 'कीचक महाराजकी जय' असे शद्ब होतात. छत्रानें युक्त विराट, व दोन तरुणी चामरे उडवित आहेत असा कीचक, कंकभट, मैत्रेय, वगैरे प्रवेश करतात. कीचकावर आकाशांतून पुष्पवृष्टी होते. सर्वजण फुलें व गुलाल उधळून, 'कीचक महाराजकी जय' असा शद्ब करतात.)

विराट०—कीचक महाराज, आपल्या आगमनानें माझी मत्स्यपुरी आनंदित झाली असून ही आपली प्रिय भगिनी आपल्या दर्शनाकरितां उत्सुक होऊन येथें उभी आहे. ती पहा, तिच्या शेजारी आपली राणी म्हणजे माझी बहिण रत्नप्रभा उभी आहे. त्यांच्याशीं कुशलतेचे दोन शद्ब बोलून आपण राजवाड्यांत प्रवेश करावा.

कीच०—अक्का, तुम्ही सगळ्याजणी माझ्या स्वागताकरितां उत्सुक असलेल्या पाहून मला फार आनंद होतो. हस्तिनापुरांत माझें स्वागत फारच मोठ्या थाटानें झालें व सार्वभौम कौरवेश्वर सुयोधन ह्यांनीं माझा फारच मान ठेविला हें खरे;

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

पण आजच्यासारखा आनंद मला त्यावेळींहि झाला नाहीं. कारण प्रेमाच्या मनुष्याची गोष्ट कांहीं निराळी असते.–आपणा सर्वांचें कुशल आहे ना ?

सुदे०––दादा, हस्तिनापुरच्या स्वारीहून आपण मानमान्यता मिळवून परत आला, हें ऐकून मत्स्यपुरीला आनंद व्हावा हे साहजिकच आहे. दादा, कौरवेश्वरानें आपला जयजयकार कसकसा केला, हे समजण्याला आम्ही सर्वजणी उत्सुक आहो, आणि माझी वहिनी रत्नप्रभा हिला तर सर्व हकिगत आपल्या तोंडून केव्हां ऐकेनसें झालें आहे. म्हणून म्हणते चला, आतां राजवाड्यात प्रवेश करण्याला विलंब नको.

CH· (कीच०––अक्का, थोड्या वेळानें दरबारांत विराट महाराजांपाशीं कौरवेश्वराचा निरोप कळवून मी सर्व हकीकत सांगणारच आहे; पण आतांचा माझा हा पोषाख पाहूनहि, सार्वभौम कौरवेश्वर मला किती मानतो, हें सर्वांच्या लक्षांत येईल.तुम्हां सर्वांना माहितच आहे कीं, 'मत्स्यदेशचा महाराज'अशी पदवी भारतेश्वर सुयोधन यानें मला दिली आहे. आपले विराटराज ह्यांना महाराजाधिराज अशी नवी पदवी सार्वभौमानें दिली असून अधिराजाच्या हाताखालीं महाराज ह्या नात्यानें पूर्वींचेच काम मी करावे असें सार्वभौमानें ठरविलें आहे.) पण अक्का, मत्स्येश्वर महाराजाधिराज विराट महाराज, मी आपणाला असें सांगतो कीं, महाराज या पदवीनें माझा खरा मान झाला असें मी समजत नसून ह्या माझ्या पोषाखानें माझा खरा मान झाला असें मी समजतो. मला महाराज ही पदवी देतांना सार्वभौम सुयोधनानें हें मला दिलेलें छत्र पहा. हें छत्र मूळचे कोणाचें असून ह्यावर कोणाच्या यशाचें वर्णन लिहिलेलें असावें असें तुम्हांला वाटतें? मैत्रेया, ह्यावरील अक्षरें वाचून सांग पाहू कोणाचें हें छत्र आहे तें? स्व गौर० वर्ण

मैत्रे०––छत्रावर आणखी कोणचीं अक्षरें असणार! अमक्या तमक्या शिंप्यानें ही छत्री शिवली म्हणून दोन चार टाक्यांत त्याचें नांव गोवलेलें असणार! चितार्‍यानें त्यावरचीं चित्रें काढिलीं म्हणून चित्रांतल्या एखाद्या बाईच्या लाथा खात तिच्या पायाच्या तळव्यांत तो लपून बसणार!

कीच०––बेटच्या मैत्रेया, राजकारण तुला कांहींच समजत नाहीं!

मैत्रे०––तो कंटाळवाणा विषय मी कंकभटाकडे दिला आहे. पूर्वीं सगळें राजकारण मजकडेच होतें,––

कीच०––मग अलीकडे काय झालें?

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

मैत्रे०—युधिष्ठिर महाराजांच्या दरबारांतला हा कंकभट येथें आल्यापासून द्यूत आणि राजकारण मी ह्याच्याकडेच सोंपविलें आहे. युधिष्ठिराप्रमाणेंच हा राजकारणांत हुषार आणि द्यूतांत प्रवीण आहे.

कीच०—मग आपली धनदौलत व बायको द्यूतांत हा युधिष्ठिराप्रमाणें तेव्हांच हारून जाईल, आणि आपल्या भावांच्या गळ्याला मिठी मारून दुःखाच्या खड्डयांत पडेल!

मैत्रे०—त्याला भाऊ बिऊ कोणी नाहीं. ह्याच्या नात्यानें मीच काय तो येथें त्याचा भाऊ. मी संभाळून आहे, दूरदूरच असतो. धनदौलत म्हणावी तर प्रथम एक फुटका लोटा होता.—आतां द्यूतांत जिंकून जिंकून दोन पैसे कडोस्रीस लावून आहे. हुषार आहे हो बेटा! —बायको म्हणावी तर लग्नाची कोण दिसतच नाहीं, आणि द्यूतांत मिळविलेले पैसे मात्र नाहींसे होतात खास !

कीच०—तुम्ही युधिष्ठिरापाशीं होतां, तेव्हां हें छत्र कोणाचें असावें ? ओळखतां काय?

कंक०—इंद्रप्रस्थास पाहिल्यासारखें वाटतें.

कीच०—नीट पाहून ओळखा बरें !

कंक०—युधिष्ठिर महाराजांचें असावें.

कीच०—कां? असा रडका आवाज कां ? मला हें छत्र मिळालेलें पाहून मत्स्य-पुरींतील प्रत्येक मनुष्याला आनंदच वाटला पाहिजे.

मैत्रे०—युधिष्ठिर महाराजांच्या मागें द्यूत जसें ह्याच्या वाटणीला आलें, तसें छत्र आलें नाहीं म्हणून वाईट वाटते आहे कंकभटाला!

कीच०—मत्स्येश्वर अधिराज विराट महाराज, हा पोषाख देण्यापूर्वी गदा-युद्धांत व धनुर्विद्येंत माझें अलौकिक प्राविण्य पाहून सार्वभौम भारतेश्वर फारच खूष झाले. मी जर लहानपणापासून हस्तिनापुरांत असतो तर द्यूताची एवढी खटपट शकुनीमामांना करण्याचें कारणच पडलें नसतें! —माझ्या गदेच्या प्रहारानें भीमाची मांडी कधींच चूर्ण झाली असती! -द्रौपदीस्वयंवराचे वेळीं मी जर हजर असतो, तर माझ्याच बाणानें मत्स्यभेद होऊन द्रौपदी माझीच पट्टराणी झाली असती! —त्या त्या प्रसंगीं मी नव्हतो, म्हणून सुयोधन महाराज अत्यंत हळहळले, आणि झाली ती गोष्ट झाली असें म्हणून त्यांनीं दुःखाश्रू टाकले !

विरा०—कीचक महाराज, आपला पराक्रम खरोखरच तसा आहे.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सुदे०—खरेंच दादा, तूं जर हस्तिनापुरात असतास तर द्रौपदीला पांच नवरे करण्याचें कारणच पडलें नसतें.

रत्न०—पांचहि पांडवांचे गुण येथें एकवटल्यासारखें आहेत. द्रौपदी-स्वयंवराला स्वारी हजर नव्हती हें माझें सुदैवच म्हणायचें!

Ch. कीच०—[आणि हजर असतो तरी तुझीच दासी म्हणून तुझ्या महालांत द्रौपदीला टेविली असती.–आणि अजून प्रतिज्ञा करून मी असें सांगतो कीं, थोडया दिवसांनीं कौरव–पांडवांच्या युद्धाची वेळ आली म्हणजे, भीष्म, द्रोण, किंवा कर्ण ह्यांच्या हातूनहि न होणारा पराक्रम मी करून दाखवीन.–माझ्या गदेनें भीमाचे शतशः तुकडे झाल्यावर, माझ्या बाणांनीं अर्जुन गतप्राण झाल्यावर, युधिष्ठिराच्या शेंडीला पकडून, मी माझ्या पायांवर त्याला डोकें ठेवावयास लावून त्याला जीवदान देईन, व त्याला गरीब भिक्षुकाचा पोषाख घालून अरण्यांत तपश्चर्या करण्यास पाठवून देईन. नकुल सहदेव ह्या नटव्या जोडीनें वायकांचा पोषाख करून, अशा तऱ्हेनें माझ्यावर चामरे उडविण्याचें कबूल केलें तरच त्यांना जिवंत ठेवीन. असा अद्भुत पराक्रम करून दाखविण्याचें मी भारतेश्वराला वचन दिलें आहे. अशीं दिव्य कृत्यें करून दाखविल्यावर इंद्रप्रस्थाचें राज्य, व युद्धांत जिंकलेली दासी पांडवांची वधू द्रौपदी,– ही मला अर्पण करण्याची सुयोधनानें प्रतिज्ञा केली आहे. म्हणून म्हणतो अक्का, तू तुझ्या वहिनीला सांग कीं, द्रौपदीला तुझी दासी होण्याचा प्रसंग लवकरच आल्यावांचून रहाणार नाहीं.]

मैत्रे०—पण तसें नकोच व्हावयाला. कारण रत्नप्रभाराणीसाहेबांहून द्रौपदी फार सुंदर आहे म्हणे.

रत्न०—राणीची दासी आणि दासीची राणी होण्याचा तो प्रसंगच नको यायला.

कीच०—पट्टराणी ती पट्टराणीच राहील.–बाकी तो प्रसंग यावा म्हणून तर माझा एवढा उद्योग! माझ्या प्रतिज्ञेची मला आठवण रहावी, म्हणून कौरवेश्वरानें माझ्या पायांतील चढावावर 'भीम' अशीं अक्षरे लिहून ठेविलीं आहेत. गदायुद्धांत मृतप्राय होऊन भीम जमिनीवर पडल्यावर डाव्या पायाचा आंगठा त्याच्या नरडीला लावून त्याचा प्राण मी घेईन. माझ्या बाणांनीं रथांतून खालीं फेंकून दिलेल्या अर्जुनाच्या मस्तकावर माझ्या उजव्या पायाची लाथ बसावयाची असल्यामुळें,

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

उजव्या पायातल्या चढावाच्या टांचेखालीं अर्जुन सांपडला आहे. आणि अक्का, तुझ्या वहिनीला सांग, मनांत उगीच मत्सरबुद्धी आणूं नकोस–द्रौपदी स्वयंवर झाल्यावर पांच पांडवांशीं जेव्हां द्रौपदीचें लग्न लागलें, त्या समारंभांत जामात रुसले असतां द्रुपद राजानें 'द्रौपदीपति' हीं पंचाक्षरे हिऱ्यावर कोरून पांच पांड–वांना पांच आंगठ्या नजर केल्या. द्यूताचे वेळीं त्या आंगठ्या सार्वभौम सुयोध–नाच्या मालकीच्या झाल्या. भावी युद्धानंतर जिकलेल्या द्रौपदीचा मी एकटाच पति होणार म्हणून कौरवेश्वरानें "द्रौपदीपति" ह्या अक्षरांच्या पांचहि आंगठ्या ह्या वीराच्या भाग्यशाली व पराक्रमी हाताच्या पांचहि बोटांत घातल्या आहेत! ह्या आंगठ्या माझ्या हातांत घातल्यावर भर दरबारांत शंभर कौरवांनीं "द्रौपदी पति" "द्रौपदीपति" असा माझ्या नांवाचा जयजयकार केला!–(चौरी धारण करणाऱ्या दासी–"द्रौपदीपति कीचक महाराजकी जय"–असा जयजयकार करि-तात.) विराट महाराज, अक्का, ह्या चौरी धारण करणाऱ्या दासी सार्वभौम भारतेश्वरानें मला नजर केल्या असून, पांडवांना जिकण्याच्या प्रतिज्ञेची मला वारंवार आठवण करण्याकरितां "द्रौपदीपति" ह्या शद्बांनीं यांनीं माझा हरदम जयजयकार करावा अशी त्यांना माझी आज्ञा आहे. (दासी वरील तऱ्हेनें जयजय-कार करितात, सैरंध्रीशिवाय इतर दासी फुलें उधळतात.)

सुदे०—सैरंध्री, सौदामिनी, आतां निरांजनें ओवाळन दादाची दृष्ट काढा. येथेंच किती वेळ उभें राहावयाचें! (ओवाळून सौदामिनी दृष्ट काढते. सैरंध्री ओवाळणीची निरांजनें घेऊन हात कांपत तशीच उभी राहाते.)

कीच०– अक्का, हस्तिनापुरच्या दासींनाहि आपल्या सौंदर्यानें लाजविणाऱ्या असल्या दासी तुजजवळ आहेत म्हणायच्या! –भारतेश्वर सुयोधनाचे राज-मंदिरांत मी प्रथम ज्यावेळीं प्रवेश केला, त्यावेळीं एक हजार सुंदर तरुण दासी ओंवाळणी घेऊन दुतर्फा उभ्या होत्या. कौरवेश्वरानें मला विनंति केली, यांतून ज्या दासी माझ्या पसंतीस उतरतील, त्यांना मत्स्यदेशांत मी घेऊन जावें. भारतेश्वराच्या त्या विनंतीला मान देऊन गांधारदेशाहून नुकतीं आलेलीं हीं दोन रत्नें नाटकशाळेंत ठेवण्याकरितां मी बरोबर आणलीं आहेत. पांडवांचा तपास करण्याकरिता थोडेच दिवसांनीं सुयोधन महाराज मत्स्य-देशांत येणार आहेत; ह्या दोन दासींचा मोबदला म्हणून त्यांना नजर करण्यालायक एकहि दासी आपल्याजवळ नाहीं, म्हणून इतका वेळ मला

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

काळजी वाटत होती; पण अक्का, आपल्या तेजानें ह्या दीपज्योतींना लाजविणारी ही सैरंध्री पाहून माझी काळजी दूर झाली आहे. ह्या सैरंध्रीला मला देण्याला जर अक्का तुझी हरकत नसेल, आणि विराटमहाराज, ही दासी मला दिल्यानें आपल्या नाटकशाळेंतील करमणुकीला अडथळा येईल असें आपणाला वाटत नसेल,——

विरा०—ही बिलकूल माझ्या दिमतीलाच नसते.

कीच०—मग अक्का, तुझ्या सेवेला इतर दासी चालतील. सुयोधन महाराज मत्स्यदेशांत येईतो हिला मी माझ्या नाटकशाळेंत ठेवणार.—माझ्या सहवासांत राहून पराक्रमी पुरुषांत्रें रंजन कसें करावें हें शिकल्यावर तिला मी भारतेश्वराला अर्पण करीन.

मैत्रे०——भारतेश्वराच्या सुखाची काळजी जर कोणास असेल तर ती कीचक महाराजांनाच आहे.

रत्न०——(स्वगत) पुरुष परदेशांत फार दिवस राहिले म्हणजे चंचल मनाचे होऊन येतात म्हणून म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं.

सौदा०——सैरंध्री, मी केव्हांची दृष्ट काढली, तूं अजून महाराजांना ओवाळायची काय म्हणून थांबली आहेस? महाराजांनीं आपल्या खास नाटकशाळेंत ठेवण्याचा मान दिला, म्हणून इतकें कांहीं गोंधळून जायला नको! (एकीकडे सैरंध्रीस) आजचे माझे उपकार मग विसरूं नकोस हो! (उघड) महाराजांनीं माझ्या मैत्रिणीचा जो अवचित सन्मान केला त्यामुळें तिला कांहीं सुचेनासें झालें आहे. गरिबांना एकदम राजलक्ष्मी मिळाली म्हणजे थोडा वेळ अशीच स्थिति होतें. माझ्या मैत्रिणीच्या ऐवजीं मी ओवाळतें, त्याची माफी असावी.

कीच०——असल्या सेवाचाकरीच्या कामावर इतक्या सुंदर अप्सरेला अक्का तूं नेमलीस कशी, ह्याचेंच मला आश्चर्य वाटतें! सुंदर फुलांना तळहातावर झेलून धरून प्रेमानें हुंगावें, किंवा मस्तकावर अलग उचलून धारण करावें; पायाखालीं का कोणी त्यांना तुडवितो! (सौदामिनी ओवाळते. कीचक महाराजकी जय असा शब्द होतो . चौरीवाल्या "द्रौपदीपति कीचक महाराजकी जय" असा जयजयकार करितात. फुलें उधळण्यांत येतात.)

विरा०——कीचक महाराज, आतां राजमंदिरांत प्रवेश करावयाचा. (फुलें व

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

गुलाल उधळीत व कीचकमहाराजकी जय असा जयजयकार करीत मैत्रेय व कंकभटाशिवाय सर्व जातात.)

मैत्रे०—कां कंकभट, आपली काय म्हणून मुद्रा कावरी बावरी? चेहरा इतका उतरलेला काय म्हणून ? ही सैरंध्रीची शिकार आपल्या हातून जाऊन कीचक महाराजांच्या नाटकशाळेंत शिरली म्हणून वाटते हे अश्रू ! अरे, ह्या दासी लवंडीच्या अशाच बेइमान असावयाच्या! जुगाराचे पैसे यांना कितीहि दिले तरी त्या थोड्याच संतुष्ट रहाणाऱ्या आहेत!

कंक०—उगाच कां बरे ही रिकामी थट्टा?

मैत्रे०—मग कंकभट, अरे तूं गरीब ब्राम्हण आणि सैरंध्रीला कीचक महाराज-राजांच्या नाटकशाळेचा मान मिळाला, म्हणून तुला कां वाईट वाटतें?

कंक०—अरे युधिष्ठिर महाराजांचें छत्र पाहिल्यावर पांडवांच्या दरबारांत तुझ्यासारख्या मैत्रेयांना जुगारांत मिळत आलेल्या द्रव्याची आठवण झाली इतकेंच.

मैत्रे०—इतकेंच असल्यावर हरकत नाहीं. मग तूं असें समाधान करून घे, विराटमहाराजांच्या दरबारांत दोन पैसे जुगारांत कमी मिळाले, तर आतां सैरंध्री कीचक महाराजांकडे लागली, तेव्हां तुझा खर्चहि कमी झाला. हिशेबांत अखेर शिलकेवर नजर ठेवावी. उगीच जमा करा आणि खर्च करा, ही उठाठेव काय कामाची ?

कंक०—हें भलतेंच काय बोलतोस ? आम्ही एका गांवचे म्हणून ती केव्हां केव्हां माझ्याशीं बोलते इतकेंच. दासीविशीवर वाईट नजर ठेवण्याचें महत्पाप माझ्या हातून कधींहि होणार नाहीं.

मैत्रे०—जाळें टाकून मासा तूं जमिनीवर आणला होतास, पण कीचकानें त्याला उचलून नेलें. महत्पाप लागणार नाहीं, इतकीच आतां तुला फुशारकी उरली आहे.—अरे, स्वारी बरीच पुढें गेली. चल लवकर जाऊन मिळूं.

कंक०—तूं हो पुढें, मी जरा बल्लभ आचाऱ्याला सरकारची आज्ञा कळवून स्वारी दरबारांत पोहोंचते तो हजर होतो.

मैत्रे०—सौदामिनी म्हणत होती कीं, सैरंध्री केव्हां केव्हां बल्लभ आचाऱ्याचे कानाशीं लागते, केव्हां केव्हां तुझ्याशीं कुजबुजते, आणि म्हणून तुमची एकमेकांत

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

चुरस आहे! —आतां तिला तिसराच यजमान भेटला तेव्हां तुम्ही दोघे चुरस विसरून एक होणार म्हणायचें!

कंक०—हें पहा मैत्रेया, कीचक महाराजांसंबंधानें मला एक गोष्ट तुला विचारावयाची आहे.

मैत्रे०—पूर्वी सैरंध्रीशीं एकांतात कुजबुजतांना मला कोठें तुम्ही आपल्या कटांत घेतलेत? मी म्हातारा असलो म्हणून काय झालें? —आतां तुम्हीच दोघे करा खलवतें—निस्तरावयाच्या वेळेस तेवढा मी कटांत यायला पाहिजे. असा मी फसा-यचा नाहीं. (जातो.)

कंक०—(स्वगत) धि:क्कार असो या धर्मराजाच्या जन्माला! बारा तेरा वर्षांपूर्वीं सर्व आप्त इष्ट नको नको म्हणत असतां, द्यूत खेळून या जुगारूनें, दुष्टांनीं भर सभेंत आपल्या वायकोची विटंबना केलेली पाहिली,—आज स्वत:च्या छत्रचामरांचा व आपल्या भावांच्या नांवलौकिकाचा अपमान एका मदोन्मत्त व हेकेखोर अरेराव्यानें केलेला पहाण्याचें ह्याच्या नशिबी आलें आहे.—शक्तीची रग जिरविणारा कोणीहि न भेटल्यामुळें बेफाम झालेल्या ह्या मत्स्यदेशच्या सेनापतीनें 'द्रौपदीपति' 'द्रौपदीपति' म्हणून माझ्या डोळ्यादेखत व द्रौपदीच्या समोर उभा राहून मिरवावे, ह्याहून पांडवांची आणखी वाईट स्थिति कोणची होणार?—सुयोधना, राजसूय यज्ञाचे वेळीं स्त्रीस्वभावानें द्रौपदी तुला चुकून हांसली, त्याचें प्रायश्चित्त द्रौपदीला भर सभेंत नग्न करण्याचा प्रयत्न करून, व आम्हा पांडवाना वनवासाला पाठवून, आम्हाला दिलेंस तितकें पुरे झालें नाहीं काय ?—परमेश्वरा, दु:शासनानें द्रौपदीच्या निरीला ज्यावेळीं हात घातला, त्यावेळीं चमत्कार दाखवून आंधळ्या धृतराष्ट्राच्या मनांत सद्बुद्धि उत्पन्न करून पांडवांची अब्रू वांचविलीस, त्याचप्रमाणें आतांहि राजा विराट, राणी सुदेष्णा ह्यांना सुबुद्धि देऊन पांडवांना सांप्रतच्या प्रसंगांतून पार पाडून ने. (जातो.)

प्रवेश दुसरा

स्थळ—राजवाड्यांतील एक रस्ता. मैत्रेय प्रवेश करितो.

मैत्रे—हा कंकभट गेला तरी कोठें ? कालपासून बेट्याचें मन कांहीं ठिकाणावर नाहीं. सैरंध्रीच्या नादी लागून तिच्या पाळतीवर तो असला पाहिजे. ही सौदामिनी इकडेच येत आहे, हिला विचारलें म्हणजे कंकभटाचा

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

तपास लागेल. (सौदामिनी येते.) सौदामिनी, ए सौदामिनी,–अरे ही आपल्याच तोऱ्यांत ! आजकालच्या ह्या तरुण पोरी म्हाताऱ्यांकडें पाहिनातशा झाल्या अं !—आमच्या तरुणपणीं असें नव्हतें. मी भर ज्वानींत असतांना, कसलीहि थेरडी भेटो, एकदां तरी पाहावयाचेंच. आतां मनूच पालटला ! –ए बिजलीबाई– ए बिजलीबाई—

सौदा०—नमस्कार करतें मैत्रेय भटजी, आपला काय हुकूम आहे ?

मैत्रे०—तुला आठ मुलांचा आशिर्वाद देऊं ? का आठ मुलींचा आशिर्वाद देऊं ? किती पाहिजेत बोल.

सौदा०—मला एक देखील मूल नको. मूल झालेल्या बायकांचा पुरुष कंटाळा करतात हो !

मैत्रे०—पण म्हातारे कंटाळा करीत नाहींत.

सौदा०—म्हातारे कां म्हटलें ?

मैत्रे०—राहिलें ! तर मग आठ मुलांच्या ऐवजीं, आठ नवरे मिळोत, असा आशिर्वाद देऊं का ?

सौदा०—हें काय हो भटजी, आम्ही दासी झालों म्हणून भलती सलती थट्टा मेली ! —आणि आपल्या म्हातारपणची तरी चाड ठेवायची होती !

मैत्रे०—आशिर्वाद द्यायला म्हातारा काय, तरुण काय, दोघेहि सारखेंच. शिवाय आशिर्वाद देणाऱ्या पुरुषांचे केंस जितके अधिक पांढरे, तितका तो अधिक निरुपद्रवी असें समजून, बायका पांढऱ्या केंसांकडे आदरानें पाहातात. माझ्याशीं उद्धटपणें वागणारी तुझ्याशिवाय दुसरी दासी कोणीच नाहीं,— बाकी सगळ्याजणी बोलतात, चालतात,—

सौदा०—पांढरे केंस बायकांना आवडतात, म्हणून बायका तुमच्याकडें पाहातात, असें का तुम्हाला वाटतें ?

मैत्रे०—अल्बत, मला तर असेंच वाटतें !

सौदा०—पांढऱ्या केंसांकडे पाहण्याचें बायका टाळीत नाहींत, ह्याचें कारण एवढेंच कीं, म्हातारे पुरुष स्त्रियांच्या सौंदर्याच्या कसोटीचे दगड आहेत. म्हातारे देखील चोरून चोरून पाहूं लागले म्हणजे समजावें, कीं

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

आपल्या नजरेच्या विजेच्या तडाक्यानें तरुण घायाळ झालेच पाहिजेत.—वरें म्हातारे बावा ! मी आपल्याला आदरानें–विनयानें–विचारतें हो, मला हांक मारण्याची काय म्हणून मेहेरबानी झाली ?

मैत्रे०—सैरंध्री कोठें आहे ?—खरे मी विसरलोच, सैरंध्री आतां कीचक महाराजांचे नाटकशाळेंत रहावयास गेली असेल नव्हे ?

सौदा०—नाहीं, अजून नाहीं गेली.

मैत्रे०—हं ! हें कसें बोवा ?—कीचक महाराजांचा शब्द मत्स्यदेशांत खालीं पडायचा नाहीं, आणि सैरंध्री—

सौदा०—तें सगळे खरें—पण सैरंध्री कबूल नाहीं, आमच्या बाईसाहेबांचाहि तितका आग्रह काल नव्हता; पण आज—

मैत्रे०—आज काय झालें ?

सौदा०—अनुकीचकांनीं कीचक महाराजांचे मनांत भरवून दिलें आहे कीं, कीचकानुकीचकाचें वर्चस्व सुदेष्णाराणीसाहेबांना आवडत नसल्यामुळें कीचक महाराजांचा उपमर्द करण्याकरितांच सैरंध्रीला पाठवून दिली नाहीं; असें ऐकून प्रधानजी राणीसाहेबांना विनंति करीत होते, कीं सैरंध्रीला जर आपण होऊन पाठवून दिली नाहीं, तर अधिराजांचा उघड अपमान करून व एकेरीनें बोलून, सर्वांदेखत सैरंध्रीला नेण्याचा कीचक महाराजांचा विचार ठरला आहे.

मैत्रे०—मग सुदेष्णाराणीसाहेब घावरून गेल्या असतील ?

सौदा०—हें काय विचारावें ! महाराणीसाहेब कीचक महाराजांची समजूत करण्याकरितां त्यांच्याकडे गेल्या आहेत.

मैत्रे०—समजूत कसली ! सैरंध्रीला पाठवून दिली म्हणजे झालें. सैरंध्री आहेच तशी सुंदर—

सौदा०—तुमच्यासारख्या वुद्‌ढ्या ब्राम्हणाचे तोंडून जर तिची इतकी तारीफ तर कीचक महाराज तिच्या नादीं लागले ह्यांत आश्चर्य नाहीं !

मैत्रे०—मी नाहीं सैरंध्रीची वाखाणणी करीत ! कंकभटासारखा दासीबिसीच्या फंदांत पडणारा हा गडी नव्हे !

सौदा०—मग सैरंध्रीची इतकी विचारपूस कशाला ?

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

मैत्रे०—मी कंकभटाला हुडकतो आहे म्हणून तुझ्यापाशीं मी सैरंध्रीची विचारपूस केली.

सौदा०—कंकभटाला पाहावयाला निघालेल्यानें सैरंध्रीचा तपास काय म्हणून करायचा ?

मैत्रे०—त्यांतलें असें आहे, सैरंध्री जेथें आहे तेथें कंकभट असलाच पाहिजे. आणि मी उघड त्याचा पत्ता काढूं लागलो तर तो कांहीं मला थांग लागू देणार नाहीं.

सौदा०—कां ?

मैत्रे०—कारण, आपल्या चोंरटचा कर्मांत पुरुषांना त्यांच्या सोबत्यांनीं पकडले असतां डोकें मारल्यासारखें वाटून ते खजील होतात, आणि असल्या गुप्त कामांत बायका शेजारपाजारणींची होईल तितकी टाळाटाळी करीत असतात.–म्हणून म्हणतो, कंकभट माझें तोंड चुकविणार, आणि सैरंध्री तुला टाळणार. तेव्हां असें करूं कीं, मी सैरंध्रीचा तपास करतो आणि तूं कंकभटाला शोधून काढ, म्हणजे आपोआप दोघांचाहि तपास लागेल. चल ! (जातात)

प्रवेश तिसरा

स्थळ—महालक्ष्मीचें देवालय. कंकभट, वल्लभ, सैरंध्री बोलत आहेत.

कंक०—द्रौपदी, आम्हां पांडवांची शक्ति केवढी मोठी असली, तरी आज त्याचा काय उपयोग ? आमचें पूर्वीचें वैभव आठवावें आणि डोळ्यांतून पाणी काढावें, ह्यापलिकडे आजच्या आमच्या स्थितींत आम्ही काय करूं शकणार ? जरासंधाला ज्यानें सहज लीलेनें मारलें तो एकटा भीम सर्व कौरवांना पुरून उरण्याइतका बली आहे– पण आज आपण होता—असेंच म्हटलें पाहिजे. पांचाली, तुझ्या स्वयंवराचे वेळीं ज्या अर्जुनानें सर्व कौरव व इतर राजे ह्यांचा समाचार घेतला, राजसूय यज्ञाचे वेळीं ज्या धनुर्धरानें सर्व पृथ्वी पादाक्रांत केली, वनवासांत असतांना ज्यानें गंधर्वांचा मद उतरून सुयोधनाला सोडवून तुझ्या देखत सर्व कौरवांना खालीं माना घालावयास लाविलें, तोच महारथी आज हातांत वा..णें भरून बसला आहे ! आमचें सामर्थ्य उघडपणें दाखविण्याचे दिवस परमेश्वर आणीतों, सर्व मानापमान मुकाटचानें गिळणें हाच शहाणपणाचा मार्ग मी समजतो.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सैरं०—महाराज, आपण शांतिब्रह्माचे सागर आहां, तेव्हां जुलूम करणाऱ्यांच्या लाथा सर्वांनीं शांतपणें खाव्या, असें आपणास वाटतें तें ठीकच आहे. शिवाय वनवास संपल्यानंतर, हल्लींच्या अज्ञातवासांत दुसऱ्याच्या दुःखाची अटकळच आपणास करतां येईनाशी झाली आहे. आपणांस राज्यसभेंत बसावयास मिळतें, केवळ धर्माधर्माच्या वादविवादांत राजा आपली सल्लामसलत विचारून जुगाराचे दोन पैसे तोंडावर फेंकतो, एवढ्यावरच संतुष्ट होऊन, इंद्रप्रस्थाच्या सिंहासनाच्या मालकांनीं खुद्द आपल्या बायकोला परक्यांची वाईट रीतीनें दासी होण्यास सांगावें, ह्याहून पांडवांना लज्जास्पद गोष्ट कोणची?—गुलामगिरींत कांहीं दिवस गेल्यानें गुलामगिरींतच मजा वाटूं लागते, ह्याचें उदाहरण म्हणून, विराटनगरींतील पांडवांच्या वर्तनाकडे आपल्या पुत्रपौत्रांनीं बोटें दाखवू नये असें तरी आपण वागलें पाहिजे; एवढीच आपल्या दीन पत्नीची महाराजांच्या पायापाशीं विनंति आहे.

कंक०—द्रौपदी, कीचकाच्या नाटकशाळेंत तूं जा, असें मी एका शब्दानें तरी बोललो कां?

सैरं०—महाराज, काल जर कौरव हजर असते आणि पांडवांसमोर ह्या द्रौपदीला आपली नाटकशाळा करण्याची कीचकानें केलेली प्रतिज्ञा जर त्यांनीं ऐकली असती तर पांडवांना अज्ञातवासांत ठेवण्याचें सार्थक झालें, असेंच त्यांना वाटलें असतें.—महाराज, भरसभेंत त्या हलकट दुःशासनानें माझा पदर ओढला, त्यावेळीं मी द्यूतांत जिंकलेली दासी होतें, असें आपणांस वाटलें, म्हणून आपण कपाळावर हात मारून गप्प बसला; पण काल मी कांहीं गुलाम नव्हतें किंवा आपणहि गुलाम नव्हतां—

कंक०—द्रौपदी, आपण अज्ञातवासांत आहोंत हें तूं विसरूं नकोस.

सैरं०—म्हणूनच म्हणतें, आजची आमची स्थिति पाहून कौरवांना आनंद झाल्यावांचून रहाणार नाहीं.—महाराज, बारा वर्षें सोडून जन्मभर वनवास आला तरी पुरवला, पण हा अज्ञातवास—

कंक०—द्रौपदी, आपल्या पापामुळें एकदां आपण स्वस्थानापासून भ्रष्ट झालो म्हणजे वनवासाच्या यातना मनुष्याच्या कपाळीं लिहिलेल्या असतात. ह्या वनवासांत तो अक्कलहुशारीनें वागला, म्हणजे अज्ञातवासाचीं सुखें त्याला

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

मिळतात. ह्या अज्ञातवासाचे दिवस अक्कलहुशारीनें व आपली धर्मवृत्ति कायम ठेऊन त्यानें काढले, म्हणजे पुन्हां तो आपल्या पहिल्या स्थितीला जातो. संसाराचें रहाटगाडगे असें आहे.

सैरं०——महाराज, वनवासांत आपण पूर्वी कोण होतो, काय होतों, ह्याची आठवण तरी विसरून जावी लागत नाहीं. पांडव वनवासांत असतांनाहि पूर्वी-प्रमाणेंच सर्व जगाला आपल्या तेजानें थक्क करून सोडीत असत. पण आज आपली स्थिति काय आहे?——इंद्रप्रस्थाच्या सिंहासनाचे मालक आम्ही, असे शब्द प्रसिद्धपणें तोंडावाटे काढण्याची मोकळीक तुम्हाला आहे काय?–तुमच्या बायकोकडे वाकड्या नजरेनें पहाणाऱ्या जयद्रथाला पांच पाट काढून, गुलाम बनवून, फजित करून आपल्या वहिणीकडे पाहून जसें तुम्ही जिवदान दिलेंत, तसा पराक्रम करून दाखविण्यास "द्रौपदीपति","द्रौपदीपति" म्हणून तो नरपशू मिरवित असतांना तुम्ही पुढें कां सरसावला नाहीं?—— महाराज, वनवास जन्मभर पुरवला, पण पांडवांच्या सर्व सद्गुणांचा लोप करणारा हा अज्ञातवास एक क्षणभरहि नको. वनवासांत केवळ शरीराचे हाल होतात. पांडवांचा अज्ञातवास म्हणजे पांडवांनीं स्वखुशीनें, आपली पूर्वीची थोरवी विसरून जाऊन, दुसऱ्याच्या सत्तेखालीं राहण्याचें कबूल करणें होय. महाराज, स्वातंत्र्याचा आस्वाद घेणाऱ्या मनानें दोन दिवस स्वखुशीनें गुलामगिरींत घालविले तर तत्काळ तें मन लेचेंपेचें होऊन मानापमान त्याला कळेनासा होतो; किंबहुना अपमान सहन करणें व पूर्वपिठीका विसरून जाणें, हाच सद्गुण असें त्याला वाटू लागतें!——पांडव वनवासांतून सरळ हस्तिनापुराला गेले असते, तर शरिरानें दुबळे पण मनानें खंबीर असें कौरवांना दिसून, आमच्या शत्रूंना आमची भीतीच वाटली असती. पण महाराज, राजमंदिरांतील नोकरचाकरांना मिळणाऱ्या सुखाला लालचावलेले आजचे पांडव शरिरानें तुकतुकीत पण मनानें षंढ झालेले पाहून कौरव आनंदानें टाळ्या पिटतील !

कंक०——द्रौपदी, कीचकाच्या नाटकशाळेंत तूं जावेंस——

बल्ल०——दादा, कीचकानें द्रौपदीला नाटकशाळेंत ठेवणार म्हणून म्हटल्या-बरोबर तुम्ही गप्प कसें बसलां?——हा भीम जर काल हजर असता, तर जरासंधाला उभा चिरून एका जरासंधाचे दोन जरासंध जसे मी केले,

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

त्याप्रमाणें एका कीचकाचे दोन कीचक केले असते.--पांचालीनें मला कालची हकीगत सांगितली त्यावेळीं कीचकापेक्षां तुमचा राग मला अधिक आला. कीचक काय सांगून सवरून महा अधम. सूतपुत्र, महापशू तो. त्या हलकटाचें उद्दामपणाचें वर्तन तुम्ही कसें सहन केलेंत ?–दादा, तुमचें स्वतःचें छत्र त्या पशूच्या डोक्यावर धरलेलें पाहून तुमचें रक्त संतापानें ज्याअर्थी तापलें नाहीं, त्याअर्थी इंद्रप्रस्थाच्या छत्राला पांडव लायकच नाहींत असें मी समजतो.-- आम्ही पांडव जिवंत असतांना त्या सूतपुत्र कीचकानें "द्रौपदीपति" म्हणून मिरवावें हं ? दादा, धिःकार असो तुमच्या धर्माला आणि शांत शीलाला !

कंक०--भीमा, शांत हो. ह्या वेळीं क्रोधाच्या तडाख्यांत सांपडून अविचारानें व अधर्मानें आम्ही बिलकूल वागतां कामा नये. आमचें सुदैवच म्हणून, भीमा, तूं कालच्या समारंभास हजर नव्हतास.--तो नरपशू कीचक भीम हीं अक्षरे केवळ टांचेखालीं ठेंचतो, पण खरी वेळ आली म्हणजे भीमाच्याच लत्ताप्रहारानें त्या धर्मभ्रष्टाचा कपाळमोक्ष होणार हें मला पक्के दिसत आहे. पण द्रौपदी, आजची वेळ रागावण्याची नव्हे.–भीमा, आज संतापानें चिडून, उघडकीस येऊन, सुकुमार द्रौपदीनें पुन्हां वनवासांत जावें ही गोष्ट मला बिलकूल पसंत नाहीं. आजचा काळ जसा मला दिसत आहे तसाच पुढचाहि स्पष्ट दिसतो आहे,---

बल्ल०--मग काय, द्रौपदीनें कीचकाच्या नाटकशाळेंत जाऊन आपली काया भ्रष्ट करून घ्यावी असें म्हणतां ? आज हा अपमानकारक जुलूम सोसून पुढें कधीं काळीं इंद्रप्रस्थाचें राज्य कौरवांपासून घेऊन तरी काय करायचें आहे ? दादा, मी तुमचा धाकटा भाऊ झालो, ह्याची मला इतकी शरम वाटतें कीं, ह्या असल्या जगण्यापेक्षां अग्निकाष्ट खाऊन मेलेलें पुरवलें !--द्रौपदीला कीचकानें भ्रष्ट केली म्हणून सर्व दुनिया छीः थूः करीत असतांना, युधिष्ठिर महाराज आपली प्रतिज्ञा पूर्ण करून इंद्रप्रस्थाच्या सिंहासनावर चढूं पहातात काय ?--दादा, अजातशत्रू म्हणून कांहीं अग्निहोत्री आपला गौरव करितात, पण ज्यांना आपल्या बायकांवर जुलूम झाला असतांहि राग येत नाहीं, धिःक्कार असो त्यांच्या त्या अजातशत्रुत्वाला !

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

कंक०—भीमा, माझें बोलणें तरी ऐकून घेशील कीं नाहीं ? आज आपल्याला इतकें बिथरून जाण्याचें कांहीं कारण नाहीं. पांडवांना दुसऱ्याच्या सत्तेखालीं निमूटपणें दिवस काढण्याचें ठाऊक नव्हतें. अज्ञातवास कबूल केल्यानें दुसऱ्याची सत्ता स्वखुशीनें पांडवांनीं कबूल केल्यासारखी आहे. अशा स्थितींत जुलूम होत असला तरी उघडपणें आडदांडपणानें वागणें योग्य नाहीं. पुढच्या उत्कर्षावर दृष्टी ठेऊन आजचे वाईट दिवस आम्हांस कसे तरी कंठावयाचे आहेत.—द्रौपदी, तूं अशी खिन्न होऊं नकोस. हा वढाईखोर कीचक कितीहि बडबडला, तरी खरोखर त्याच्या नाटकशाळेंत जाण्याचा प्रसंग तुला येईलसें मला वाटत नाहीं.—महाराजा विराट उदारबुद्धीचा व कोमल अंतःकरणाचा असून महाराणी सुदेष्णा आपल्या सद्‌गुणांमुळें सर्व प्रजाजनांना प्रिय झालेली आहे.—द्रौपदी, शाब्दिक अपमान सांप्रतच्या स्थितींत आम्ही मुकाट्यानेंच गिळले पाहिजेत. पण तो दुष्ट कीचक आपल्या शब्दाप्रमाणें खरोखरच वागण्यास जर प्रवृत्त होऊं लागला तर सुदेष्णेचीं आर्जवें कर, पाया पडून महाराणीच्या सत्यनिष्ठेवर व औदार्यावर अवलंबून रहा. म्हणजे कीचकापासून तुला त्रास होणार नाहीं. (पडदा).

अंक पहिला समाप्त.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

UJWAL GRANTH BHANDAR
Appa Balwant Chowk.
POONA 2.

अंक दुसरा

प्रवेश पहिला.

स्थळ—राजमंदिरांतील पटांगण. राणी रत्नप्रभा, मैत्रेय आणि मंदहासिनी प्रवेश करितात.

रत्न०—अहो मैत्रेय भटजी,—

मैत्रे०—आज्ञा बाईसाहेब !

रत्न०—स्वारी कोणीकडे आहे ?

मैत्रे०—कीचक महाराजांची का विराट महारजांची ?

रत्न०—तिकडची म्हटलें हो !

मैत्रे०—तिकडची स्वारी इकडे आहे.

रत्न०—इकडे म्हणजे ?

मैत्रे०—इकडे म्हणजे तिकडे !

रत्न०—सुदेष्णाबाईसाहेबांना सांगितलें पाहिजे, कीं त्यांच्या दिमतीच्या माणसांना सरळहि बोलायला येत नाहीं.

मंद०—मैत्रेयभटजी, कीचकमहाराज कोणीकडे गेले आहेत, म्हणून बाईसाहेब विचारताहेत हो.

मैत्रे०—अग, तें तुझ्यासारख्या दासींना ठाऊक असणार ! राजवाड्यांत आल्यावर सैरंध्रीचा कीचक महाराज शोध करतात, का सौदामिनीची थट्टा करतात, का ह्या मंदहासिनीशीं हांसतात, आम्हांला काय माहीत ? शिवाय राणीसाहेब, असें आहे, कीचकमहाराजांची स्वारी राजमंदिरांत आली म्हणजे सूर्याला भिऊन जसें घुवडांनीं लपून बसावें, तशा ह्या सगळ्या दासी कोठें तरी लपून बसतात; आणि मग महाराजांची स्वारी अमक्याच ठिकाणीं होईल आणि अमक्याच ठिकाणीं होणार नाहीं त्याचा कांहीं नेम नाहीं !

रत्न०—अग मंदहासिनी, तूंच जरा दोन पावलें पुढें हो आणि शोध घे, स्वारी वत्सच्या महालाकडे झाली कीं नाहीं ती !

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

मैत्रे०—आणि हें पहा कीचकमहाराजांनीं सुदेष्णाराणीसाहेबांच्या महालांत पाय ठेविला कीं तावडतोब मला वर्दी दे. आज महाराजांकरितां. आमच्या बाईसाहेबांनीं साखरपाण्याचा बेत केला आहे. आणि मलाहि हजर रहाण्याचा हुकूम झाला आहे. म्हणून म्हणतो–ए हांसरे,–पानें ठेविलीं कीं अगोदर मला हांक मार. (मंदहासिनी जाते.)

रत्न०—मैत्रेयभटजी, मी एक तुम्हांला प्रश्न विचारतें; बाळबोध भाषेनें सरळ उत्तर द्याल ना ?

मैत्रें०—अगदीं बाळबोध आणि सरळ उत्तर देतो.—बायकांच्याकरितां सरळ,–आणि बालिकाबोध–भाषा कशी वापरावी, हें म्हणजे माझ्या हातचा मळ आहे. बाईसाहेबांना ठाऊकच आहे कीं, राणीवसांत लिहावयाला वाचायला शिकविण्याचें कामीं पूर्वीं महाराजांनीं माझीच योजना केली होती. बाईसाहेबांनीं प्रश्न विचारावा; बालिकाबोध–करपल्लवी–उत्तर पाहिजे असेल तसें देईन. तरुणीबोध–नेत्रपल्लवी भाषा पाहिजे असेल, तर तशी वापरीन; वृद्धाबोध–दंतपतनी–पाहिजे असेल तरी माझी ना नाहीं. कारण वेश्येप्रमाणें भाषा माझ्या मागें हात धुवून लागली आहे !,

रत्न०—तुम्ही मार्मिक पंडित आहांत, म्हणून विचारतें, खरें खरें मत सांगा हं. ती सैरंध्री दासी माझ्यापेक्षां सुंदर आहे का ?

मैत्रे०—बाईसाहेबांनीं तेवढे हिऱ्यामोत्यांचे दागिने मजपाशीं काढून ठेवावे म्हणजे मग मी मत देईन.

रत्न०—तें कां ?

मैत्रे०—अहो, आम्ही गरिब दरिद्री माणसें, श्रीमंतांच्या बायकांकडे पाहतांना त्यांच्या पोषाखाकडे आणि दागिन्यांकडेच आमची नजर जाते.–रुपाकडे जातच नाहीं.–बाईसाहेबांचे दागिने आणि सैरंध्रीचें रुप हीं आमच्या डोळ्यांत भरलेलीं !

रत्न०—बरे, सैरंध्रीच्या अंगावर जर हे दागिने घातले तर ती माझ्याहून चांगली दिसेल काय ?—तिकडचें मन सैरंध्रीवर कां बसावें ? मला खरें खरें सांगा हं !

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

मैत्रे०—बाईसाहेब, मी काय सांगू ? आम्हां पुरुषांची जात अशी गाजर-पारखी आहे कीं, एखाद्या हिडिंबेवरच प्रसन्न व्हायची ! त्रिभुवनांत सुंदर म्हणून नांवाजलेली द्रौपदीसारखी बायको असतांनाहि राजपुत्र भीमाचा हिडिंबेचा नाद सुटला नाहीं, हें आपण कर्णोपकर्णी ऐकलेंच असेल.— आणि बाईसाहेब, आपणच मनाशीं विचार करा, कीं पुरुषांना जर रूपाची खरी पारख असती तर चेहेरे रंगविण्याचा आणि दागिने घालण्याचा इतका अट्टाहास बायकांनीं केला असतां काय ? (सौदामिनी येते.)

सौदा०—अहो मैत्रेय भटजी, सैरंध्रीला कोठें पाहिलीत का ?

रत्न०—सौदामिनी, वन्स ग काय करीत आहेत ?

सौदा०—बाईसाहेब आपलीच वाट पहात आहेत. कीचक महाराजांची स्वारी केव्हांच आली ! (मंदहासिनी येते.)

मंद०—बाईसाहेब, महाराज आपल्याकरितां खोळंबून बसले आहेत.

रत्न०—चला मैत्रेयभटजी, मीहि आमंत्रण देते तुम्हाला.

(मंदहासिनी व रत्नप्रभा जातात. मैत्रेय जाऊं लागतो.)

सौदा०—अहो मैत्रेयभटजी, जरा थांबाल कीं नाहीं ? खायच्या गोष्टी निघाल्या म्हणजे म्हातारपण नाहींसें होऊन तरुणासारखें लागले उड्या मारीत जायला !

मैत्रे०—थांबून काय करायचें आहे ?

सौदा०—अहो, सैरंध्री कोठें आहे तें अगोदर सांगा. कीचक महाराज येऊन पानावर देखील बसायची वेळ झाली, आणि हिनें आपलें तोंड चुकविलें !

मैत्रे०—वाढायला, वारा घालायला, आणखी काय दासी कमी आहेत ? तोंड चुकविलें तर चुकविलें.

सौदा०—पण बाईसाहेबांनीं तिला हुडकून आणायला मला सांगितलें आहेना ? या सैरंध्रीला अक्कलच नाहीं. कीचक महाराजांची आवडती नाटक-शाळा होण्याचा योग, पण हिच्या नशिबी कोठें आहे ? देव देतो आणि कर्म नेतें !—शिवाय मी म्हणत होतें, ही एकदां कीचक महाराजांच्या नाटकशाळेंत शिरली, म्हणजे पायंडा पडला; एकीमागून दुसरी.

मैत्रे०—अग मग सैरंध्रीला कशाला हुडकतेस ? वेडी कुठली ! आजचे मेजवानीचें वेळीं तिचें काम तूंच कर, आणि कीचक महाराजांचे पुढें पुढें हो.—

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

समजलीस, आयती ती कोठें नाहींशीं झाली, तुझ्या पथ्यावरच पडलें.–हें बघ, कांहीं तरी पक्वानें वाढायला घेऊन, पुढें पुढें हो. चल; मला आग्रह करून यथेच्छ वाढ, म्हणजे कीचकमहाराजांपाशीं तुझी अशी शिफारस करीन कीं, त्यांची तुझ्यावर मर्जी बसावी.

सौदा०––आजचीं पक्वान्नें फारच चांगलीं झालीं आहेत !—तुम्हाला पोटभर वाढीन.—कीचक महाराजांपाशीं माझ्या सौंदर्याचें वर्णन कसें कराल, सांग पाहूं.

मैत्रे०—तुझें हाडकाचें व नासक्या कुसक्या रक्ताचें शरिर, राठ खरबरीत कातडीनें मढविल्यासारखें मनुष्यांचे डोळ्यांना दिसलें तरी वास्तविक तूं आंतून बाहेरून नुसत्या लावण्याच्या बनविलेल्या अप्सरेची पुतळी आहेस, असें कीचक महाराजांसारख्या दिव्य पुरुषांना वाटलें पाहिजे,––

सौदा०—असल्या बोलण्यानें पोटभर पक्वान्नें मिळत नसतात म्हटलें !

मैत्रे०—तुझा निस्तेज फटफटीत चेहरा इहलोकीं क्षयरोगी दिसला तरी तो परलोकीं चंद्रासारखा दिसेल; व तुझ्या तोंडातून घाणेरडी लाळ पडत असते असें लुच्चे लोक म्हणत असले तरी प्रेमी जनांच्या अधराचा स्पर्श होतांच त्या लाळेचें अमृत झाल्यावांचून रहाणार नाहीं असें मी कीचकमहाराजांना सिद्ध करून देईन,––

सौदा०––आणि समजलात कां भटजी, आजची फळफळावळ लांब दूर असलेल्या बागांतून आणविली आहे,––असल्या वर्णनानें ती फळफळावळ दृष्टीस पडत नसते बरें !

मैत्रे०––तुझ्या डोळ्यांना चिपडे असून ते नेहमी मिटल्यासारखे दिसतात, अशी फाजील तरुणांची तक्रार असली, तरी विचारी लोकांना तुझे डोळे मदनाच्या बाणांचा बंद केलेला मोठा भाता आहे, असेंच वाटतें;––

सौदा०––पुरे झाला हा चारगटपणा, चला आतां (हात धरून ओढीत नेतांना) खादीला ! –आज तुम्हाला इतकें वाढीन कीं पानावर टाकूनच उठावें !

मैत्रे०—तरुणांचें मन कसें आकर्षण करावे हें तुला माहीत नसलें, तरी वृद्धांचा हात धरून जाण्यांत तूं मुरलेल्या म्हातारीहूनहि अधिक सुग्रीण आहेस; अशी आतांच्या स्वानुभवावरून कीचक महाराजांपाशीं मी तुझी शिफारस करीन.

(जातात.)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

प्रवेश दुसरा

(विराट, कीचक, फराळास बसले आहेत; एकेक दासी प्रत्येकाला वारा घालीत आहे. कंकभट व मैत्रेय बसले आहेत. सुदेष्णा, रत्नप्रभा, मंदहासिनी, सौदामिनी उभ्या आहेत.)

सुदे०—वल्लभ, झालें का वाढप सगळें ? (वल्लभ बाहेर येतो.)

वल्ल०—झालें महाराज.

सुदे०—अरे आजची पक्वानें नीट तयार केली आहेस ना ? आज तुझ्या परीक्षेचीच वेळ आहे. कीचक महाराज नुकतेच हस्तिनापुराहून परत आले आहेत; तेव्हां त्यांनीं नांवे ठेवतां कामा नाहीं समजलास.

वल्ल०—दुर्योधनमहाराज केव्हां केव्हां इंद्रप्रस्थास युधिष्ठिर महाराजांना भेटण्याकरितां येत असत; त्यांना असले पदार्थ मी चारीत असें. आणि मग त्यांना जशी जन्माची आठवण रहात असे, तसाच कीचकमहाराजांकरितां बेत ठेविला आहे महाराज !

सुदे०—सर्व वाढून झालें.—दादाला बसायला सांगायचें होतें.

विरा०—वसायचें कीचकमहाराज.

सुदे०—मैत्रेयभटजी, हं, आरंभ करा !

मैत्रे०—कंकभट, हं, पहातां काय ?

सुदे०—आतां वाट कोणाची पहावयाची ?—वसायचें होतें दादा.

विरा०—आरंभ करायचा महाराज.

कीच०—पण ती कोठें आहे ?—मघापासून तुला अक्का सांगतो आहे कीं, तिच्याशिवाय आपण एका पदार्थालाहि हात लावणार नाहीं.—ती येऊं दे मग बसूं—तोंपर्यंत बसत नाहीं.

सुदे०—[रत्नप्रभा राणीसाहेब तर येथेंच उभ्या आहेत हो ! दादा,—नवराबायकोचें तुमचें इतकें प्रेम आहे, हें नव्हते मला माहीत !—राणीसाहेब, जरा आपण दादाजवळ उभें राहावयाचें. आपण जवळ नसला म्हणजे दादाचा घांस खालीं उतरत नाहीं हो !] परिस्थितीजन्य विनोद.

विरा०—नवराबायकोचें प्रेम असावें तर असेंच असावें !—धन्य कीचक-महाराज, धन्य रत्नप्रभा राणीसाहेब !

मैत्रे०—महाराज, हस्तिनापुरास असतांना घशांत घांसवीस अडकून नाहींना वसले ?

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

कीच०—अधिराज विराटमहाराज,—सुदेष्णाराणीसाहेब,—हिच्याकरतां मी खोळंबून बसलो आहे, असें का तुम्हांला वाटतें ?—अक्का, चार दिवसांपूर्वी मी तुझ्यापाशीं तुझी सैरंध्री मागितली होती; पण ह्या चार दिवसांत पहातों तो, माझ्या मागणीची कोणाला आठवणहि राहिली नाहीं !—त्रिगर्तांच्या केलेल्या पराभवाची आठवण ताजी होती त्यावेळीं मला काय आवडेल याचा अंदाज बांधून माझा शद्व—उत्पन्न होण्याच्या अगोदरच—झेलला जात असे.—मी आठदहा महिनेच काय तो मत्स्यदेशांत नव्हतो, एवढ्या अवकाशांत माझ्या शद्वाची किंमत इतकी कमी झाली हं !—काल मला साखरपाण्याला आपण—महाराणी-साहेब—बोलवायला आला, त्या वेळीं मी पुन्हां सैरंध्रीबद्दल मागणी केली, व साखरपाण्याला पाटावर बसण्यापूर्वी, माझी दासी म्हणून, सैरंध्री जर माझ्या हवाली करण्यांत येणार असली तरच मी येईन; नाहीं तर येणार नाहीं; असेंहि महाराणीसाहेब, आपणांस मी बजावलें.—त्या वेळीं महाराणीसाहेब, आपण काय उद्‌गार काढलेत, ते आपणास आठवत नाहींत काय ?—मी पाटावर पाय ठेवल्यापासून सैरंध्री माझी होईल, मेजवानीचेवेळीं माझ्या सेवेला माझी दासी म्हणून सैरंध्री तत्पर राहील व साखरपाण्याहून परत जातांना सैरंध्रीला मी बरोबर घेऊन जावें, असें महाराणीसाहेब, आपण आमंत्रणाचेवेळीं वचन दिलें होतें.

सुदे०—होय, वचन दिलें होतें,आणि फराळ झाल्यावर सैरंध्रीला मी आपल्या हवालीहि करणार आहे.

कीच०—फराळ झाल्यावर ?—मी पाटावर पाय ठेवल्यापासून सैरंध्री माझी झाली पाहिजे.—कोठें आहे ती ?—ती दृष्टीस पडल्याशिवाय आम्ही एकहि पदार्थाला हात लावणार नाहीं.—कोठें आहे ती ?—काय, नाहीं येत ?—दहा महिन्यांपूर्वी मत्स्यदेशांत माझा असा अपमान होत नव्हता.—पाटावर पाय ठेवल्याबरोबर सैरंध्री माझ्या सेवेला हजर राहील म्हणून काल वचन, आणि आज येथें येऊन बसलों तों हा धटिंगण बल्लव वाढायला आमच्यापुढें उभा !—जा, असल्या धटिंगणानें वाढलेले पदार्थ आम्ही खात नसतो— (ताट दूर लोटतो)

विरा०—असें काय कीचकमहाराज, तिच्या हातून जर कांहीं अपराध झाला असला, तर फराळानंतर त्याचा विचार करूं.

मैत्रे०—वाढलेलें अन्न लोटून देऊं नये.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

कंक०—अन्नं ब्रह्मेति व्यजानात् . अन्नाचा शाप बाधल्याशिवाय रहात नाहीं.

कीच०—गप्प बसा भटुर्ग्यांनो; तुम्हाला ह्या थोर श्रीमंतांच्या गोष्टी काय होत ? ज्यांना दुसऱ्यांचीं आर्जवें करून, भिक्षा मागून, अन्नाचे दोन घास मिळवावयाचे असतात, त्यांनीं पाहिजे तर अन्नाला डोक्यावर घेऊन नाचावें. तुमचा जन्म अन्नाकरतां आहे; आणि अन्नच काय, जगांतील सुखोपभोगाचे सर्व पदार्थ मजकरितां आहेत.—ह्या अन्नाची मजपुढें प्रतिष्ठा काय ?—ज्याच्या बाहुबलानें राजे, महाराजे, अधिराजे, उत्पन्न होतात, हुकमाचे शद्व ज्याच्या मुखांतून निघण्याचा अवकाश कीं त्याबरोबर अभिषिक्त राजे, महाराजे, अधिराजे, ह्यांना आपल्या वडिलोपार्जित सिंहासनावरून निमूटपणानें खालीं उतरावें लागतें, नवीन राज्यें भरभराटीस आणणें आणि जुनीं नांवाजलेलीं लयास नेणें, ही ज्याची रोजची सहज लीला, असल्या मजसारख्या वीर पुरुषाच्या पुढें विश्वांतील सर्व सुखोपभोगाचे पदार्थ हात जोडून सेवेला तत्पर उभे राहिले पाहिजेत.—सुदेष्णा महाराणीसाहेब, जबरदस्तीनें इंद्राला स्वर्गांतून हाकून लावून, इंद्राणीला जवळ ओढून घेऊन, स्वर्गाच्या सिंहासनावर बसण्याची माझी योग्यता असतांहि केवळ पूर्वपरंपरेला मान द्यावा म्हणून, आणि एकदां मी चुकून आपणांस बहिण असें म्हटलें तें सदोदितचें खरें व्हावें म्हणून, मी त्रिगर्तांचा पराभव केला व मत्स्य देशाच्या सिंहासनाचें पुनरुज्जीवन केलें. विराट महाराजांच्या आणि महाराणीसाहेब आपल्या मस्तकावर मी पुन्हा राज्याभिषेक केला, आणि काल परवां भारतेश्वराकडून विराट महाराजांना अधिराज ही पदवी मी आणिली.—याप्रमाणें चुकून माकून तोंडांतून निघालेला शद्वदेखील मी खरा करून दाखवित असतां, एक यःकश्चित् दासी मी मागावी, आणि तिला द्यायला तुमच्या जिवावर यावें; फार चांगली कृतज्ञता, फार चांगली कृतज्ञता !—अक्का, माझी इच्छा आहे,—मी सांगतो,—आमचा हुकूम आहे—सैरंध्रीनें हें ताट उचलून नेऊन, आम्हाकरतां आपल्या कोमल हातानें दुसरें ताट वाढून आणलें पाहिजे; आणि आमचा फराळ चालला असतां, आम्हांजवळ उभें राहून आम्हाला वारा घातला पाहिजे.—कोठें आहे सैरंध्री ?—सैरंध्री ?—नाहीं येत ?—उठलो आम्ही तर मग !

सुदे०—जरा थांबावयाचें, आणखी पाठवितें हो तिला बोलवायला माणूस; सैरंध्री आतां येईल. अग सौदामिनी, सैरंध्री गेली तरी कोठें ? तिला लवकर ये म्हणावें.

स्वतःचे तोंडाने स्वतःच्या पराक्रम वर्णन करण्याऽ डौल, मदांध, अहंकार वगैरे वर दिसतात

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सौदा०—पाकशाळेंत वल्लभानें तिला आपल्या हाताखालीं घेतली आहे, आतां वाढलेल्यापैकीं बरेच पदार्थ सैरंध्रीनें केलेले आहेत म्हणे.

कंक०—सैरंध्रीच्या हातचा स्वयंपाक चाखायला मिळावा म्हणून दूरदूरचे महर्षी इंद्रप्रस्थास येत असत.

मैत्रे०—हे पदार्थ इतके चांगले झालेले दिसतात कीं माझ्या तोंडाला तर पाणीच सुटले आहे.–सैरंध्रीचे हात पोटांत न जातां बल्लभाचे पोटांत गेले तरी आपली तक्रार नाहीं.

रत्न०—मी हें ताट उचलून नेतें आणि पुन्हां दुसरे वाढून आणतें.

CH. कीच०—आपल्या सुंदर हातांचें माहात्म्य आपल्या महालांत; तुझ्या महालांत नसल्यावर आम्ही कांहीं तुझे गुलाम नाहीं.

रत्न०—वायकांची सत्ता सर्व ठिकाणीं सारखीच असते हो.

(ताट उचलू लागते.)

CH. कीच०—खबरदार, जिला जें काम सांगितलें तें तिनें करावें. पट्टराणीचा मान सोडून नाटकशाळेंतील दासी व्हावयाचें आहे वाटतें मनांत ?

विरा०—सैरंध्री कीं कोण दासी ती, कीचकमहाराजांच्या आवडत्या दासीला हांक मारा. क्षुल्लक गोष्टीकरतां कसलीं रणें माजवितां आहां ?

वल्ल०—ती स्वयंपाकगृहांत कामांत गुंतली आहे.

सुदे०—सौदामिनी, तूं जा तिच्या जागीं;–आणि तिला पाठवून दे.

सौदा०—मी तिकडेच जात होतें, पण वल्लभ जाऊं देईना !

मैत्रे०—कायरे बेट्या वल्लभा, तुलारे काय ? हाताखालीं खटपटीला सौदामिनी काय ? सैरंध्री काय ?

कंक०—जरा हुषार माणूस हाताखालीं असलें म्हणजे पाकसिद्धि चांगली होतें.

सुदे०—इतकीं चाकर माणसें हाताखालीं आहेत. वल्लभ, सैरंध्रीला दे पाठवून.

मैत्रे०—राजे लोकांनीं करावयाचे हट्ट आचारी पाणक्यांनीं करून कसे चालतील ?—सौदामिनी, तूं जा ग पाकशाळेंत ! (सौदामिनी जाऊं लागते.)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

वल्ल०––चल फीर मागें, शेंबडी कोठली ! ––महाराज, असल्या दासी जर स्वयंपाकगृहांत ढवळाढवळ करूं लागल्या, तर पदार्थ सगळे नासून जातील.–– मी नाहीं स्वयंपाकगृहांत हिला पाऊल टाकूं देणार.

सौदा०––मी तरी काय करूं बाईसाहेब ?–हुकूम होत असेल तर मी पाहिजे तर कीचक महाराजांना वारा घालीत उभी राहतें. (वारा घालूं लागते.)

कीच०––चल हो दूर ढालगज, शेंबडी !–अंगठींत खापरखुंटीचा खडा कोणी बसवित नसतें !

सौदा०––(दूर होऊन स्वगत) पुरुषांची जात मेली गाढवांसारखी !–– जवळ जाऊन आर्जवें केलीं म्हणजे ह्यांनीं लाथा मारल्याच !

मैत्रे०––सैरंध्री महाराणीसाहेब पुढें येताहेत, का आम्हाला भरलेल्या ताटावर बसून उपास घडणार ?

सुदे०––मीच जाऊन तिला घेऊन येते.––चल ग मंदहासिनी, मजबरोबर चल. (सुदेष्णा व मंदहासिनी जातात.)

कीच०––विराट महाराज, आपल्या दरबारांत बायकांचें प्रस्थ फार माजलेलें दिसतें !––यःकश्चित् दासी, आणि तिला बोलवायला सुदेष्णा महाराणीला जाणें भाग पडावें हं !––बायकांचें प्रस्थ कसलें म्हणा !––महाराज, मी साफ सांगतो, महाराणीच्या असल्या लपंडावानें मत्स्यदेशांत मी कधींच निस्तेज व्हावयाचा नाहीं.–त्रिगर्तांना जिंकण्याची धमक आपल्या घराण्याचे मनगटांत येईतों कीचकाचा अपमान करून आपलें भागावयाचें नाहीं; ––

विरा०––हे काय भलतेच विचार !––आपला अपमान आम्ही कधीं तरी करूं काय ? सैरंध्री फारच चांगल्या स्वभावाची आणि पोक्त विचाराची बायको आहे.

कंक०––आणि म्हणूनच महाराणीसाहेबांचें तिच्यावर प्रेम फार आहे.
[(पडद्यांत ––बाईसाहेब मी पायां पडतें, पदर पसरून भीक मागतें, ह्या दुष्ट लांडग्याच्या जुलमांतून ह्या गरीब गाईला कसेंहि करून सोडवा.) नाट्यात्मक परिणा

कीच०––(उठून) विराट महाराज, ह्या मत्स्यनगरींत, तुमच्याच मंदिरांत आणि माझ्या नोकरांसमोर मला एखाद्या दासीनें दुष्ट लांडगा म्हणावें, आणि तुम्ही सर्वांनीं चांगल्या स्वभावाची म्हणून त्या दासीची तारीफ करावी; आश्चर्य आहे !––आश्चर्य तरी कसलें ? राणीसाहेब, आतां मला तुमचें कारस्थान

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

समजलें ! सैरंध्रीला प्रथम दूर पाठवून सर्वांदेखत माझा अपमान करावयाचा, आणि पुन्हा त्या दासीकडून माझ्या तोंडावर दुष्ट लांडगा, अशी मला शिवी देऊन सर्व नोकरांच्या दृष्टीनें मला कःपदार्थ करून सोडावयाचें एवढ्याकरतां हा मेजवानीचा थाट हं ! —बस्स, आम्ही येथून आतां चाललो, त्या दासीकडून उघड तोंडावर अप्रतिष्ठा करून घेण्याची वाट पहात बसण्याइतका हा कीचक मूर्ख नाहीं.—[राजा विराट, मत्स्यदेशावर ह्या कीचकाचे केवढे उपकार आहेत, हें ध्यानांत आण, आणि मग माझा अपमान करण्याच्या तुझ्या वायकोच्या साहसाला उत्तेजन दे.—राजा विराट, माझ्या बाहुबलानें तुझें डळमळणारे सिंहासन जर स्थिर झालें नसतें, तर तुझी ही राणी त्रिगर्तांच्या सैन्यांतील एखाद्या क्षुल्लक सारथ्याच्या नाटकशाळेंत आज नाचत राहिली असती.]

विरा०—हें काय कीचकमहाराज ! भलताच संशय !—थोडक्या वेळांत मी आपली खात्री—

कीच०—राजा विराट, माझी शक्ति केवढी प्रचंड आहे, हें नीट लक्षांत घे.—मी मनांत आणलें तर मत्स्यपुरींतील नव्हे, तर सर्व जगांतील पाहिजे ती तरुणी केवळ माझ्या बाहुबलानें मी आपल्या नाटकशाळेंत ओढूं शकतो.—राजा, पांडवांची राणी द्रौपदी हिला आपली नाटकशाळा बनविण्याची ज्या वीराची प्रतिज्ञा, त्याच्यापुढें तुझ्या मंदिरांतल्या दासीनीं "नाहीं" असें उत्तर दिलें असतां, त्याचे काय भयंकर परिणाम होतील, ह्याचा विचार कर. बस्स. आतां मी येथून जातो, आणि चार दिवसांचे आंत सैरंध्री जर माझ्या नाटक-शाळेंत रहावयास आली नाहीं, तर हा आजचा अपमान—मी बोलून दाखवित नाहीं—नीट विचार करून काय करायचें तें कर. (जातो.)

विरा०—हें काय ? इतका राग ! क्षुल्लक बाब !—चल मैत्रेया, कीचक-महाराजांचें आपण जाऊन शांतवन करूं. (जातो.)

मैत्रे०—(जातांना) सर्व ग्रह आज माझे वाईटच असले पाहिजेत, नाहीं तर पक्वान्नाच्या राशी पुढें पडल्या असतांना नुसत्या डोळ्यांनीं भोजन करण्याचें हें मरण मला कां आले असतें ? (जातो.)

(सुदेष्णा सैरंध्रीचा हात धरून तिला बाहेर आणते.)

सैरं०—बाईसाहेब मी पाया पडते,—पदर पसरून मी भीक मागते,—त्या दुष्ट लांडग्याच्या स्वाधीन ह्या गरीब गाईला करूं नका हो.

• हिंदुस्थानची असहाय्य जनता.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सुदे०—हें काय, कीचकमहाराजांची स्वारी गेली वाटते रागावून !—सैरंध्री, अग, तूं दासी, आणि तुझ्यामुळें कीचकमहाराजांचा अपमान होऊन त्यांनीं येथून रुसून जावें हें तुला शोभतें का ? वहिनी, तुम्ही तरी त्यांना कांहीं सांगावयाचें होतें !—ह्या दासी अशा मस्तवाल झाल्या आहेत, तुमच्या आमच्याहून मेल्यांची मिजास जास्त !—जा सैरंध्री, अशी जा,—ह्या पावलीं कीचकमहाराजांच्या मंदिराकडे जा,—त्यांच्या पाया पड,—त्यांच्यापुढें नाक घास,—आणि आपली नाटकशाळा होऊन राहण्याकरितां मी आलें आहे, अशी त्यांना हात जोडून विनंति कर.

सैरं०—बाईसाहेब, आपणच माझ्यावर अशा रागावला, तेव्हां मजवर परमेश्वरच कोपला आहे, असें म्हटलें पाहिजे. बाईसाहेब, दुर्दैवाचा प्रसंग ओढवल्यामुळें आलेले वाईट दिवस आपल्यासारख्या साध्वीची नोकरी करून कंठण्याचें माझ्या नशिबी आलें असलें, तरी धर्म, नीति, अब्रू ह्यांची चाड मला आहे. बाईसाहेब, माझ्या पातिव्रत्याचा भंग करणारे हें नीच काम मला सांगून, बायकांचा दुर्गुण वाढलेला पाहून साध्वींना आनंदच होतो असा आपल्या निष्कलंक कीर्तीचा दुर्लौकिक कां करून घेतां ?—बाईसाहेब, सद्‌गुणांबद्दलची आपली आवड, धर्मावरची आपली श्रद्धा, आणि अनाथांबद्दलचा आपला कळकळा, हीं ऐकून मी माझ्या आपत्तीच्या वेळीं आपल्या सावलीला रहावयाला आलें. माझ्या पतींना मी अप्रिय होईन अशी कोणचीच सेवा मी करणार नाहीं, आणि कोणच्याहि पुरुषाची दासी होणार नाहीं, अशी मी चाकरीला राहिलें त्यावेळीं आपल्या पायापाशीं विनंति केली होती, आणि आपणहि आपल्या पाठच्या वहिणीप्रमाणें माझ्या अब्रूचें रक्षण करीन म्हणून मला वचन दिलें होतें;—

सुदे०—तें कांहीं नाहीं; सैरंध्री, तुला ह्या पावली कीचकमहाराजांच्या नाटकशाळेंत गेलेंच पाहिजे.

सैरं०—आपलें वचन आपण विसरून गेलांत, ह्याबद्दल बाईसाहेब, मी आपणाला दोष देत नाहीं—माझें पूर्वजन्मीचें कांहीं तरी भयंकर पातक असलें पाहिजे, नाहीं तर महासाध्वी म्हणून नांवाजलेल्या आपल्यासारख्यांच्या धर्मभीरू अंतःकरणाला एखाद्या कुंटिणीला साजेल असें हें वर्तन कसें पसंत पडलें असतें !

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

CH. कंक०—सुदेष्णा बाईसाहेब, रत्नप्रभा राणीसाहेब, दुःखानें आणि संतापानें सैरंध्रीला सांप्रत घेरलें असल्यामुळें, कीचकमहाराजांसबंधानें किंवा आपणां-संबंधानें बोलतांना तिच्या तोंडून एखादा अविचाराचा शब्द बाहेर पडला तर आपण ह्या प्रसंगीं तिला माफी केली पाहिजे—तिच्या विनंतीचा आशय इतकाच आहे कीं, प्रसंगविशेषीं एखाद्या मनोविकाराच्या जाळ्यांत सांपडून कीचक महाराजांसारखे प्रतापी पुरुष पापाचरण करण्यास जर चुकून प्रवृत्त झाले, तर त्यांच्या पूर्वीच्या परंपरेनें आलेल्या सद्गुणांकडे त्यांना पुन्हां वळविण्याचें काम आपल्यासारख्या पुण्यशील, धर्मशील, पतिव्रतांच्या हातून सहज होणारें आहे. कीचकमहाराजांना धर्माच्या दोन गोष्टी सांगून त्यांची धर्मबुद्धि पुन्हां पूर्वींच्या सारखी प्रखर करण्याचें पुण्य आपणासारख्या पतिव्रतांच्याच पदरीं पडणें योग्य आहे.

सुदे०—वहिनी, मी मोठ्या वुचकळ्यांत पडलें आहे. दासीकरतां रदबदली केली तर कीचक महाराजांना कितपत रुचेल हें समजत नाहीं. बरें, सैरंध्रीला तरी तिच्या इच्छेविरुद्ध त्यांच्या महालाकडे जा कसें म्हणावें ? तुम्हीच सांगा बाई !

[सैरं०—रत्नप्रभाराणीसाहेब, सुदेष्णाबाईसाहेब, मत्स्यदेशांत महापतिव्रता म्हणून आपली ख्याति आहे.—मी सांप्रत गरीब स्थितींत असून दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलें असलें तरी आपल्यासारख्या महासाध्वींचा मनापासून कित्ता गिरवावा अशी माझी इच्छा आहे. (पाया पडून) बाईसाहेब, मी आपले अनाथ लेकरूं आहे असें समजा.—रत्नप्रभाराणीसाहेब, माझ्या ह्या बोलण्यां आपल्या पतीचा मनोभंग होईल, म्हणून आपण मनांत विचार आणण्यापूर्वं मजसारखा प्रसंग पतिव्रता सुदेष्णाबाईसाहेबांवर जर आला तर त्यांच्या पतींच्या मनाला ,—आपले मानलेले भाऊ विराट महाराज ह्यांच्या मनाला,—किती दुःख होईल ह्याची अगोदर कल्पना करा—सुदेष्णाबाईसाहेब, ह्या गरीब दासीला जो आपण हुकूम करीत आहां तशाच प्रकारची आज्ञा ऐकण्याची वेळ रत्नप्रभाराणीसाहेबांना जर आली तर पतिव्रता ह्या नात्यानें त्यांच्या मनावर दुःखाच्या डागण्या कशा दिल्यासारख्या होतील, इकडे लक्ष द्या.—आपण दोघी महासाध्वी व पतिव्रता आहां. पातिव्रत्याच्या भंगापेक्षां मरणं कुलीन स्त्रियांना कसें बरे वाटतें हें आपणाइतकें जगांत फार थोड्या स्त्रियां

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

समजतें. म्हणूनच मी आपणापाशीं पदर पसरून भीक मागते कीं,एखाद्या दासीला हुकूम करीत आहों असें न मानतां आपणासारख्याच दुसऱ्या एका पतिव्रतेला नाटकशाळा व्हावयास आपण सांगत आहां, ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करूं नका; आणि पतिव्रता कुलीन स्त्री संकटांत सांपडलेल्या पतिव्रतेकडे ज्या दयार्द्र दृष्टीनें पाहते त्याच दयार्द्र दृष्टीनें मजकडे पहा.—आपण मालक, मी चाकर हें नाते उदारबुद्धीनें क्षणभर विसरा; कुलीन वायकांची अब्रू कुलीन वायकांनीच होईल तितक्या तजविजीनें सांभाळायची असते, ह्या स्त्रीजातीच्या सहजधर्माच्या आड आपण येऊ नका; आणि आपल्या ह्या गरीब धर्मभगिनीच्या पातिव्रत्याचें रक्षण करा.]

सुदे०—सैरंध्री ऊठ, उगीच शोक करूं नको. तूं सद्गुणी आहेस, शहाणी आहेस, हें मला समजतें; म्हणूनच मी कीचकमहाराजांच्या पहिल्या दिवशीच्या मागणीची टाळाटाळ केली. पण ह्या टाळाटाळीनें आपला अपमान होतो असें त्यांनीं उद्गार काढल्याविषयीं मला समजलें, म्हणून मी काल त्यांना तसें वचन दिलें.—आतां कीं नाहीं ह्या सर्व प्रकरणाला राजकाजाचें स्वरुप येऊं पहात आहे; आणि राजकाजाचा प्रश्न उद्भवला, म्हणजे सद्गुणांना कर्ते पुरुष किंमत देत नाहींत, हें तुला माहीतच आहे.

CH. कंक०—राजकाज व धर्मनीति ह्या जोडीनें हातांत हात घालूनच चाललें पाहिजे.—राजकाजानें धर्मबुद्धीची पायमल्ली करतां कामा नये. ह्या गोष्टीची राजकर्त्या पुरुषांची आठवण नाहींशी होऊं नये अशी खबरदारी घेण्याकरतांच आपल्यासारख्या महासाध्वींना राणीपदाचा मान देण्यांत येत असतो.— पुरुषांच्या स्वेच्छाचारी मनोवृत्तींना वायकांनीं जर आळा घातला नाहीं, तर पुरुषजातीच्या बरोबर स्त्री जात उत्पन्न करून पुरुषांना वेलगामी होऊं न देण्याची ब्रम्हदेवाची युक्ति फुकट गेली असेंच म्हणावे लागेल.

सुदे०—कंकभट, मला ह्या सर्व गोष्टी कळतात, पण ह्या प्रसंगीं वागावें कसें हेंच समजत नाहीं.

रत्न०—महाराणीसाहेब, मला कीं नाहीं ह्या सैरंध्रीकडे पाहिलें म्हणजे वाईट वाटतें. तिकडच्या म्हणण्याप्रमाणें वागायला जर ही आपखुषीनें तयार झाली असती तर तर मीहि तिकडच्या इच्छेच्या आड गेलें नसतें; व परमेश्वरानें इतकें सुंदर स्वरुप हलक्या मनाला देण्यापेक्षां दुसऱ्या एखाद्या पतिव्रता कुलीन

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

स्त्रीला कां दिलें नाहीं म्हणून परमेश्वराची निर्भत्सना करीत मी स्वस्थ बसे असतें. पण हिची धर्मबुद्धि पाहून, मला कीं नाहीं ही खरोखर माझ्या वहिणी-सारखी वाटतें.–सैरंध्री, तूं उगीच आतां शोक करूं नकोस.–महाराणीसाहेब चार दिवसांची अवधी तिकडून देण्यांत आली आहे, तेवढ्या अवकाशांत मी तिकडचें मनच बदलून टाकतें, मग तर झालें ना?

सुदे०—रत्नप्रभाराणीसाहेब, आपण मनावर घेतल्यावर काय नाहीं होणार!

(पडदा)

प्रवेश तिसरा

स्थळ—रस्ता. विद्याधर काखेंत पोथी असा, व सिद्धपाक आचारी हातांत झारा, चंची, व तंवाखू चघळीत असा, प्रवेश करितात.

सिद्ध०—ए विद्याधर, बेटचा इकडे ये, चुकवून जावें म्हणतोस, इकडे ये वा: असा घाईघाईनें कोठें जातोस?

विद्या०—आलो, काय काम आहे तें लवकर बोल. मला गुरुजींच्या घरीं लवकर गेलें पाहिजे.

सिद्ध०—अरे हो ठाऊक आहे! म्हणून कांहीं एवढें घाईनें नको जायला!

विद्या०—छे बाबा, दुरूनच बोल, पोथीवर देखील त्या थुंकीचे शितोंडे उडाले!

सिद्ध०—(पिचकारी टाकून) चुकून असें होतें,—आतां नाहीं उडावयाची.

विद्या०—फार अमंगळ! स्वयंपाक करतांना कसें होतें रे सिद्धपाक?

सिद्ध०—अरे, कालच गंमत झाली! कीचक महाराजांना एका अनु-कीचकाच्या घरीं मेजवानी होती, आणि मांसाच्या तुकड्यांची कढी कढत असतां आमचा मुखरस कढीच्या भांड्यांत असा पडला! पण कीचक आणि अनुकीचक कढीचे असे प्रेमानें भुरके मारीत होते कीं यंव!

विद्या०—छे बोवा, अगदीच अमंगळ! गुरुजी म्हणत होते, आतां इतक्यांत कलियुग सुरू होणार म्हणून, तें कांहीं खोटें नाहीं म्हणायचें.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सिद्ध०——मला सुद्धां असेंच वाटतें;–काल–किंवा फार झालें तर आज सकाळींच–नाहीं तर दोन तीन महिन्यांपूर्वीच–कलियुग सुरू झालें. दोन तीन महिन्यांपूर्वी पाताळकुरूंतला एक मांत्रिक आमच्या आचारी पाणक्यांच्या अड्डयावर आला होता; त्यानें ही ताम्रमुखी पूड आम्हां सर्वांना दिली.–आम्ही पाठोपाठ तोंडांत टाकली; (चिमूट तोंडांत टाकतो) आणि एकमेकांच्या अंगावर अशी थुंकी उडाली ! लगेच त्या पाताळी मांत्रिकानें कलियुग सुरू झालें म्हणून टाळ्या वाजविल्या; आणि काय ? कलियुग लगेच सुरू झालें ! हें कलियुग सुरू झाल्यापासून आम्हां आचाऱ्यापाणक्यांना ही ताम्रमुखी पूड खाल्ल्याशिवाय चैनच पडत नाहीं.

विद्या०——कसली ती ताम्रमुखी पूड ! दाखीव पाहूं !–लांबून–लांबून–मला तिचा विटाळ नको–नाहींतर माझ्या अंगांत कली शिरेल.

सिद्ध०——मोठा आला आहे विटाळाच्या गोष्टी सांगायला ! माझी थुंकी नाहींका तुझ्या अंगावर उडत आहे ?

विद्या०——हिला ताम्रमुखी कां म्हणतात ?

सिद्ध०——त्या मांत्रिकानेंच हें नांव सांगितलें. पाताळांतल्या ताम्रांच्या मुखांत ही नेहमी असते, म्हणून हिला ताम्रमुखी–ताम्रखू–किंवा तंबाखू म्हणतात.–घे, तुला घे, थोडकी——

विद्या०——छें, मी शिवणार देखील नाहीं.

सिद्ध०——अरे जा, कलियुग जोरांत आले, म्हणजे तुझे गुरुजीदेखील संथा देतांना हीच पूड चघळीत बसतील.——बरे, मी तुला असें सांगणार होतो, काखेंत पोथी मारून तूं शिकत फिरणार किती दिवस ? [कलियुग सुरू होऊन दोन तीन महिने झाले आहेत. आतां आम्हां आचाऱ्यांना,–किंवा गांवांतल्या दारूविक्यांना–जो मान आहे, तो तुम्हां विद्वान पंडितांना कांहीं मिळणार नाहीं.] राजकारणावर टीका

विद्या०——नाहीं बाबा, आम्हांला कोणी विचारीत नाहीं.——गुरुजी आणि दुसरे मोठे मोठे पंडित काल कीचकमहाराजांना आशिर्वाद द्यायला गेले होते. दरवाजावर दोन तास त्यांना उभें रहावे लागलें. शेवटीं निरोप आला कीं, इंद्रप्रस्थास धर्मराजाच्या वाड्यांत खाऊ खाऊन पंडितांनीं पांडवांना वनवासास पाठविलें तसा हा कीचक पंडितांच्या नादाला लागून बुडणारा नव्हे !

राज्ययंत्र फार नीचलोकांच्या हातात जाते आणि सर्व कारभार बिघडतो. (हे वर सांगावयाचे आहे.)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सिद्ध०—अरे तुम्ही पुष्कळ–पुष्कळ–शिकलां, तरी विचारतो कोण ?—कीचकमहाराजांची पराकाष्ठेची आर्जवें केल्यावर, अनुकीचकाच्या हाताखालीं मोठ्या मिनतवारीनें लहानशी वृत्ति मिळावयाची–तेव्हां मी तुला सांगतो, ही पोथी दे फेंकून, आणि हा झारा हातांत घे, नाहीं तर एखादें दारूचें दुकान काढ.

विद्या०—आपण आहो जातीचे ब्राम्हण,–आपणाला हें दारूच्या दुकानाचें काम कांहीं झेंपायचें नाहीं.—गिऱ्हाईकांचे बरोबर दुकानदारानेंहि थोडी थोडी घ्यावी लागते म्हणे !

सिद्ध०—तुम्हां पंडितांना आम्हां आचाऱ्यापाणक्यांच्या इतकीहि बुद्धि नसते म्हणून म्हणतात, तें कांहीं खोटें नव्हे.—ब्राम्हण असलास तर बंदच असलेल्या शिशा विकीत जा.–दारूचें दुकान काढलेंस, तर खुद्द कीचकाची किंवा अनुकीचकाची मेहेरबानी होईल. तें नाहीं साधलें आणि हा झारा हातांत धरलास, तरी देखील अनुकीचकाच्या पदरी असलेल्या पंडिताहूनहि अधिक मोठें वेतन तुला मिळेल.—अरे वा: फार वेळ झाला ! जातो मी.

विद्या०—एक शद्ब !—तुझी वल्लभ आचाऱ्याचे हाताखालीं नेमणूक होणार होती, त्याचें काय झालें ?

सिद्ध०—अरे तूं महापंडित, आणि निजलेल्या मनुष्याप्रमाणें प्रश्न करतोस ? कीचकमहाराज आले त्याच दिवशीं माझी नेमणूक झाली !

विद्या०—आमच्या गुरुजींचें कीचक व अनुकीचक यांजकडे आतां वळण नाहीं; तुझी इतक्या दिवसांची ओळख, तेव्हां मलाहि वल्लभाचे मार्फत कोठें तरी चिटकवून दे.

सिद्ध०—आणखी केव्हां तरी माझी गांठ घे, मग विचार करीन.—पण हें पहा, अगोदर ती पोथी फेंकून दे. (जातो).

विद्या०—हा म्हणतो तें कांहीं खोटें नाहीं. यथा राजा तथा प्रजा. मत्स्यदेशांत विराटमहाराज जर सिंहासनावर बसण्यापुरते राजे होऊन, कीचक व अनुकीचक खरे सत्ताधारी झाले, तर आमच्यासारख्या पोटार्थ्यांनींहि पूर्वींचे अभ्यास सोडूनच दिले पाहिजेत. आतां गुरुजींच्या पुढें ही पोथी ठेवावी, आणि दारूचें दुकान काढूं,—का आचाऱ्याचा झारा हातांत घेऊं,–का सिद्धपाकाची आर्जवें करून नौकरी पटकावूं,—म्हणून त्यांनाच विनंति करावी हें बरें. (जातो)

—

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

प्रवेश चौथा

स्थळ---रत्नप्रभा राणीचा महाल. रत्नप्रभा पलंगावर बसली आहे.

रत्न०---मंदहासिनी, अग मंदहासिनी, इकडे ये अशी. (मंदहासिनी येते)

मंद०---काय आज्ञा आहे बाईसाहेब ?

रत्न०---अग तुला ठाऊक आहे, मी हे दागिने ह्यावेळीं घालीत नाहीं, ह्या फुलांच्या गजऱ्याला रात्रीची शिवत देखील नाहीं;---रोज काग तुम्हाला सांगावें लागतें ! इतकी देखील माणसाला आठवण नसावी म्हणजे काय ?

मंद०---बाईसाहेब, महाराज हस्तिनापुराहून परत आले, त्या दिवसापासूनच मी हे दागिने आणि फुलांचा गजरा येथें रात्रीं ठेवूं लागलें.

CH:> रत्न०---महालांत स्वारी पक्की होणार, असें समजल्याशिवाय हे दागिने, हे हार माझ्या पलंगापाशीं बिलकूल ठेवूं नको.---आज सहा दिवस झाले गांवाहून येऊन, राजकाजामुळें मेलं माझ्याशीं एक शब्द बोलायचीहि फुरसत नाहीं.---अग हा शृंगार करून करायचें आहे काय ?---जा घेऊन सर्व. (मंदहासिनी दागिन्यांचें तबक व गजरा घेऊन जाते, कीचक दुसरे तबक घेऊन रत्नप्रभेच्या मागें येऊन उभा राहतो.) ज्यांच्याकरितां शृंगार करावयाचा तेच जर जवळ नाहींत तर हे दागिने मेले घेऊन करायचें काय ?

कीच०---हा मी तुझ्याजवळ आहे.---आणि हे दागिनेहि दूर गेले नाहींत.

रत्न०---बायकांचा मुख्य दागिना जवळ आल्यावर इतर दागिन्यांची जरूर आहे कोणाला !---हस्तिनापुराहून येऊन इतके दिवस झाले, आज बरी ह्या दासीची आठवण झाली ?

कीच०---आठवण झाली नाहीं असें कसें होईल ? हस्तिनापुरांत सुद्धां ज्या देवतेचें ध्यान एकसारखें आम्ही करीत होतो, तिच्या दर्शनाला यायची आठवण का व्हायला पाहिजे ?

रत्न०---मग मेलं माझ्या महालापर्यंत चार पावलें चालायला सहा सात दिवस लागले म्हणायचे ?

कीच०---हो लागले खरे !---आपल्या दर्शनाला येण्याकरितां एक एक पाऊल टाकतांना एक एक दिवस विचार करण्यांत घालावा लागतो !---कोणच्या दागिन्याकरितां रत्नप्रभा रुसली असेल, ह्याचा अंदाज काढून तो

सर्व प्रवेश किचकाचे नाटकी आणि दोघी पात्र आपनास

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

दागिना तयार करवून, दुसरे पाऊल टाकावे,तों तिसऱ्याच दागिन्याची आठवण होते ! —तूं न रुसशील असा बंदोबस्त करतां करतांच कित्येक दिवस निघून जातात !

रत्न०—मला धास्ती पडली होती, असा विचार करतां करतां वर्षानुवर्षे निघून जाऊन, सर्व जन्मच जातो कीं काय !

कीच०—प्यारी, इतक्या दिवस तुझ्या महालाकडे आलो नाहीं ह्याचें खरे कारण असें आहे, राजा किंवा देवता ह्यांना रिक्त हस्तानें पाहूं नये, अशी शास्त्राची आज्ञा आहे. आणि तुला माहितच आहे, कीं सार्वभौम भारतेश्वर सुयोधन ह्याला मी राजा मानतो, व तूंच कायती माझी मुख्य देवता आहेस ;— खोटें नाहीं बोलत, तुझ्या तोंडावर उगीच स्तुती करतो असें नको मानूं .

रत्न०—नुसत्या बोलण्यावरून माणसाची परीक्षा अल्लड मुली करीत असतात ; करणीवरून परीक्षा करावी हें मला आतां समजूं लागले आहे हो !

कीच०—माझ्या शद्बांवर तूं विश्वास ठेवूं नकोस. (दागिने दाखवून) माझी कृति पाहशील कीं नाहीं ? हें तबक तुझ्या दासीनें आतां येथून नेलेलें नव्हे. हा गजरा तुझ्या दासीनें बनविलेला नाहीं.—ये, अशी जवळ ये, बैस, आणि करणी नीट पाहून माझी परीक्षा कर.—हे दागिने मूळचे द्रौपदीचे असून, द्रौपदी कालांतरानें माझ्या नाटकशाळेंत यावयाची असल्यामुळें हे दागिने—कां तोंड फिरविलें ? नापसंत !

रत्न०—आमची आपली बायकांची बुद्धि, मला असें वाटते सर्व जगांतील श्रेष्ठपणा इकडे यावा, पण गडे दुसऱ्याच्या बायका आपल्या दासी करण्यांत इकडे भूषण वाटूं नये.

कीच०—खुळी खरोखर खुळीग खुळी ! रत्नप्रभे, तुला माहीत आहे, द्रौपदीच नव्हे तर आणखी इतर कसल्याहि अप्सरा माझ्या नाटकशाळेंत आल्या तरी माझी खरी आराध्यदेवता तूंच.

रत्न०—असें तोंडानें म्हणायचें तेवढें !—रोज नव्या नव्या दासींची नाटकशाळेंत भरती करायची,—आणि आराध्यदेवतेशीं बोलायला पांच पांच सात सात दिवस फुरसतहि नाहीं !

कीच०—सहा दिवस आलो नाहीं हें खरे, पण कारण तर ऐक— द्रौपदीच्या अंगावरच्या ह्या मोत्यांना व दागिन्यांना उत्तरकुरूंचें वळण होतें,

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

तें बदलून मत्स्यदेशाच्या खऱ्या रत्नाला साजेसा त्यांना घाट देण्यांत माझे इतके दिवस गेले. मजकडून उशीर झाला, अपराधाबद्दल हे दागिने व हा गजरा माझ्या हातांनीं तुझ्या अंगावर घालण्याचा दंड मला कर (तिजपुढें गुडघे टेंकून) आराध्यदेवतेची ह्या गजऱ्यानें व दागिन्यांनीं पूजा करण्याचा अधिकार ह्या भक्ताला आहेच.

रत्न०--(उठून दूर उभी रहाते.) मला हे दागिने नकोत आणि कांहीं नको,—वरपांगी बोलणीं मला समजतात हो. मेलं परवा सर्वांच्या देखत लाजवीज गुंडाळून ठेवून मी डोळ्यापुढें उभी असतांना, त्या सैरंध्रीकरतां इतका अट्टाहास करायचें झालें, आणि आतां माझी ही अशी स्तुति ! एखाद्या नवख्यानें जर इकडचें हें भाषण ऐकलें तर त्याला वाटेल, एकपत्नीपणाचें व्रत अयोध्येचा रामराजा इकडूनच शिकला.

कीच०—मला वाटलेंच तूं अशी रागावणार,–रुसणार,–म्हणून उशीरा कां होईना पण दागिन्यांचा पक्का बंदोबस्त करून आलो.—हा पहा पायांत घालायचा नवा दागिना आहे. मत्स्यदेशच्या बायकांनीं हा पूर्वीं कधीं पाहिलाहि नसेल. राजसूय यज्ञाचे वेळीं कालयवनांना जिकण्याकरितां म्लेंछ देशांत अर्जून ज्यावेळीं गेला, त्यावेळीं यवनराजानें दिलेल्या करभारांत हा जडावाचा दागिना होता. परराष्ट्रांतून आणलेले जवाहीर व दागिने धर्मराजानें ब्राम्हणां–कडून लुटविले, पण हा दागिना फारच मोहक व अपूर्व घाटाचा असल्यामुळें द्रौपदीनें तो आपल्याकरितां ठेऊन घेतला. पहा तर खरा. (दागिना पुढें करतो)

रत्न०—(दागिना हातांत घेऊन) इश्श मेलं, नाटकशाळेंतल्या कला–वंतिणीच्या पायांत असतात, तसे घंगुर ह्याला लावले आहेत; प्रतिष्टित बायका का असला दागिना पायांत घालतात ?

कीच०—वा ! कालयवनांच्या सर्व राजस्त्रिया हा दागिना पायांत घालतात. द्रौपदीचा तर हा आवडता दागिना.–ह्याला कौरव मंडळांत तोरड्या म्हण-तात; आणि आजकाल सर्व हस्तिनापुरच्या बायका हा दागिना हौसेनें घालतात !

रत्न०—असतील घालीत ! लहान मुलीबाळींनीं पायांत घातला तर चालेल; पण मोठ्या बायकांना नाहीं बाई चांगला शोभायचा.

कीच०—बाहेर देवदर्शनाला जातांना पोक्तपणाचें प्रदर्शन करण्याचे वेळीं पाहिजे तर हा घालूं नये. पण रात्रींची रंगमहालांतील ही वेळ म्हणज अल्लड-पणाची असते नाहीं ?

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

रत्न०—कांहीं नसते अल्लडपणाची.—माझी एक विनंति आहे. त्या विनंतीप्रमाणें ऐकायचें असलें तर मी हा दागिना घालतें, नाहीं तर कांहीं एक नको मला !

कीच०—(स्वगत) बायकांनीं हातांत दागिना घेतला, कीं त्यांचा तोरा मऊ पडलाच !

रत्न०—माझी विनंति ऐकायची नाहीं वाटतें मनांत ! एवढा कसला त्याबद्दल विचार ?

कीच०—एक कां ? शंभर विनंत्या आम्ही ऐकूं; पण केव्हां ?

रत्न०—केव्हां ?

कीच०—ह्या तोरड्या मी माझ्या हातानें तुझ्या पायांत येथें घालतो, मग तेथें नीट बसून ह्या दागिन्यांनीं आराध्यदेवतेची ह्या भक्तानें पूजा केल्यावर.

रत्न०—मग माझी विनंति ऐकली पाहिजे.

कीच०—कबूल (पायांत तोरड्या घालतो.) आतां पलंगावर बसायचें होतें. (पलंगापर्यंत हात धरून चालत नेत असतांना)—आम्हाला तोरड्या घालून चालून दाखवायचें होतें, म्हणून रुसल्याचें मीष करून अशी दूर येऊन उभी राहिली होतीस, होय ना ? होय असेंच.—हलके चालायचें राणीसाहेब.—सौंदर्याचे गर्वांत ताठ्यानें पडलेलें तुझें प्रत्येक पाऊल माझ्या मानापमानाच्या कल्पना पायांखालीं ठेंचण्याकरितां तूं टाकीत आहेस, असें मला वाटतें.

रत्न०—पुरे झाली मेली थट्टा ! (पलंगावर बसतात)

कीच०—आतां अगोदर हीं हिऱ्याचीं कंकणें हातांत घालूं, का हा मोत्याचा हार गळ्यांत घालूं, का प्रथम ही नथ नाकांत अडकवूं ?

रत्न०—आतां इतकी मेहनत नको करायला हो, मी माझ्या हातानेंच हे दागिने अंगावर घालतें, मग तर झालें ?

कीच०—छे ! छे ! देवता प्रसन्न होऊन जरी बोलूं लागली, तरी पूजा ही भक्तानेंच केली पाहिजे. तुझ्या कोमल हातांना जर काम पडलें तर मी भक्त कसचा ?

रत्न०— माझी विनंति ऐकेन म्हणून दिलेल्या वचनाची आठवण आहेना ?

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

कीच०—हो आहे तर.—काटयांच्या पाशांत पाय अडकलेला मत्त गजेंद्र जसा अगदीं मऊ येतो, त्याप्रमाणें ह्या सांखळयांच्या व तोरडयांच्या बिडया मुसमुसणाऱ्या तरुणींच्या पायांत पडल्या, म्हणजे त्यांचें फुणफुणणें पार नाहींसें होतें.—माझें हें बोलणें खोटें करण्याकरितां लागलेंच रुसायला नको.—तुझी विनंति ऐकून घेईन.—एवढी नथ घालूं द्या. (नथ घालतो) वेसणीचा बैल आहाराच्या बाहेर जाण्याची जशी भीति नाहीं, त्याप्रमाणें नाकांत नथ अडकवणाऱ्या नवऱ्याचे मर्जीबाहेर कोणतीहि तरुणी जाणें शक्य नाहीं.

रत्न०—अशा बोलण्यानें मी कांहीं फसायची नाहीं. माझी विनंति ऐकली पाहिजे हो.

कीच०—अलबत.—माझ्या साखळया तोरडयांच्या बिडया तुझ्या पायांत आहेत,—नवीन आणलेल्या नथीची वेसण तुझ्या नाकांत आहे.—ह्या वेळीं मला न आवडणारा एक शद्बहि रत्नप्रभेच्या तोंडांतून निघणें शक्य नाहीं, ह्याबद्दल मी पाहिजे तर पैज मारतो.—आतां मला कसली भीति !—सरकार, मर्जीस येईल तो हुकूम फर्माविण्याची मेहेरबानी व्हावी, बंदा सेवेला तयार आहे.

रत्न०—विनंति इतकीच आहे, त्या सैरंध्रीचा नाद सोडावा.

कीच०—कां ?—सैरंध्रीला मी नाटकशाळेंत आणली, तर तुझें काय त्यांत नुकसान झालें ?—इतक्या आणखी नाटकशाळेंत पडल्या आहेत; त्यांत ती पडून राहील.

रत्न०—नाहीं, सैरंध्रीचा नाद सोडल्याचें वचन आपल्यापासून घेतल्याशिवाय मी रहाणार नाहीं.—दिलेंच पाहिजे वचन.

कीच०—रत्नप्रभे, इतकी वर्षें माझा स्वभाव तुला माहीत असून, सैरंध्रीचा तुझ्यासारख्या निरूपम अप्सरेला मत्सर वाटावा, हें आश्चर्य आहे !

रत्न०—मी मत्सरबुद्धीनें आपणांस ही विनंति करीत नाहीं.—आपल्या नाटकशाळेंत राहण्यास जर सैरंध्री मनापासून कबूल नाहीं, तर तिच्यावर जुलूम करण्यांत आपणासारख्या वीरांना काय पुरुषार्थ आहे? आज चार पांच दिवस ती एकसारखी रडत असते म्हणे! महाराज, पुरुष जुलूम करूं लागले म्हणजे पतिव्रतेचें मन कसें दुःखानें होरपळून जातें, ह्याची कल्पना

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

पुरुषांना कधींहि करतां यावयाची नाहीं. वायकांच्याच जन्माला जावें, तेव्हां त्यांच्या तसल्या दुःखाची कल्पना करतां येईल.––महाराज, माझें मन आपणावरचें कधींहि ढळावयाचें नाहीं, हें आपणांस पक्के माहीत आहे, तेव्हां सैरंध्रीच्या आजच्या स्थितींत मी आहे असें मनांत आणा, म्हणजे आपल्याला व मला असल्या अपमानानें किती दुःख होईल हें आपल्या ध्यानांत येईल.––माझी इतकीच विनंति आहे कीं, दुसऱ्याच्या बायकोवर जुलूम करणें हें आपण आजपर्यंत मिळविलेल्या नांवलौकिकास काळिमा आणणारे आहे.

कीच०––रत्नप्रभे, तुझें म्हणणें बरोबर आहे; पण तूं एक गोष्ट विसरते आहेस. आम्ही राज्यकर्ते आहोंत, आणि सैरंध्री आमच्या ताटाखालचें मांजर आहे. तेव्हां जो न्याय तुला लागू, तो सैरंध्रीला लागू करतां कामा नये.–– राज्यकर्ते ते राज्यकर्ते, आणि दास ते दास; हा भेद नेहमीं लक्षांत ठेविला पाहिजे.

रत्न०––पण महाराज, कोणचीहि स्त्री राज्यकर्त्यांपैकीं नाहीं, एवढ्याचमुळें पातिव्रत्य झुगारून देण्यास तयार होईल असें आपणांस वाटते तरी कसें?

कीच०––तसें कां वाटूं नये? तसें नसतें तर कीचक व अनुकीचक यांच्या नाटकशाळा एवढ्या टोलेजंग कधींहि झाल्या नसत्या!

रत्न०––तें कसेंहि असो, आपलें हें करणें मला कांहीं पसंत नाहीं,–– माझ्या शद्वाला आपण नेहमीं मान देत असतां म्हणून विनंति करते; चौदा चौकड्यांचा राजा रावण, त्यानें जंगलांत संचार करणाऱ्या एका क्षुल्लक मानवाची स्त्री सीता आहे असें समजून तिच्यावर जुलूम करण्याचा प्रयत्न केला; त्याचा परिणाम काय झाला, हें लक्षांत आणा, आणि सैरंध्रीचा नाद सोडून द्या.

कीच०––रत्नप्रभे, फुकट–फुकट–इतकी वर्षें माझ्या सहवासाला राहिलीस! मी तुला प्रथमच बजावलें आहे, सैरंध्रीला मी माझ्या नाटकशाळेंत आणली तर तुला मत्सर वाटावयाचें कारण नाहीं.––तुझ्यावरचें माझें प्रेम केंसभरहि कमी करण्याचें सामर्थ्य सर्व विश्वांतील कोणच्याहि तरुणीच्या अंगी नाहीं.–– सैरंध्री बरी दिसली, सहज मी तिला मागितली! पण मला ती मिळत नाही असें दिसल्यावर कोणच्याहि कारणाकरितां गप्प बसणारा मात्र हा कीचक

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

नव्हे.—[माझ्या मागणीबरोबर जर सुदेष्णेनें सैरंध्रीला मजकडे पाठविलें असतें,— माझा हुकूम न मानण्याचें धाडस जर सैरंध्रीनें केलें नसतें.—तर रत्नप्रभे, तुझ्या आतांच्या शद्वाला मान देऊन सैरंध्रीच्या शरिराला हातहि न लावतां मी तुझ्याकरतां तिला तिच्या नवऱ्याचे घरीं सन्मानानें पोंचती केली असती.] पण--

रत्न०--पण काय, ह्यांत कसला अपमान आहे ?--असें करण्यानें आपली कीर्ति दिगंतरी पसरेल; व साधुसंत आपल्या ह्या सत्कर्माचे पोवाडे स्वर्गांतहि गाऊं लागतील.

कीच०—छत् ! भलती वेडगळ कल्पना !—स्वर्गांतल्या कीर्तीहून आम्हां सत्ताधाऱ्यांना आमची इहलोकची इभ्रत जास्त किंमतीची वाटते.—आमचा शद्व केव्हांहि खालीं पडतां कामा नये.--यःकश्चित् दासी जर माझा हुकूम तोडूं लागल्या, तर त्या नेभळ्या कीचकाची ही बायको म्हणून रस्त्यांत तुझ्याकडे लोक बोटें दाखवितील, ह्याचा नको कां मला विचार करायला ?— बस्स झाला तो हुकूम होऊन गेला, आतां काय त्याचें ? घटके घटकेला जो वीर आपले हुकूम मागें घेत असतो, त्याची बायको होण्यांत जर रत्नप्रभेला भूषण वाटत असेल, तर माझ्याबरोबर माझ्या अर्ध्या सिंहासनावर बसण्याची तुझ्या अंगीं लायकीच नाहीं असें मी समजतो.—ही सैरंध्री एखाद्या दासाची बायको आहे, तशी जरी नसली, आणि एखाद्या प्रख्यात रथी, महारथी, अतिरथी ह्याची बायको असली, इतकेंच नव्हे तर एखाद्या प्रमुख अनुकीचकाची जरी ती अर्धांगी असली, तरीं मी दिलेली मुदत संपण्याबरोबर तिनें माझ्या नाटकशाळेंत आलेंच पाहिजे.—फिरीव, खुशाल तोंड फिरीव.— माझा शद्व मी खरा करणार, मग मी रत्नप्रभेच्या प्रेमास मुकलो तरी बेहत्तर !]

(पडदा)

अंक दुसरा समाप्त.

कीचकाच्या पात्राचे स्वभावाचे सर्व पैलू आपणाला वर दिसलात शब्द आणि मान या दोन गोष्टींना अत्यंत महत्व देणारा किचक आपणास येथे दिसतो.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

अंक तिसरा

प्रवेश पहिला.

स्थळ—राजवाड्यांतील पटांगण; मैत्रेय, सौदामिनी व कीचकाच्या दोन दासी प्रवेश करितात.

मैत्रे०—ए पोरींनो, तुम्ही कोणीकडे गेला होता ? तुमचे यजमान आहेत तरी कोठें ? कीं चौऱ्या हातांत घेऊन उगीच इकडून तिकडे ह्या पटांगणांतू हिंडतां ?

प० दा०—कीचकमहाराजांची स्वारी आतां इतक्यांत इकडे येईल म्हणून आम्ही येथें आलो.

दु० दा०—धाकट्या बाईसाहेबांना बृहन्नडा गाण्याची तालीम कशी देते ते पहाण्याकरितां महाराजांनीं आम्हांला इकडे आणलें आहे.

मैत्रे०—या, तुम्हांला एखादी चीजबीज येतें कीं नाहीं ?

सौदा०—गायला यावयाला गळा बिळा बरा असावा लागतो. तुमचं आवाजी बरी आहे काय ?

मैत्रे०—गायला यावयाला गळा कशाला चांगला हवा ? अग बृहन्नड येथें येऊन महाराजांनीं मला आपला मैत्रेय करण्यापूर्वी संगीत वर्गावर माझी नेमणूक होती; त्या वेळीं जेव्हां मी गाण्याच्या तालमी घेत होतो, तेव्ह गाणारणीला कोकीळेसारखा गोड आवाज असला पाहिजे, असा निर्बंध ठेवला नव्हता. गायला बसल्यावर आवाज गोड नसला तर गर्दभसुरांत गायलें म्हणू संगीताची कोठें आडकाठी आहे ?

प० दा०—विराट महाराजांचा संगीत वर्ग आपल्याकडे होता तेव्ह आम्ही आलो असतो तर बरे झालें असतें.

दु० दा०—अजूनहि आम्हांला एखादे वेळेला तालीम दिली तर आम्ह शिकायला येऊं.

कथानकाचा विकास नवीन पात्रांची ओळख [ ] आणि संघर्ष आणणारी वाटतो.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

मैत्रे०—तुमचा आवाज फुटलेला असला तरी माझ्या संगीतांत चालेल. तुमचे पाय मात्र शाबूत पाहिजेत. कारण पायाच्या धांवत्या ठेक्यावर माझें संगीत गाऊन दाखवावयाचें असतें. माझ्या धांवत्या गाण्याची तालीम लंगड्याला देतांच यावयाची नाहीं.

प० दा०—आमचे पाय शाबूत आहेत.

द्वु० दा०—आम्ही एक दोन योजनें सहज धांवतो.

मैत्रे०—तर मग दुडदुड पळणाऱ्या संगीताप्रमाणें धांवून दाखवा पाहूं. (दासी धांवत जातात.) सौदामिनी, तुझ्यापेक्षां नव्या दासी फारच चलाख दिसतात. तुला इतक्या दिवस शिकविलें पण पालथ्या घागरीवर पाणी !

सौदा०—मेलं पुरुषांच्या पाशीं गायला शिकायची मला लाजच वाटते; मी आतां बृहन्नडेपाशीं शिकणार आहे. बाकी आपल्या सारख्या म्हाताऱ्यापाशीं शिकायला कांहीं हरकत नाहीं.

मैत्रे०—ही बृहन्नडा आली म्हणून बरें झालें, नाहीं तर मला अगदीं म्हातारपणाचा कंटाळा येण्याची वेळ आली होती. कोणाच्या मुलीला शिकावयाचें असलें म्हणजे बोलाव संगीतशाळेंतल्या ह्या म्हाताऱ्या पंतोजीला,—जणूं काय हा म्हातारा पुरुषच नव्हे !

सौदा०—ही बृहन्नडा आमच्या शहरांत आल्यानें आमच्या मुलींचें मोठें नुकसानच झालें म्हणावयाचें !

मैत्रे०—हं हें कसें काय ?

सौदा०—आपल्यासारख्या वृद्ध व पोक्त गुरूच्या शिक्षणाला त्या मुकल्या !

मैत्रे०—कां आज फारच स्तुति चालली आहे ? कांहीं कामबिम आहे वाटतें !

सौदा०—कांहीं नाहीं ; पण थोडेसें–काम म्हणून इतकेंच—आपली व कंकभटाची मैत्री आहे, आणि कंकभटाच्या नादीं सैरंध्री असावी—मला आपला संशय येतो हो.

मैत्रे०—आहे, कंकभटाला सैरंध्रीचा नाद आहे; मग पुढें ?

सौदा०—सैरंध्रीचें मन वळवून कीचकमहाराजांच्या राजवाड्यांत ती जाईल असें करण्याविषयीं बाईसाहेबांची मला आज्ञा आहे. तेव्हां म्हटलें आपण जर कंकभटाकडून सैरंध्रीचें मन वळविलें तर— humour of situation

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

मैत्रे०—अग कंकभट म्हणजे गरीव सोज्वळ ब्राम्हण, द्यूत खेळण्याचा त्याला जरा नाद आहे इतकेंच; बाकी—अरे वा ! विराट महाराज आणि महाराणीसाहेब इकडेच येत आहेत. (विराट आणि सुदेष्णा प्रवेश करितात)

विरा०—ह्या क्षुल्लक बावीला कीचकमहाराज एवढें महत्त्व देतात, ह्याचेंच मला आश्चर्य वाटतें !—एखाद्या दासीला कोणाच्याहि नाटकशाळेंत राहूं नयें असें वाटत असलें तर त्याबद्दल तिची तारीफच केली पाहिजे. कीचक-महाराज तुझे भाऊ आहेत, शिवाय माझ्यां राज्याचे मुख्य आधारस्तंभ कीचक व अनुकीचक हेच होत, तेव्हां कीचक मला प्राणाहूनहि अधिक प्रिय आहे, हें सांगावयास नको. पण असल्या क्षुल्लक बाबींत इतका अरेरावीपणा काय कामाचा ?

सुदे०—ही क्षुल्लक बाब कसली ?—चार दिवसांची मुदत कीचक महाराजांनीं दिली होती तीहि आज टळून गेली; आतां पुढें काय होईल ह्याची मला भीति वाटते हो.—बायकांच्या पायीं रणें माजतात गडे. माझ्याच स्वयं-वराचे वेळेला लढाई करुन इकडून किती राजपुत्रांना जिंकणें झालें, आठवण आहे काय ?

विरा०—राजकन्येकरितां युद्ध होईल, कबूल आहे; पण एखाद्या दासीकरितां लढाई ? हं शक्यच नाहीं—आम्ही सत्ताधारी राजे लोक अद्याप इतके उल्लू झालो नाहीं.

सुदे०—इकडच्या प्रमाणें कीचक शांत स्वभावाचा असता,—उतावीळ व संतापी नसता—तर क्षुल्लक गोष्टीवरुन तंटाबखेडा व्हावयाचा नाहीं. पण कीचक महाराज किती हट्टी आहेत हें आपणांस माहीतच—

विरा०—कीचक महाराज हट्टी आहेत खरे; पण कायरे मैत्रेया, ह्या सैरंध्रीचा तरी इतका हट्ट कां असावा ?

मैत्रे०—माझें देखील असेंच म्हणणें. कीचक महाराज जर आपण होऊन प्रसन्न झाले आहेत तर हिनें तरी हट्ट कां करावा ? बाकी ही जर पूर्वीच्याप्रमाणें आज इंद्रप्रस्थास द्रौपदी महाराणीपाशीं असती तर तिनें इतका हट्ट केला नसता !

विरा०—तें कसें ?

मैत्रे०—मालकिणीला जर प्रत्यक्ष पांच नवरे, तर एकपतिव्रताचा बाणा इंद्रप्रस्थास दासींच्या अंगी कोठला दिसावयाला ? 1h.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सुदे०—काय ग सौदामिनी, सैरंध्रीला नीट समजावून सांगितलेंस का ?

सौदा०—सैरंध्री पलीकडे वसंतबागेंत फुलें तोडावयाला गेली आहे आणि कंकभटजीहि तिकडेच गेले आहेत, म्हणून मैत्रेय भटजींना बरोबर घेऊन मी सैरंध्रीकडे चालले होतें; इतक्यांत सरकारची स्वारी आली.

विरा०—आम्ही वसंतबागेकडेच चाललो आहों. सैरंध्रीला आमच्याकडे पाठवून दे, म्हणजे आम्ही स्वत: ह्या प्रकरणाची चौकशी करून सैरंध्रीला तिच्या हिताच्या दोन गोष्टी समजावून देऊं. (विराट व सुदेष्णा जातात)

मैत्रे०—खरेंच, सौदामिनी; तूं जर सैरंध्रीच्या जागीं असतीस तर आज तुझा केवढा वडेजाव झाला असता ! विराट महाराजांनीं तुझी आर्जवें केलीं असती ! सुदेष्णा महाराणीसाहेबांनीं तुझ्याकरितां कुंटिणीचें काम पत्करलें असतें !

सौदा०—खरेंच मैत्रेय भटजी, सैरंध्रीच्या आणि माझ्या रूपांत काय एवढा फरक आहे ?—माझी आपली समजूत आहे, आज नाहीं उद्यां कीचक-महाराजांचें मन माझ्यावर बसल्यावांचून रहाणार नाहीं.—भटजीमहाराज, खरे खरे सांगावयाचें, मी सैरंध्रीहून वाईट दिसते काय ?

[मैत्रे०—चेहरा असा नीट मजकडे कर, नीट न्याहाळून पाहूं दे.—भालप्रदेश विस्तीर्ण नाहीं; केंस उर्मटपणानें पुढें आले आहेत, त्यांना मागें पिटाळून लाविलें पाहिजे.—नाक फेंदाडें आणि फाजील मोठें आहे; तासून तासून बारीक कळीदार केलें पाहिजे.—डोळे बारीक आहेत; सभोंवारचीं हाडकें व मांस जरा खणून काढून डोळ्याचा तलाव गरगरीत मोठा केला पाहिजे.—आणि ही सगळी भर बसलेल्या गालफडांत टाकली म्हणजे तूं हुबेहूब सैरंध्री !] अगदी हलक्या प्रतीचा विनोद

(कीचक व दोन दासी प्रवेश करितात.)

कीच०—कोठें आहे सैरंध्री ? मैत्रेया, कोठें आहे सैरंध्री ?

मैत्रे०—उद्यांपरवाची सैरंध्री ही येथें उभी आहे, आजकालची सैरंध्री—

कीच०—मैत्रेया, कोणाची आणि केव्हां थट्टा करावी, हें तुला म्हातारपणींहि समजूं नये ?

मैत्रे०—साठी बुद्धि नाठी.—ह्या दासीची जशी थट्टा करतों तशीच सरकारची करायला गेलो—माफी असावी.

कीच०—कायग पोरींनो, सैरंध्रीला हुडकून काढायला सांगितलें आणि तुम्हाला कांहीं पत्ता लागला नाहीं ना ?

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

प० दा०—नृत्यशाळेंत मी तिला पाहिली.

दु० दा०—चित्रशाळेंत मी तिला हुडकली.

प० दा०—संगीतशाळेंत मी तिचा शोध केला.

दु० दा०—पाकशाळेंत मी तिची चौकशी केली.

मैत्रे०—राजवाड्यांतल्या कोणत्याच शाळेंत ती नाहीं ! बाहेरच्या बृहन्नडेच्या शाळेंत शोध केलात का ?—सरकार ह्या पोरींच्याकडून सैरंध्रीचा पत्ता लागायचा नाहीं. शिकारी कुत्रे दृष्टीस पडले म्हणजे पारधी मागोमाग येत आहे असें समजून भ्यालेले ससे तेव्हांच दडून बसतात.

कीच०—मैत्रेया, ह्या वेळीं अमक्याच ठिकाणीं सैरंध्री आहे अशी नक्की बातमी सांगितलीस तर तुला मोठें इनाम मिळेल.

सौदा०—ह्या वेळेला सैरंध्री वसंतबागेंत फुलें तोडीत आहे.

कीच०—हें घे तुला इनाम. (मोत्याचा कंठा देतो).

मैत्रे०—वसंतजंगलांत सैरंध्री पूर्वेकडच्या झुडपांत आहे, का पश्चिमेकडच्या रानांत हिंडत आहे, का दक्षिण डवक्यांतील हंसांना खेळवीत आहे, का उत्तरेकडच्या डवक्यांतील कमळें तोडीत आहे, का मध्यावरच्या झोंपडीच्या महालांत हार गुंफीत बसली आहे,—नक्की बातमी सांगण्यापूर्वीच इनाम देऊन सरकार पार झाले ! सैरंध्रीकरतां सरकार इतके आवाळभूत झाले असतील असें मला नव्हते वाटलें.

कीच०—चला आतां वसंतबागेंत. आतां मात्र तुम्ही पत्ता बरोबर काढिला पाहिजे. (कीचक व दासी जातात.)

मैत्रे०—सैरंध्रीचा तूं पत्ता सांगितलास एवढ्यावरून तुला हा मोत्यांचा कंठा बक्षिस मिळाला; आणि जर का सैरंध्रीला कीचकमहाराजांच्या नाटकशाळेंत नेऊन घालशील, तर कीचक महाराज तुझ्यावर इतके प्रसन्न होतील कीं सैरंध्रीच्या ऐवजीं तुलाच अंतःपुरांत ठेऊन घेतील.

सौदा०—एकीमागून दुसरी, दुसरी मागून तिसरी, असेंच पुरुषांना बायका घेरीत असतात. (रत्नप्रभा व मंदहासिनी प्रवेश करितात.)

मैत्रे०—रत्नप्रभा राणीसाहेब आल्या; ह्या कीचक महाराजांचा शोध करीत असतील. महाराजांचा पत्ता सांगून मी बक्षिस मिळविणार. तूं मध्यें तोंड घालशील तर खबरदार, अशी तोंडाला मुस्कट घातल्यासारखी उभी रहा. (तोंडावर हात ठेवून उभी करतो.)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

रत्न०—मला नाहीं वाटत सैरंध्री मनाची इतकी खंबीर असेल–स्वारीनें आपण होऊन एकांतीं गाठून तिचीं आर्जवें केलीं तर तिचा निश्चय टिकेल, असें होणेंच नाहीं.—तिकडचे डोळे असे कांहीं जादुगिरी आहेत कीं मोहिनी अस्त्राचा वर्षाव त्या नेत्रांतून होतो आहेसा वाटतो !

मंद०—बाईसाहेब, सैरंध्री फारच निराळ्या प्रकारची बायको आहे. एखाद्या तपस्व्यालाहि लाजविणारी तिची वर्तणूक येथें सर्वांना माहीत आहे.

रत्न०—सगळें खरें, पण कौरवांच्या दरबारांत वागली आहे ना ? ह्याचेंच मला भय वाटतें.—अग ह्या कौरवांच्या पूर्वजानें देवयानीशीं लग्न केलें, आणि देवयानीची सैरंध्री राक्षसकन्या शर्मिष्ठा हिच्यापासूनच पुढें कौरवांचें कुळ उत्पन्न झालें. ह्या कुळांतल्या सैरंध्रीना संवयच असली पाहिजे, मालकाचें मन केव्हां मुठींत घेईन आणि यजमानणीला घराबाहेर केव्हां घालवीन.

मंद०—पण सैरंध्रीचा अनुभव बाईसाहेबांना निराळाच येईल.

रत्न०—द्रौपदी राणीसाहेबांच्या स्वयंवरापासून ही त्यांच्यापाशीं होती, आणि तितक्या वेळांत पांडवांनी द्रौपदीकडे दुर्लक्ष केलें नाहीं; एवढ्यावरून ही चांगल्या वर्तणुकीची असावी.—कायग ए सौदामिनी, अशी दांतखिळी बसल्यासारखी कां उभी आहेस ?

मंद०—खरेच बाईसाहेब, हिची दांतखिळीच बसली असली पाहिजे; नाहीं तर हिच्या तोंडाची टकळी–जिभेचा पट्टा–सारखा सुरू असावयाचा !

मैत्रे०—खबरदार, तूं अगोदर बातमी सांगशील तर.—महाराणीसाहेब, मला कोणचें बक्षिस देणार हें अगोदर समजलें पाहिजे, नाहीं तर हिच्याप्रमाणें माझीहि मुस्कटदाबी होईल !

रत्न०—पण बक्षिस कशासाठीं ?

मैत्रे०—कशासाठीं ? मी लहान सहान बक्षिस साफ घेणार नाहीं.—सैरंध्रीचा पत्ता सांगितला म्हणून कीचकमहाराजांनीं हिला मोत्याचा कंठा बक्षिस दिला. आपणाकडून मला ह्याहून मोठें बक्षिस मिळालें पाहिजे.–बायका पुरुषांइतक्या कंजूप नसतात; कारण पुरुषांना श्रम करून मिळवावे लागतें आणि बायकांना फुकटचे दागिने मिळतात.–तेव्हां मला किती मोठें बक्षिस मिळणार हें अगोदर समजल्याशिवाय, वसंतबागेंत सैरंध्रीचा पत्ता काढीत कीचक महाराज कसे भटकत आहेत, ह्यासंबंधाचा एक ब्रहि माझ्या तोंडून निघणार नाहीं. (तोंड दाबून उभा रहातो)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

रत्न०—मंदहासिनी, वसंतबागेकडे मला घेऊन चल. सैरंध्रीचा उगीच छळ स्वारी करीत असेल; मला वेळेवर तेथें हजर झालेंच पाहिजे.

मंद०—ह्या इकडून असें यावें बाईसाहेब. (मंदहासिनी व रत्नप्रभा जातात.) (मैत्रेय व सौदामिनी, तोंडावर हात ठेवून तोंड दाबून व खुणा करीत उभीं राहतात.)

मैत्रे०—मला बक्षिस मिळेपर्यंत मी मुस्कट दाबून धरणार.

सौदा०—बोलायला हरकत नाहीं, असा आपला हुकूम होईतो मी मुस्कट दाबून धरणार.

मैत्रे०—मुक्यासारखें किती वेळ उभें राहावयाचें ?

सौदा०—रत्नप्रभा राणीसाहेबांनीं आपणाला फसविलें त्याला मी काय करूं ?

मैत्रे०—बायका धूर्त असतात; तुला तेवढा कंठा; आम्ही पुरुष साधे भोळे !

सौदा०—बरे असतील साधे भोळे, अतिशहाणे मात्र असतात.

मैत्रे०—अतिशहाणा म्हणून हा बैल रिकामा !—आतां मला बक्षिस कसें मिळेल ह्याची एखादी युक्ति तूंच सांग.

सौदा०—कंकभटामार्फत सैरंध्रीचें मन वळवा.

मैत्रे०—बरे तर, आतां काढ तोंडावरचा हात.—चल आपण वसंतबागेंत जाऊन कंकभटाला गाठूं. दाखीव, मला वसंतबागेचा रस्ता दाखीव.

सौदा०—ह्या इकडून असें यावें भटजी महाराज.

मैत्रे०—वेत्रधारीसारखी ओरड माझ्यापुढें.

सौदा०—आस्ते कदम भटजी महाराज. ठेंच लागेल आस्ते कदम.—हां येथें फत्तर आहे, त्यावर हापटून दांत पडतील.

मैत्रे०—माझे पूर्वीच दांत पडले आहेत. हे नकली आहेत !—वेत्रधारी सारखी ओरड माझ्यापुढें.

सौदा०—आस्ते कदम–असे या रस्त्यानें यावें महाराज, आस्ते कदम.

(जातात)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

प्रवेश दुसरा

स्थळ—वसंतबाग. कंकभट व वल्लभ शिळेवर वसले आहेत; सैरंध्री उभी आहे.

सैरं०—महाराज, माझ्या जन्मकाळचे ग्रहच असे कांहीं विचित्र पडले आहेत कीं, कोणचीच गोष्ट सरळ होत नाहीं. स्वयंवराचा समारंभ ठरला तर बाबांनीं पणच विचित्र लावला; आणि सर्व क्षत्रियांना खालीं मान घालण्याची वेळ येऊन द्रौपदी आजन्म अविवाहित राहते कीं काय अशी दादाला भीति पडली. त्यावेळीं तो सारथीपुत्र कर्ण मत्स्यभेद करतो कीं काय अशी मला भीति वाटून मी हलकट कुलांत जन्मलेल्याशीं लग्न करणार नाहीं असें साफ सांगितलें. तेव्हां तो मानी कर्ण मनांतल्या मनांत विरघळून जाग्यावरून उठलाच नाहीं.—आमच्या देशांतील त्या सारथीपुत्राच्या त्रासांतून त्या वेळीं मी तशी सुटलें. पण हा मेला कीचक—मत्स्य देशाचा हा सारथीपुत्र—ह्याच्या त्रासांतून सुटण्याचा मार्गच मला दिसत नाहीं.—ह्याची बायको रत्नप्रभा महासाध्वी, तिनें त्याची चांगली कानउघडणी केली; मी त्याला चांडाळ, राक्षस, लांडगा म्हणून पाहिजे तशा शिव्या दिल्या; सुदेष्णा महाराणी-साहेबांनीं चार गोष्टी समजून सांगितल्या; पण कांहीं उपयोग नाहीं. म्हणून एक त्याला तरी जगांतून नाहींसा केला पाहिजे, नाहीं तर मी तरी नाहींशीं झाली पाहिजे; एरव्ही हा तंटा मिटणार नाहीं.

कंक०—हे दोनहि मार्ग मला पसंत नाहींत. कीचकाला जगांतून नाहींसा करा, हें म्हणणें सोपें आहे, पण कृति फार कठीण आहे.

वल्ल०—ह्यांत कसलें कठीण आहे?—दादा, आपली आज्ञा होऊं द्या—जरासंधाला जसा मी मारला, बकासुराला बगलेंत मारून त्याचा नैवेद्य खाऊन त्याला यमपुरीची जशी वाट दाखविली, काम्यक वनामध्यें किर्मीर राक्षसाला ज्याप्रमाणें एका क्षणांत होता कीं नव्हता केला, त्याप्रमाणें आपली आज्ञा होण्याचा अवकाश,—सांगाल त्या ठिकाणीं, सांगाल त्या वेळीं व सांगाल त्या प्रकारानें,–कीचकाच्या शरीराचे हजारो तुकडे करून प्रत्येक अनुकीचकाच्या मंदिरांत एक एक भाग टाकून सर्व अनुकीचकांना आमच्या भीतीनें कांपावयास लावीन.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सैरं०—असें झालें, तरच आजच्यासारखे प्रसंग वारंवार येण्याचे बंद होईल.

कंक०—उगीच संतापून जाऊन एका संकटांत दुसऱ्या संकटाची भर घालण्यांत काय हांशिल आहे ?—भीमा, तुझी शक्ति अमर्याद असून प्रत्येक अनुकीचक जरी कीचकाप्रमाणें उन्मत्त झाला तरी सर्वांचा मद उतरण्याचें सामर्थ्य तुझ्या अंगी आहे, पण—

सैरं०—पण काय ? जेव्हां तेव्हां असें करून हा वनवास आणि अज्ञातवास सर्वांच्या मागें लाविला.—शत्रूंना जर जेथल्या तेथें ठेंचीत आला असता तर असल्या हलकट सारथीपुत्रानें डोळे उघडून मजकडे पहाण्याची काय प्राज्ञा होती ? जे सांगून सवरून शत्रू, त्यांच्याशीं कशाला इतकें नीतीनें आणि दयेनें वागायला पाहिजे ? महाराज, सापाशीं जर आम्ही दयेनें वागलो आणि त्याची गय केली तर पुढें त्या सापाच्या दंशानें मरणारांची हत्त्या आपल्या माथी बसणार नाहीं काय ? ह्या भावी हत्त्येचें पातक चुकविण्याकरितां आज निष्ठुर व निर्दय होणें, हाच सत्य मार्ग आहे असें मला वाटतें.

कंक०—न्यायबुद्धीला केव्हां केव्हां बाहेरून निर्दयतेचे सोंग आणावें लागतें हें खरें; पण द्रौपदी, असला निष्ठुरपणा जर केवळ स्वहिताकरितांच असेल तर कितीहि शांतपणानें, सावकाशीनें, पक्का विचार करून व अंतःकरण दयाळू ठेवून हा निष्ठुरपणा दाखविला असला तरी परमेश्वर त्यावर पापाचा छाप मारल्यावांचून रहाणार नाहीं. स्वतःच्या भावी सुखाच्या लालुचीनें आज निष्ठुर होणें म्हणजे लोभाच्या जाळ्यांत सांपडून फसण्यासारखें आहे. ज्याला दुःख द्यायचें त्याचें त्या दुःखापासून अधिक कल्याण होणार आहे, अशी दयाळू न्यायदेवतेची पूर्ण श्रद्धा असल्याशिवाय क्रूरपणाचें प्रत्येक कृत्य पापमय आहे असें समजावें.

सैरं०—मग शत्रूचें शासन केव्हांच करूं नये एकूण ?—महाराज, आपण क्षत्रिय कुलांत कसे जन्मास आला, ह्याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें !

वल्ल०—दुष्ट शिरोमणी दुःशासनानें जेव्हां द्रौपदीच्या निरीला हात घातला तेव्हां रागानें लाल झालेल्या माझ्या डोळ्यांनीं आपणाला शांतपणानें समाधिस्थ असल्याचें पाहिलें; त्यावेळीं एकाच कुंतीच्या उदरांतून आपण व मी दोघेहि कसे निर्माण झालो, ह्याबद्दल मला संशय आला; व तो संशय आज

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

पुन: दुणावत आहे.--महाराज, आपणाला जर कोणाशीहि व केव्हांहि निष्ठुरपणानें वागावयाचें नाहीं व परक्यांच्याच सुखाची जेव्हां तेव्हां काळजी वाहायची, तर वनवास संपवून हा अज्ञातवास कां स्वीकारला ? आपलें अजातशत्रुत्वाचें व्रत आजन्म वनवासांत राहून पूर्ण झाले असतें.

सैरं०--आणि ज्या आपल्या बंधूंनीं तुमच्या एकट्याच्या सत्यप्रियतेकरितां राज्यसुखावर लाथ मारली, ते आपले बंधू, तुमचा तसा हट्ट असता तर आपणाबरोबर आजन्म वनवासांतहि राहण्यास कबूल झालें असते.

वल्ल०--महाराज, क्रूरपणाशिवाय व निष्ठुरपणाशिवाय युद्धच होणार नाहीं. बाण सोडला कीं शत्रूंनीं आपखुषीनें व सुखानें मरणाला तयार व्हावें, असली युद्धकला मानवी क्षत्रियांना कधींकाळीं साधेल काय ?

सैरं०--आपले पुरुष लढाईत पडले म्हणून कोणच्या शत्रूचीं बायकामुलें रडल्यावांचून राहातील ?--मला वाटतें ह्या अज्ञातवासाचे दिवस कसे तरी आम्ही कंठले, आणि नंतर दुर्योधनानें आपल्या राज्याचा हिस्सा आपल्याला दिला नाहीं, तर कौरवांच्या बायका अनाथ होतील, एवढ्या कारणावरूनच इकडून पुन्हां अरण्याचा रस्ता धरला जाईल !

कंक०--द्रौपदी, भीमा, मी पुन्हां निक्षून सांगतों कीं, आजचा हा कीचकवधाचा प्रश्न तर बाजूलाच राहूं दे, पण उद्यां अज्ञातवास संपल्यावर कौरवांचें पापाचरण अत्युत्कट झालेलें मी पाहिल्याशिवाय, व त्यांचा संहार न करतां दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें कौरवांचा उद्धार होणें शक्य नाहीं असें मला वाटल्याशिवाय सुयोधनाचा वध समरांगणावरहि करावयाला मी संमति देणार नाहीं.

सैरं०--महाराज, त्या दुरात्म्या कीचकाचें मी शरीरानें, मनानें, बुद्धीनें, कोणचेंच नुकसान केलें नाहीं. असें असतां जर माझ्याविषयीं त्याच्या मनांत पापबुद्धि प्रबल झाली व त्याला सन्मार्गावर आणण्याचे कामीं त्याची बहीण सुदेष्णा व त्याची बायको रत्नप्रभा ह्यांनींहि जर हात टेकले, तर त्याच्या ह्या उत्कट पापाबद्दल त्याचा वध करून त्या कीचकावर व अनुकीचकांवर उपकार करून--त्यांचा उद्धार करण्याची वेळ जवळ आली नाहीं काय ?

वल्ल०--कीचक किंवा अनुकीचक ह्यांच्या सुतळीच्या तुकड्याचाहि लोभ

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

पांडवांनीं कधींकाळीं केला नाहीं. कीचक किंवा अनुकीचक ह्यांच्या योग्य सुखाच्या व चैनीच्या आड क्षणभरहि जाण्याची पांडवांची इच्छा नाहीं. अशा रीतीनें आम्ही पांडव वागत असतां, पांडवांच्या सुखाचें साधन–पांडवांची धनदौलत–ही महासाध्वी द्रौपदी–हिचें बलात्कारानें हा कीचक हरण करूं पहात आहे. देव आणि धर्म ह्यांना न जुमानतां आपली पापी चैन, लहर लागेल त्याप्रमाणें चालविण्याची ह्याला घमेंड आहे. निरपराधी साधुतुल्य पांडवांना पिढ्यानपिढ्या कष्टमय स्थितींत लोटून देण्याचें अतर्क्य पाप करायला हे कीचक व अनुकीचक तयार झाले आहेत. तर अशा स्थितींत अजातशत्रू धर्ममहाराज, कीचकाचा वध करायला ह्या भीमाला आपली संमति मिळणार नाहीं काय ?

कंक०—मी कधींच परवानगी देणार नाहीं असें नाहीं; पण अद्याप वधापूर्वीचे सगळे उपाय संपले नाहींत. सुदेष्णा व रत्नप्रभा ह्यांच्या कानउघाडणीला जरी कीचक जुमानीत नसला, तरी विराट महाराजांनीं मनावर घेतल्यावर कीचकाला ह्या पापापासून परावृत्त करण्याची शक्ति त्यांच्या आंगीं आहे. (पडद्यात–महाराजाधिराज विराट महाराज वसंत महालांत विराजमान झाले असून सर्व द्यूतकारांनीं तेथें जमावें असा महाराजांचा हुकूम आहे हो.) द्रौपदी, ह्या बागेंतच आज द्यूत व्हायचें ठरलें असून मला तेथें हजर झालें पाहिजे; मी महाराजांपाशीं आतां हा प्रश्न काढतो, तोंपर्यंत कोणचीहि अविचाराची गोष्ट करायला प्रवृत्त होऊं नका. (जातो.)

सैरं०—प्राणनाथ, शंभर कौरवांना मारून दुःशासनाच्या रक्तानें भिजलेल्या हातांनीं माझी वेणी घालण्याची आपली प्रतिज्ञा पुरी होईल असें मला वाटत नाहीं.

बल्ल०—कां, द्रौपदी अशी भलतीच शंका तुझ्या मनांत येते तरी कशी ? कौरव जर माझ्या गदेच्या प्रहारानें मेले नाहींत तर ह्या भीम जन्मास आल्याचें सार्थकच होणार नाहीं.

सैरं०—कौरव–पांडवांचें युद्ध सुरूं झाल्यावर प्रतिज्ञा केल्याप्रमाणें आपण पराक्रम करून दाखवाल, त्याबद्दल मला शंका नाहीं. पण आपले वडील बंधु खोट्या सत्यप्रियतेच्या नादीं लागल्यानें आपणा सर्वांना शस्त्र हातीं घेण्याचा

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

प्रसंगच येणार नाहीं.–प्राणनाथ, हा कीचक उवड उवड माझ्यावर जुलूम करायला कमी करायचा नाहीं व ह्या अज्ञातवासांतच द्रौपदी,—

वल्ल०—आणि द्रौपदीबरोबर सर्व पांडव,—

सैरं०—नामशेष होणार,—

वल्ल०—तशी भीति नको वाळगायला. तसाच प्रसंग येऊं दे, कीं ह्या कीचकाला भर रस्त्यावर सर्वांदेखत रथांतून ओढून काढून लाथ मारून ठार करीन, हें पक्कें लक्षांत ठेव.

सैरं०—पण असल्या कृत्यानें पांडव उघडकीला येऊन पुन्हां बारा वर्ष वनवासांत काढावीं लागतील, त्यापेक्षां मी नाहींशी होऊन—

वल्ल०—कौरवांच्या रक्तानें भिजलेल्या माझ्या हातांनीं तुझी वेणी घालण्याची माझी प्रतिज्ञा कधींहि खोटी व्हावयाची नाहीं. द्रौपदी, ह्यापुढें धर्मराजाच्या नादीं लागण्याचीं आम्हाला जरुरी नाहीं. तूं मला हुकूम कर; ह्या क्षणीं कीचकाला नाहींसा करतो. (पडद्यांत–ए पोरीनों, त्या पुष्पवाटिकेंत चोहोंकडे नीट पाहून सैरंध्रीचा तपास काढा. मी त्या पलीकडच्या आमराईंत जरा विश्रांति घेतों.) सैरंध्री, हा पहा कीचक इकडे येतो आहे.–आतां मला हुकूम कर,–असाच्या असा ह्याला चिरडून झाडाच्या ढोलींत देतों फेकून !—अरे रे !–ह्या वेळीं जर धर्मराजाची संमति मिळाली असती तर कीचकवध करायला ही संधि कशी नामी आली होती.–पांचाली, ह्या अधमाला यमपुरीची वाट दाखवूं का ?

सैरं०—नको, प्राणनाथ नको, तिकडच्या संमतीशिवाय आम्हांला कीचक-वध करायचा नाहीं; पुन्हां केव्हां तरी संधि येईल.

वल्ल०—तर मग तूं आणि मी एका जागीं असलेली ह्याच्या दृष्टीस पडतां कामा नये.

सैर०—आपण ह्या झाडाच्या ढोलींत लपून बसावें. आपण इतक्या जवळ असल्यावर मला बिलकूल भीति नाहीं. आणि तशीच वेळ आली तर मी इतक्या मोठ्यानें ओरडेन कीं, वसंत महालापर्यंत माझ्या आरोळ्या सहज ऐकूं जातील. (भीम जाऊन लपून बसतो.) (स्वगत) ह्या चांडाळाला पाहिलें कीं मला दुःशासनाची आठवण होते,–प्रथम ह्या गेल्याच्या रक्तानें

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

भिजलेले तिकडचे हात पाहिल्याशिवाय कौरवांच्या रक्तानें माझे केंस माखले जातील असा मला भरंवसा वाटत नाहीं.–हा मेला कसें वेडें वांकडें अधमपणानें बोलतो हें धर्मराजांकडून ऐकणें झाल्याशिवाय त्यांच्या रागाची ज्वाळा चांगली प्रज्वलीत व्हावयाची नाहीं. मोठमोठ्या धाडसाच्या कृत्यांना प्रवृत्त करायला राग पुरुषांना अवश्य आहे. (कीचक प्रवेश करितो.)

कीच०—(स्वगत) बरी दृष्टीस पडली. आतां हिला अशी माझ्या महालाकडे ओढून नेतों. जाते कुठें आतां ?—पहिल्या दिवशीं मीं हिला ओढून न्यावयाची गय केली तिथेंच चुकलें.–ह्या दासदासींना उठल्या बसल्या लाथा मारीत असलें पाहिजे. माझी सर्व अनुकीचकांना आज्ञा आहे, दासदासींशीं केव्हांहि एक क्षणभर गोडी गुलाबीनें बोलूं नका. उठतां लाथ आणि बसतां बुक्की, असें जर ह्यांना वागविलें नाहीं तर लगेच आम्हां कीचक–अनुकीचकांच्या बरोबरीचे आपण आहों असें ह्यांना वाटतें; आणि आमच्या मिजाशी ह्यांच्या डोळ्यांत खुपून आमची सत्ता ह्यांना जुलमाची भासूं लागते. असेंच केलें पाहिजे. हिच्या मुसक्या बांधून हिला भर रस्त्यांतून फरफर ओढीत महालाकडे नेली पाहिजे. (बसतो) सैरंध्री, ये, अशी जवळ येऊन उभी रहा. येथें तूं काय करीत आहेस ?

सैरं०—सुदेष्णा महाराणीसाहेबांकरितां फुलें तोडीत आहे.

कीच०—सैरंध्री, माझें मन तुझ्यावर गेलें म्हणूनच माझ्या नाटकशाळेत राहूं देण्याचा मी तुला मान देत आहे.–मी तुला तुझ्या हिताची गोष्ट सांगतों. तूं द्रौपदीची दासी होतीस नव्हे ? द्रौपदी लवकरच माझी नाटकशाळा व्हावयाची आहे; तेव्हां तुला तिची पुन्हां दासी व्हावें लागेल अशी बिलकूल भीति बाळगूं नकोस.–माझ्या नाटकशाळेचा नियम असा आहे कीं, नाटकशाळेंत शिरण्यापूर्वीं कोणाचा कसा दर्जा होता, उच्च कोण नीच कोण, ह्याची बिलकूल चौकशी करावयाची नसून नाटकशाळेंत शिरल्यावर सर्व बायका एकाच दर्जाच्या होतात. पुढें द्रौपदी ही तेथेंच येईल आणि तुला उगें पाणें टाकून बोलेल, तुझ्या नीच दर्जाची ओळख देऊन तुला कमी लेखेल, किंवा तुझा पाणउतारा करील, अशी शंकाहि घेण्याचें कारण नाहीं. माझ्या नाटकशाळेंत सर्वांना सारखाच मान व सारखाच दर्जा दिलेला आहे. हें पहा सैरंध्री, ह्या कीचकानें आजपर्यंत कोणाचींच आर्जवें केलीं नाहींत; पण तुला म्हणून तुझ्या

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

हिताची गोष्ट सांगतो. तूं जर आपण होऊन आपखुषीनें माझ्या नाटकशाळेंत आलीस आणि जर माझें मन प्रसन्न करून घेतलेंस, तर–मी तुझ्यावर हा उपकार करीत आहे, ह्या उपकाराला तूं पात्र आहेस असें मात्र आपल्या वर्तनानें मला दाखविलें पाहिजे,–तर हें पहा, मी द्रौपदीला देखील तुझ्या ताब्यांतील–तुझ्या हाताखालीं वागणारी–दासी करीन. पहा नीट विचार कर, हा जो मी तुझ्यावर विश्वास टाकीत आहे, त्याची जोखीम पुरती ओळखून तुला वागलें पाहिजे; नाहींतर तुझ्याविषयींची माझ्या मनांतील सहानुभूति––

सैरं०––मेल्या सूतपुत्रा, तोंड आटपून बोल. ही सैरंध्री आज तुला दासीच्या वेषांत असल्यासारखी जरी दिसत असली तरी दिव्य यक्षांची शक्ति हिचें संरक्षण करण्यास तयार आहे, असें तुझ्या अनुभवास येईल.

कीच०––सैरंध्री, असल्या वाष्कळ बोलण्यानें तूं मात्र आपल्याविषयींची माझ्या मनांतील सहानुभूति नाहींशी करून घेत आहेस.–ह्या अशा वल्गनांकडे व धमकावणीकडे मजसारखे धैर्यशील व प्रतापी पुरुष केव्हांच लक्ष देत नसतात. तेव्हां मला भिवविण्याचा तुझा हा प्रयत्न व्यर्थ आहे. ह्यापासून तुझें मात्र नुकसान खात्रीनें होईल हें पक्कें लक्षांत ठेव.–अग एखाद्या कंगालाची तूं मुलगी, एखाद्या दासाची तूं बायको,–यक्षांच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगून आपलें हसें करून कां घेतेस? विलास म्हणजे काय ह्याची कल्पना चुकून स्वप्नांतहि ज्याला आली नसेल अशा एखाद्या पशूच्या सहवासांत आजपर्यंतच्या रात्री कंटल्या असशील. मातीच्या भांड्यांत ज्यांनीं कदान्न शिजवावें अशा भिकारड्या आजापणजांच्या झोंपडींत वल्कलें पांघरून तूं दिवस काढिले असशील; पण प्यारी, सैरंध्री, विधात्यानें तुझें शरीर सुंदर घडविल्यामुळें तुझा दर्जा नसतांहि, तुझ्या बापजाद्यांची योग्यता नसतांहि, मजसारख्या प्रतापी व सत्ताधारी पुरुषाला तुझ्याशीं एकांत करण्यास वाईट वाटत नाहीं, ह्याबद्दल परमेश्वराचे धन्यवाद गा; आणि अप्सरांनाहि दुर्मिळ असणारे वस्त्रालंकार अंगावर घालून इंद्राणीलाहि दुष्प्राप्य अशा माझ्या रंगमहालांत रहावयास कबूल होऊन, सैरंध्री, जगांतील सर्व राज्यसत्ता ज्याचे ठिकाणीं एकवटली आहे अशा या कीचकाचें मन आपल्या विलासांनीं आपल्या मुठींत घे, व माझ्या नाटकशाळेंतील अत्यंत दैदिप्यमान हिरकणी तूं हो.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सैरं०—पाप्या, अनुकीचकांची तुला पूर्ण मदत असल्यामळें विराट मह राजांना जरी तूं कस्पटाप्रमाणें लेखीत असलास, आणि मत्स्यदेशांत आपणाह दुसरा कोणी अधिक श्रेष्ठ नाहीं अशी जरी घमेंड तुला वाटत असली, तं सर्वांचा न्याय करण्यास परमेश्वर बसला आहे, हें ध्यानांत ठेव. साध्वीं छळ करण्याच्या तुझ्या या पापामुळें तुझ्या शक्तीला कीड लागून अमर वाटणारी तुझी सत्ता हां हां म्हणतां ढासळून पडेल. चांडाळा, सदाचारी लोकां नाहक छळ करण्याच्या तुझ्या पापामुळें क्रुद्ध झालेल्या परमेश्वरी शक्ती दूत, तुझ्या पापाचा घडा केव्हां भरेल म्हणून, तुझ्या भोंवतीं घिरट्या घाली असून तुझा बळी घेण्यास टपलेले आहेत.—पापाचा मद तुझ्या डोळ्यां चढलेला असल्यामुळें हे दिव्यदूत तुला दिसत नाहींत; पण दुष्टा राक्ष हें पक्कें लक्षांत ठेव, पापाच्या मार्गांत एक पाऊल आणखी पुढें टाक म्ह ते दिव्यदूत येथें प्रगट होतील. पाप्या, विराटाला बगलेंत मारून एवढी प्र राजसत्ता चुटकी वाजवितां वाजवितां तूं मुठींत घेतलीस म्ह जे लोक आज चकीत झाले आहेत, तेच लोक पापाच्या एक दोन मिट कीचक मारतो न मारतो तोंच त्याचा कसा नाश झाला म्हणून आश्चर्य लागतील.

कीच०—सैरंध्री, असल्या ब्रम्हज्ञानाच्या गोष्टी सांगण्याचा आव घा तूं आपलें नुकसान करून घेत आहेस.—तुला माझ्या नाटकशाळेंत आं पाहिजे. ही गोष्ट ठरलेली असून कालत्रयींहि फिरणारी नाहीं. मग उं पापपुण्याचें चऱ्हाट वळून, माझ्या मनांतील तुजविषयींची सहानुभूति——

सैरं०——कसलीरे मेल्या सहानुभूति ? आग लागो तुझ्या या सहानुभूतील सहानुभूति, सहानुभूति, म्हणून आम्हां सर्वांना तुझ्या रांडाच बनविणार नाहीं?—ह्या गाढवाला आपल्या ह्या असल्या सहानुभूतीचा दिमाख दाखवायल लाज वाटत नाहीं !

कीच०—(उठून) रांडरूं तें रांडरूं आणि ढंग पहा कसा पतिव्र आणला आहे.—सैरंध्री, एवढें समजण्याची तुला अक्कल नाहीं, तूं जर ए मोठी सद्गुणी असतीस तर अशी दासी कां झाली असतीस ?—न्यायान्याय गोष्टी आणि म्हणे दासदासींच्या तोंडांत !—सैरंध्री, तूं काय समजली आहे

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

कौरवांनीं तुझ्या यजमानणीला–द्रौपदीला–रथी, अतिरथी, महारथी अशा पोक्त व वयोवृद्ध महानुभावांच्या सभेंत स्वतःच्या हातांनीं नग्न करण्याचा प्रयत्न केला, पण हा कीचक– एखाद्या अनुकीचकाच्या नोकराकडून भर बाजारच्या चव्हाटचावर तुला उघडी नागडी करील; आणि माझी नाटकशाळा होण्याच्या मानास मुकशील इतकेंच नव्हे तर, एखाद्या क्षुल्लक अनुकीचकाची रंडी होऊन तुला दिवस कंठावे लागतील. चल, तुला अशी ओढून माझ्या महालाकडे नेतों. (हात धरतो.) बोलाव तुझे यक्ष, किन्नर, देवदूत कोण कोण तुझ्या साह्याला येणारे आहेत त्या सर्वांना बोलाव. त्या सर्वांच्या देखत तुझी अब्रू घेऊन––

सैरं०––धांवा हो धांवा, दुष्ट लांडग्यापासून ह्या गाईचें संरक्षण करा.

कीच०––या, कोण कोण देवदूत, देव महादेव येणार असाल ते या. माझ्या कचाटचांतून सैरंध्रीला सोडविण्याची कोणाची प्राज्ञा आहे तें पाहूं दे.–या, या, (सैरंध्री पूर्वोक्त ओरडते) सर्वांना माझें हट्टाचें आमंत्रण आहे. दृश्य, अदृश्य, सर्व शक्ति येऊं देत.–सर्वांना डाव्या हातानें थोपवून धरून–या उजव्या हातानें तुझा पदर ओढून–तुझी अब्रू घेतली नाहीं तर हा कीचक क्षणभरहि पृथ्वीतलावर जिवंत रहाणार नाहीं. (सैरंध्री पूर्वोक्त ओरडते) (कीचक पदर ओढूं लागतो,)––गाईचें रक्षण करायला बोलाव, पुन्हां हांवरडा फोडून बोलाव, कोणता बैल मरायला पुढें येतो तें पाहूं दे.

(रत्नप्रभा व सुदेष्णा प्रवेश करतात)

र० व सु०––(दोघी मिळून) महाराज काय हा अविचार–असलें पाप !

रत्न०––सोडून द्या, गरीब गाईला सोडून द्या.

सुदे०––गरीब अबलेवर बलात्कार करण्यांत काय बरे पुरुषार्थ आहे ?

(कीचक सैरंध्रीला सोडून देतो)

कीच०––सैरंध्री, कोणचाहि पुरुष, किंवा कितीहि अक्षोहिणी पुरुषांचें सैन्य तुझ्या मदतीस या वेळीं धांवून आलें असतें, तरी या वेळीं तुला सोडली नसती. पण कांहीं प्रसंगच असे चमत्कारिक असतात कीं लग्नाचे बायकोपुढें पुरुषांना गयच खावी लागते.–आतां ह्या वेळेस तुला सोडली खरी; पण ज्या ह्या सूर्यनारायणाचे देखत तुला ओढणार होतों, तो हा सूर्यनारायण अस्ताला

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

जाण्यापूर्वीच त्याला आपल्या कोट्यावधि डोळ्यांनीं सैरंध्रीला माझ्या नाटकशाळेंत शिरतांना पहावें लागेल, आणि आजची रात्र संपून सूर्यानें पुन्हां आपले डोळे उघडल्यावर कीचकानें उपभोगिलेली सैरंध्री त्याच्या नजरेस पडेल.–सुदेष्णा महाराणीसाहेब, मी ही माझी प्रतिज्ञा सूर्यनारायण व मत्स्य-देशाची अभिषिक्त महाराणी ह्यांच्या देखत केली असून, माझ्या प्रतिज्ञेप्रमाणें माझ्या मनगटाच्या जोरावर मी सर्व गोष्टी घडवून आणणार.–विराट महाराज आणि कीचक व अनुकीचक यांच्यामध्यें उघड दुष्मानगिरी उत्पन्न होऊं नये, अशी जर आपली इच्छा असेल, तर तुमच्या ह्या दासीला–माझ्या आजचे रात्रीच्या नाटकशाळेला विलासी अभिसारिकेस साजेल असा शृंगार घालून, पुष्पमालांनीं सुशोभित करून, मद्याची सुवर्णपात्रें हातांत देऊन,–सूर्य दोन घटका बाकी असतांच–मजकडे पाठवाल.–दोन घटिका दिवस असतांना जर ही तुमच्या राजवाड्यांतून बाहेर पडली नाहीं, तर मी विराट महाराजांचा कोणी नव्हे, व विराट माझा कोणी नव्हे. (पडदा)

अंक तिसरा समाप्त.

———

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

अंक चवथा

प्रवेश पहिला.

स्थळ---राजवाड्यांतील पटांगण. सौदामिनी व मैत्रेय प्रवेश करितात.

मैत्रे०---सैरंध्रीचें मन वळविण्याचें काम आपल्या हातून होत नाहीं.

सौदा०---कंकभट काय म्हणतो ?

मैत्रे०---अग जुवेबाज तो-महाराज आणि हा भट जुवा खेळण्यांत गुंग आहेत ! माझ्याशीं बोलायला कंकभटाला वेळ नाहीं; आणि सुदेष्णा महाराणी-साहेब, रत्नप्रभाराणीसाहेब, महाराजांच्या दर्शनाला आल्या होत्या, त्यांच्याशीं बोलायला महाराजांना वेळ नाहीं.-पांडवांच्या युधिष्ठिर राजानें द्यूत खेळून जसा आपला नाश करून घेतला, तशीच ह्या विराट राजाची स्थिति होणार. जुव्यापुढें राजकाजाकडे बघायला वेळ कुठें आहे ?---कीचक व अनुकीचक अशानेंच प्रबल झाले.

सौदा०---आतां अगदीं आणीबाणीची वेळ आली, आणि हा कंकभट जुव्यांत गढलेला ! पुरा मेला जुवेबाज.-सुदेष्णा महाराणीसाहेबांनीं आतां सैरंध्रीला अगदीं निक्षून हुकूम केला, दोन घटका दिवस बाकी असतांना मद्याची सुवर्णपात्रें घेऊन कीचकमहाराजांच्या महालाकडे गेलेंच पाहिजे म्हणून.

मैत्रे०---मग सैरंध्री काय म्हणाली ?

सौदा०---जीव देईन पण कीचकाला अंगाला हात लावूं देणार नाहीं.

मैत्रे०---जीव दिला तर तुझें बरेंच होईल. तुझी एक सवत आयती नाहींशी झाली. कीचक महाराज-दोन दिवस शोक करतील -मग आपोआप तुझ्याच नादीं---

सौदा०---माझ्या मनांत आता एक युक्ती आली आहे ! असें करावें म्हणतें, सैरंध्रीचें मन वळवून मद्याची पात्रें घेऊन इथून तर तिला बाहेर पडायास लावावी, आणि मग तें मद्य आपल्या हातीं घेऊन हळूच कीचक

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

महाराजांच्या रंगमहालांत प्रवेश करावा. कीचक महाराज नेहमींच सायंकाळीं मद्यपान करतात; शिवाय माझ्या हातांतील मद्य प्राशन केल्यावर मग काय होईल आणि काय नाहीं !

मैत्रे०—युवती तर खाशी आहे !—आज सायंकाळीं तूंच कीचकमहाराजांची नाटकशाळा होणार. मग आम्हांला किती कंठे बक्षीस देवविणार ?

सौदा०—बक्षीस पुष्कळ कंठे मिळतील; पण मी म्हणतें तसें करा. कंकभटाकडून सैरंध्रीचें मन तेवढें वळवा.

मैत्रे०—तें काम माझें, हा लागलों त्या उद्योगाला. (जातो)

सौदा०—(स्वगत) हा जुवेबाज कंकभट जुवा सोडून असल्या गोष्टीकडे कुठून लक्ष देणार ? ह्याच्यावर विसंबून राहून सोय नाहीं. बल्लभ आचाऱ्याच्या मार्फत उद्योग आरंभला पाहिजे. हा कोण हातांत पळा घेऊन येतो आहे ? हा वल्लभाच्या हाताखालीं परवां नेमलेला सिद्धपाक दिसतो. ह्याला विचारलें म्हणजे वल्लभ आचारी ह्यावेळीं कुठें आहे तें समजेल.

(सिद्धपाक व विद्याधर प्रवेश करतात)

सिद्ध०—विद्याधर, ह्याच त्या दासीसाहेब, ज्यांच्याकडे बल्लभ महाराजांनीं आम्हांला पाठविलें.—तुझें नशीब सवाई कीचक असलें पाहिजे, नाहीं तर इतक्या तावडतोब कुठचें दर्शन व्हायला !—पड, पाया पड, एकदम पाया पड.

(विद्याधर साष्टांग नमस्कार घालून, गढगे टकून हात जोडून बसतो.)

सौदा०—कायरे, सिद्धपाक, हें काय प्रकरण आहे ?

सिद्ध०—महादासीसाहेब, हा मोठा पंडित आहे.—ह्यानें गुरुजींच्या घरीं विद्याभ्यास—किती वर्षें—किती वर्षें रे विद्याधर ?

विद्या०—बारा पंधरा वर्षें, मेहेरनजर दासीसाहेब.

सिद्ध०—ह्यानें पंधरा वर्षें अध्ययन करून मोठमोठ्या ज्ञानवृद्धांनीं ह्याला अजिंक्यपत्र लिहून दिलें आहे.—काय लिहिलें आहेरे त्यांत ? बोल—बोल.

विद्या०—तीन सभा जिंकल्या आहेत म्हणून, महादासीसाहेब.

सिद्ध०—हा महापंडित आहे. पंडितांच्या सभेंत कोणासारखा शोभतो हा—कोणासारखा—मी विसरलों—कोणासारखा—प्राचीन ऋषींची नांवें माझ्या टाळक्यांत टिकावच धरून रहात नाहींत.—कोणासारखारे ?

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

विद्या०---बृहस्पतीसारखा, मेहेरबान दासीसाहेव.

सौदा०---मग ह्याचें पुढें काय ?

सिद्ध०---ह्याचें असें झालें–काय झालें–काय झालेंरे ?

विद्या०---कोठें वृत्ति मिळेना म्हणून माझी उपासमार चालली आहे, दीनदयाळ महादासीसाहेव.

सौदा०---ह्या पंडिताची अशी दीन स्थिति पाहून मला ह्यावद्दल फार कींव येते !---गरीव विचारा पुरुषांच्या जन्माला न येतां वायकांच्या जर जन्मास आला असता, तर एखाद्या अनुकीचकाच्या नाटकशाळेंत तरी ह्याला चिकटून दिलें असतें.

सिद्ध०---ह्याला अर्थशास्त्र येतें–ज्योतिषशास्त्र येतें–हा वैय्याकरणी आहे–आहेस नारे ?

विद्या०---आहें सरकार.

सिद्ध०---गणिती आहे, आहेस नारे ?

विद्या०---आहें गरीवपरवर.

सिद्ध०---ह्याला इतिहास येतो; येतो नारे ?

विद्या०---येतो हुजूर.

सिद्ध०---ह्याला छंदशास्त्र येतें; येतें नारे ?

विद्या०---येतें; दयानिधे महादासीसाहेव.

सौदा०---ऊठ, ऊठ, तुला काय येत नाहीं तें सांग, म्हणजे थोडक्यांत आटपेल.

विद्या०---(उठून) पाकशास्त्र येत नाहीं, आणि पाकशास्त्राला लागणारी सामुग्री मिळवितां येत नाहीं; वाकी सर्व येतें, दयासागर महादासीसाहेव.

सिद्ध०---म्हणूनच हा उपाशी मरतो, महादासीसाहेव.–हा मोठा पंडित आहे खरा, पण एखाद्या अनुकीचकाची नाटकशाळा किंवा दासी होऊन पोट भरील म्हणावें तर हा वायको नाहीं ! नाहींसना ?

विद्या०---दुर्दैवानें पुरुषाच्या जन्माला आलों; भाग्यावतार महादासी साहेव.

सिद्ध०---वाणिज्यवृत्ति करील म्हणावें तर भांडवल नाहीं; आहे, भांडवल ाहे ?

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

विद्या०—पोथ्यापुस्तकांत सगळें गमावलें, द्रव्यावतार महादासीसाहेब.

सिद्ध०—असा हा उपाशी मरतो आहे, म्हणून वल्लभ आचारी महाराजांपाशीं गोष्ट काढली—सैरंध्रीमहादासीवर कीचकमहाराजांचें मन असून सैरंध्रीमहादासीसाहेब जरा वल्लभमहाराजांच्या तंत्रानें आहेत तेव्हां सैरंध्रीमहादासीसाहेबांच्या मार्फत वशिला——

सौदा०—मग सैरंध्रीमार्फत कांहीं वशिला नाहीं लागत ?

सिद्ध०—वल्लभमहाराज म्हणाले, सैरंध्रीमहादासीसाहेब रुसून बसल्या असून इतर दासीसाहेबांत सौदामिनी दासीसाहेबांच्या इतकें वजन कीचकमहाराजांपाशीं दुसऱ्या कोणाहि दासीसाहेबांचें नाहीं. कीचकमहाराज केव्हां केव्हां शेंबडी, लोचट अशा सलगीच्या शिव्या देण्याचा अनुग्रहहि सौदामिनी महादासीसाहेबांवर करीत असतात, अशी या पायांची तारीफ वल्लभमहाराज करीत होते. ह्या गरीब पंडितावर मजमुळें वल्लभमहाराजांचें प्रेम असून, आतां इतक्यांत येऊन ते स्वतः रदबदली करणार आहेत.

सौदा०—बरे, ते आले म्हणजे मी पलिकडे महालक्ष्मीचे मंदिरांत आहे तेथें त्यांना पाठवून दे. (स्वगत) हा वल्लभ—ह्या पंडिताकरितां—माझी आर्जवें करण्यास येत आहे हें माझ्या पथ्यावर पडलें म्हणायचें. आतां त्याच्याकडून सैरंध्रीचें मन वळविलें म्हणजे सैरंध्रीच्या ऐवजीं मीच आज संध्याकाळीं मद्याचीं सुवर्णपात्रें घेऊन कीचक महाराजांच्या रंगमहालांत शिरणार (जाते)

सिद्ध०—चल, विद्याधर, वल्लभमहाराजांकडे. आतां तुझें काम फत्ते झालें म्हणून समज. अरे आजकाल विनपैशाच्या वशिल्याचे मार्ग दोन. एक कीचक किंवा अनुकीचक ह्यांच्या घरीं असणाऱ्या अस्मादिकासारख्या पाकाधिकाऱ्याचीं आर्जवें करावींत, आणि दुसरा कीचक किंवा अनुकीचक यांच्याकडून गुप्त किंवा उघड नाटकशाळेचा मान मिळालेल्या एखाद्या सौदामिनीच्या पाया पडावें !

विद्या०—आतां माझे वशिले दुहेरी झाले, तेव्हां मला लहानशी तरी वृत्ती खात्रीनें मिळणार.

(जातात)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

प्रवेश दुसरा

स्थळ—कीचकाचे महालापुढील पटांगण.—सौदामिनी, मद्याची सुवर्ण पात्रें हातांत घेतलेली सैरंध्री व वल्लभ प्रवेश करितात.

सौदा०—गडे सैरंध्री, आजच्या आनंदासारखा आनंद मला कधींच झाला नव्हता. रात्रीच्या कोमल सुखाच्या लहरींत मी गढून गेलेली असल्यामुळें ह्या मावळत्या सूर्याचे आरक्त किरण मला कामोद्दीपक शशिप्रभेनेंच न्हावूं घालत आहेतसें वाटतें, आणि प्रियाच्या समागमाकरितां उत्सुक झालेल्या ह्या अभिसारिकेस तिकडच्या रंगमहालापर्यंत पोंचवावयास आलेली तूं दूति असावीस असा मला भास होतो. खरेंच गडे सैरंध्री, ह्या रस्त्यांतील कोणाच्याहि महालाचा दरवाजा दिसला तरी तिकडच्या रंगमहालापाशीं आलोंसें मला वाटे, व कोणचाहि पुरुष दृष्टीस पडला तरी तिकडूनच येणें झाल्याचा भास होऊन दोन तीनदां तर आमच्या सोबतीस आलेल्या ह्या वल्लभाला पाहूनच कीचक महाराज फारच जवळ आलेसें समजून मी लाजलेंहि !

वल्ल०—सौदामिनी, आपण खरेच कीचकमहाराजांच्या महालापाशीं आलों. हीं मद्यपात्रें हातांत घेऊन तूं आंत प्रवेश कर व सैरंध्रीच्या ऐवजीं मी मद्य पोंचवावयाला आलें आहे, अशी त्यांना विनंति कर.

(सैरंध्री मद्यपात्रें सौदामिनीच्या हातीं देते)

सौदा०—सैरंध्री, आपलें पूर्वी ठरल्याप्रमाणें तूं दरबारांत जाऊन विराट महाराजांपाशीं आपली विनंति सादर कर.—इकडे कीचक महाराजांचें मन रंजविण्याचा मी प्रयत्न करतें, व परमेश्वरानें मला यश दिल्यास तुझेंहि काम आयतेंच झाल्यासारखें होईल.—माझ्या सौंदर्यसामर्थ्यावर माझा पूर्ण विश्वास असून कीचक महाराजांपासून ह्यापुढें तुला खात्रीनें कांहीं त्रास होणार नाहीं. निर्धास्त मनानें तूं आतां ह्या वल्लभाबरोबर विराट महाराजांचे दरबाराकडे जा. मी आतां तिकडच्या महालांत प्रवेश करितें. (सौदामिनी जाते.)

वल्ल०—द्रौपदी, ही वेळ तर आपण कशीबशी मारून नेली.—आतांच्या आतां मद्यपात्रें घेऊन बाहेर पड असा जर सुदेष्णा महाराणीसाहेबांनीं हुकूम केला नसता तर ह्या हलकट दासीच्या युवतीकडे लक्ष देण्याचेंच आम्हाला कारण नव्हतें.—पण दरबारांत सायंकाळीं तुझ्या विनंतीचा विचार करीन

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

असें विराट महाराजांनीं दादांना सांगितलें, आणि इकडे तर महाराणीचा असा हुकूम !

सैरं०——मद्यपात्रें घेऊन जावयास मी निघालें असें पाहून महाराणीसाहेबांना बरें वाटलें खरें, पण आतां दरबारांत मला पाहिल्यावर त्या पुन्हा रागावतील.

बल्ल०——पण दादांचें म्हणणें असें आहे, विराट महाराज तुझ्या विनंतीचा विचार तुझ्यासारखाच करतील, मग ह्या मागच्या गोष्टी आपोआप मिटतील.

सैरं०——त्यांची आज्ञाच आहे, तर मी येऊन विनंति करीन बापडी !—— विराट महाराज, सुदेष्णा महाराणीसाहेब, रत्नप्रभा राणीसाहेब, ही सर्व मंडळी एका ठिकाणीं जमून त्यांनीं माझें म्हणणें नीट ऐकून घेतल्यावर योग्य न्याय करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होईल, ह्यांत संशय नाहीं. पण महाराज, माझ्या मनाला आपलें असें वाटतें, तो मेला कीचक रस्त्यांतच आम्हांला गाठील किंवा आम्ही दरबारांत पाय ठेवतों न ठेवतों तोंच राक्षसासारखा आमच्यापुढें उभा राहील.—कीचक व अनुकीचक हे सांप्रत इतके प्रबल आहेत, कीं त्यांचीं कृत्यें विराट महाराजांना कितीहि अन्यायाचीं व जुलमाचीं वाटलीं तरी त्यांच्या हेक्यापुढें व हट्टापुढें विराट महाराजांना हातच टेकावे लागतील. महाराज, ह्या कीचकाचा उद्दामपणा पाहिला म्हणजे, जगांत परमेश्वर नाहीं ही कल्पना मूर्तिमंत पृथ्वीतलावर डौलानें वावरत आहेसें वाटतें, व परमेश्वराची बेअब्रू करणाऱ्या ह्या पापी प्रदर्शनाचा भपका पाहून साधुसंतांना जंगलांत व पर्वतांत दडून बसणें भाग पडलें असावें असा मला भास होतो.— महाराज, माझ्या मनाची पक्की खात्री आहे कीं, आतांच्या अर्जीचा कांहीं उपयोग होणारा नसून आपल्या पायांत रुतणारा कांटा दुसऱ्यांनीं काढण्याची वाट न पहातां आपला आपणच——

बल्ल०——कांहीं फायदा झाला नाहीं तरी दादाच्या मनाचें तरी समाधान होईल.

सैरं०——म्हणूनच मी झालें तरी विनंति करण्यास येत आहे.—एखाद्या द्वाड वात्रट पोरानें कोठून तरी तलवार मिळवून जर ज्याच्या त्याच्यावर तो वार करूं लागला, तर त्याच्या हातांतील ती तलवार काढून घेऊन त्याचें कल्याण करणें थोर माणसांचें कर्तव्य नाहीं काय ? हा कीचक मदांध होऊन जर

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

निरुपद्रवी आणि निराश्रित लोकांना पीडा करूं लागला, आणि विचारी पुरुषांनीं कितीहि कानउघाडणी केली तरी जुमानिनासा झाला, तर त्याच्या पापाचरणाचें साधन–त्याचें तें पापमय शरीर–त्याच्या हातून काढून घेणें,हें प्रत्येक धर्मनिष्ठाचें पवित्र काम नाहीं काय ?

वल्ल०––म्हणूनच मी म्हणतों कीं, आतां दरबारांत जाऊन विनंति केलीच पाहिजे, म्हणजे सर्वच प्रसंग धर्मराजांचे लक्षांत येईल, व कीचकवधास त्यांची संमति मिळेल.–शिवाय ह्या सायंकाळच्या दोन घटका असल्या वाटावाटींत निघून गेल्या म्हणजे पुढील कार्यास अनुकूल असा रात्रीचा समय सृष्टीच्या रहाटगाडग्याच्या क्रमानें आपोआप प्राप्त होईल.–चल सैरंध्री, लवकर पाऊल उचल, नाहीं तर तूं म्हणतेस त्याप्रमाणें तो दुरात्मा आम्हांस कदाचित् रस्त्यांतच गाठील, व योग्य समयाचे आधी भलतेंच कृत्य माझ्या हातून होऊन पुन्हा बारा वर्षें वनवासांत काढावीं लागतील.

(सैरंध्री व वल्लभ जातात.)

(दुसऱ्या बाजूनें कीचक सौदामिनीस गचांडी मारून हाकून लावीत आहे, असा प्रवेश करितो.)

कीच०––बदमाष, लोचट–पाजी–लाथ मारून कंबरडें मोडतों.

सौदा०––आपल्यावरील प्रेमामुळें अंध होऊन मी येथें आलें––

कीच०––तुला खरी आंधळी करून येथून पाठवून देतों.–ह्या हलकट लोकांना एखादी सलगीची शिवी दिली तरी लागले बरोबरच्या नजरेनें आम्हाकडे पहावयाला.–पायांतलीं खेटरें पायांतच पाहिजेत.–गद्धी, निर्लज्ज, बाजारबसवी–चल हो चालती.– पाजी बेशरम.–सुदेष्णेनें हिला माझ्याकडे मद्यपात्रें घेऊन पाठविली हं !–एखादी बाजारांतली रंडी मजकडे पाठविली म्हणजे ह्या कीचकाची हौस भागली, असा मला नादान समजतात काय ?–आमच्याशिवाय चालेल असा विराटाला व सुदेष्णेला गर्व झालेला दिसतो.––बदमाश, लोचट, (लाथा मारीत) प्रथम तुझीं हाडें मोडतों मग तुझ्या यजमानणीचीं.

सौदा०––नाहीं हो त्यांनीं मला पाठविलें नाहीं; सैरंध्री व मी येथपर्यंत आलों––

कीच०––मग सैरंध्री कोठें गेली ?

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सौदा०—सैरंध्री आपणाला शिव्या-शाप देत होती. असल्या नाटकशाळे-पासून आपणाला सुख होणार नाहीं, असें समजून आपल्यावरील माझ्या प्रेमानें मला आपल्या महालांत ढकललें; व सैरंध्री दरबारांत गाऱ्हाणें गाण्या-करितां निघून गेली.

कीच०—असें काय ?—तर मग तुझ्या या पाजी लोचटपणाबद्दल सैरंध्रीची वाटेंत गांठ पडेपर्यंत तुझा कान धरून तुला ओढीत नेतों—सैरंध्री असेल तेथें गांठतों. आजच्या रात्रीं मी माझी प्रतिज्ञा पुरी करणार. विराट—सुदेष्णा—कोण पाहिजे ते माझ्या प्रतिज्ञेच्या आड येवोत—त्या सर्वांना पायाखालीं तुडवून कीचकाच्या शद्वाविरूद्ध ब्र काढण्याची प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचीहि छाती नाहीं, हें मी माझ्या कृतीनें सर्व मत्स्यदेशाला आज रात्रीं जाहीर करणार.

(सौदामिनीचा कान धरून ओढीत नेतो.)

प्रवेश तिसरा

स्थळ—विराटाचा दरबार. विराट सिंहासनावर बसला आहे. सुदेष्णा, रत्नप्रभा, एका बाजूस बसल्या आहेत; गुरु, पुरोहित दुसऱ्या बाजूस बसले आहेत; दासदासी चौऱ्या वारीत आहेत; मंदहासिनी रत्नप्रभेच्या व सुदेष्णेच्या मागें उभी राहून दोघींवर चौरी वारीत आहे; कंकभट गुरु पुरोहितांच्या मागें उभा आहे; असा देखावा.

विरा०—गुरुमहाराज, पुरोहितमहाराज, कंकभटजींनीं केलेली विनंति आपण आतां ऐकलीच आहे. ह्यासंबंधानें धर्माज्ञा काय आहे ती आपणापासून ऐकावी अशी माझी इच्छा आहे.

गुरु०—महाराज, धर्माज्ञेसंबंधानें ह्या बाबतींत संशयाला जागाच नाहीं. कोणी कोणावर जुलूम करावा, असें धर्म कधींच सांगणार नाहीं.

पुरो०—स्त्रियांवर बलात्कार करणाराला धर्मानें कांहीं प्रसंगीं तर कटाग्नीचें देहांत प्रायश्चित्त सांगितलें आहे; तथापि आपद्धर्म म्हणून—

गुरु०—प्रायश्चित्ताच्या शिक्षेची अंमलबजावणी करण्याचा प्रसंगच येऊं न देणें, हें राजाचें खरें कर्तव्य आहे. असें झालें म्हणजे आपद्धर्माचा प्रश्नच निघत नाहीं.

दुबळी माणसे आपल्यात सामर्थ्य नाही म्हणून धर्मावर चर्चा करतात घोळ घालतात. तात्पर्य

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सुदे०---पण ही वाटाघाट घेऊन काय करावयाची ? सैरंध्री कीचक महाराजांकडे मद्यपात्रें घेऊन गेली आहे.-सैरंध्रीच्या ह्या समंजसपणानें सर्वच विघ्न आपोआप टळलें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

कंक०---महाराणीसाहेब, आपला राग होऊ नये एवढ्याच करितां सैरंध्री मद्यपात्रें घेऊन कीचकमहाराजांच्या महालाकडे गेली आहे. ह्या सिंहासनापाशीं सीं केलेल्या विनंतीचा आतां विचार करण्याचें महाराजांनीं दिलेलें आश्वासन तिला माहीत असून कोणाबरोबर तरी मद्य आंत पोंचवून गेल्या पावलींच ती ह्या दरबाराकडे परत येणार आहे.

रत्न०---महाराणीसाहेब, मला वाटलेंच होतें, सैरंध्री ह्या गोष्टीला आपणच होऊन कधीं कबूल होणार नाहीं.-काय असेल तें असो, यक्षकिन्नरांचें साह्य तिला आहे म्हणून ती म्हणत होती, तें कांहीं खोटें नसावें; आणि हा विचार मनांत आला म्हणजे ह्या पापाचरणापासून तिकडचें मन कसें परतेल, ह्याची मला काळजी लागून रहाते. म्हणून म्हणतें सरकारांनीं जर ह्या बहिणीची विनंति ऐकून तिकडच्या महालापर्यंत येण्याची मेहेरबानी केली आणि सर्व गोष्टी तिकडे समजून सांगितल्या तर सरकारच्या शद्बाला तिकडून मान मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं.

Ch. विरा०---[ह्या प्रसंगीं काय करावें, हेंच मला बरोबर समजत नाहीं. मन द्विधा होत असून पाप व पुण्य हीं दोन्ही मला सारखींच भयंकर वाटत आहेत.] कंकभटजी, दहा बारा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे; पांडव कौरवांच्या दरबारांत तुम्ही वागलेले आहांत, तेव्हां तुम्हांस मी आतां सांगणार ती गोष्ट माहीत असली पाहिजे.-पांडव वनवासाला गेल्यानंतर व्यासादिक महर्षी धृतराष्ट्र महाराजांचे दरबारांत गेले होते. त्यावेळीं सम्राट सुयोधनाचे कृत्याबद्दल नानाप्रकारें त्यांनीं धृतराष्ट्र महाराजांचा निषेध केला व पांडवांना वनवासास पाठविल्याच्या पापापासून मुक्त व्हावयाचें असेल तर दुर्योधनाचा त्याग केल्याशिवाय भागावयाचें नाहीं, असें त्यांनीं निक्षून सांगितलें. अशा समयीं धृतराष्ट्र महाराजांनीं दिलेलें उत्तर आपण सर्वांनीं मनन करण्यासारखें आहे-गुरुमहाराज, पांच वर्षांपूर्वी आपण हिमाचलाच्या यात्रेला जाऊन परत येतांना हस्तिनापुरांत आपण ही हकीगत ऐकून आम्हांस सांगितली होती नव्हे ?

 अगदी उघडा माणूस.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

गुरु०—होय महाराज, मी अगदींच विसरून गेलों होतों. सरकारची स्मरणशक्ति विलक्षण आहे !

पुरो०—हें काय सांगावें !—सरकार, धृतराष्ट्र महाराजांनीं कोणतें उत्तर दिलें ?

विरा०—धृतराष्ट्र महाराज सर्व ऋषींना म्हणाले, सुयोधनाचा दुर्योधन होवो, कांहीं झालें तरी कौरवेश्वर माझा मुलगा आहे. त्यानें सदाचारी व्हावें, पुण्यमार्गानें त्यानें स्वर्ग जिंकावा, अशी माझी मनापासून इच्छा असून त्या प्रमाणें मी त्याला वेळोवेळीं उपदेशहि करीत असतों. तो पापमार्गानें चालला आहे हें मला समजतें; पण माझा उपदेश तो ऐकत नाहीं एवढ्याच करितां—पुत्रप्रेमामुळें म्हणा किंवा सर्व जग ज्या स्वार्थानें व्यापलें आहे त्या स्वार्थाचा पगडा इतरांप्रमाणें मजवरहि बसला असल्यामुळें म्हणा,—मजपासून माझ्या हातानें त्याला ढकलून देण्यास मी तयार नाहीं. आपल्या सारख्यांच्या बोधामृतामुळें तो पुन्हा ताळ्यावर येईल, किंवा पापमार्गांत ठेंच लागल्यानें पुन्हा शुद्धीवर येऊन माझ्या उपदेशाप्रमाणें वागेल, ह्या आशेनें मी माझ्या सुयोधनाला नेहमीं माझ्या हृदयापाशीं कवटाळून धरणार.

सुदे०—ह्यावर ते ऋषी काय म्हणाले ?

विरा०—राजा, तुझ्या सर्व कुळाचा नाश होण्याची वेळ जवळ आली म्हणून समज, असा ते शाप देऊं लागले; तेव्हां त्या ज्ञानशील धृतराष्ट्रानें द्रौपदीवस्त्रहरणाचे प्रसंगीं द्रौपदीला वरप्रदान करून उत्कट पापापासून दुर्योधनास आपण कसें परावृत्त केलें, ह्याची हकीगत ऋषीवर्यांना सांगून, सर्व ऋषींनीं मिळून दुर्योधनाचें मन वळवून त्याला पुन्हा सुयोधन करावें अशी विनंति केली.

रत्न०—त्या विनंतीचा काय परिणाम झाला ?

विरा०—कीचक महाराजांना "द्रौपदीपति" हा किताब देऊन कौरवेश्वरानें हस्तिनापुरांत त्यांचें आदरातिथ्य कसें केलें, हें आपणांस माहीत असल्यामुळें ऋषीवर्यांनीं केलेल्या उपदेशाचा परिणाम कौरवेश्वराच्या मनावर काय झाला, हें मी सांगण्याचें कारण नाहीं.—गुरुमहाराज, धृतराष्ट्र राजाच्या मनाची त्यावेळीं जी स्थिति होती तीच आज माझ्या मनाची आहे.—कीचकमहाराज मला माझ्या

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

भावाहून अधिक प्रिय आहेत. तथापि सैरंध्रीवर बलात्कार करणें हें पाप आहे अशीच माझी दृढ समजूत असल्यामुळें कसें करावें, काय करावें, असें मला होऊन गेलें आहे. मनाचा पक्का निश्चय कांहींच करवत नाहीं.—प्रेम व स्वार्थ ह्यांच्या कचाटींतून बाहेर पडणें मुष्कीलीचें आहे, असें मला वाटतें; म्हणून सैरंध्री आपण होऊन कीचक महाराजांच्या महालाकड गेली असें मीं ऐकलें तेव्हां मला संकट टळलेसें वाटलें.

कंक०——महाराज, मध्येंच बोलतों ह्या कसुरीबद्दल माफी असावी.—कोठें पापाचरण होत असेल तर तें हुडकून काढून त्याचा बंदोबस्त करण्याकरितां राजांचीं सिंहासनें स्थापलेलीं असतात. रामराज्यांत एक मनुष्य अकालीं मरण्याबरोबर ह्या अपमृत्यूची जबाबदारी सर्व ऋषींनीं रामचंद्राचे माथी मारली, हें महाराजांस विदितच आहे. <अनाथांकडून बलात्कार मुकाट्यानें सोसला जातो किंवा हताश होऊन दुबळी प्रजा दुःखांतच दिवस काढीत गप्प बसते असें पाहून जर राजे लोक आपल्या कर्तव्यास जागेनासे झाले, तर त्यांच्या सिंहासनाच्या खालचा धर्माचा पाया त्यांना न कळत खचत जाऊन बोलतां बोलतां सिंहासन तिरपागडे झाल्यावांचून रहात नाहीं.> म्हणून महाराजांपाशीं माझी विनंति आहे कीं, दासींच्याहि मनाची प्रवृत्ति पातिव्रत्यभंगाकडे न होईल अशी खबरदारी घेणें, हें सरकारचें पवित्र कर्तव्य आहे. <प्रजेनें कितीहि मुकाट्यानें जुलूम सोसला तरी परमेश्वराचे दरबारांत त्या जुलमाच्या प्रायश्चित्तापासून राज्यकर्त्यांची सुटका होणें शक्य नाहीं.>

Ch. विरा०——कंकभटजी, हा धर्म मला कळतो पण प्रत्यक्ष व्यवहारांत वळत नाहीं.—धर्मबुद्धिबरोबरच स्वार्थबुद्धि मनुष्यांत उत्पन्न झालेली असल्यामुळें आणि मी राजा झालों तरी मनुष्यच असल्यामुळें, सैरंध्री मुकाट्यानें बलात्कारास बळी पडली तर कीचक महाराजांच्या हौसेकडे मी डोळेझांक केल्यावांचून रहाणार नाहीं, पण आज दोन प्रहरीं आमच्या वसंतबागेंत कीचक-महाराजांनीं ज्याप्रमाणें सैरंध्रीच्या निरीस हात घातला——(पडद्यांत—"पाप्या, चांडाळा, खबरदार माझा पदर धरलास तर—विराट महाराजांच्या दरबारांत माझी लाज कोण संभाळतो पाहूं दे.")

विरा०——हा कोणाचा शब्द ?

(कीचकानें सैरंध्रीचा पदर धरलेला आहे असे सैरंध्री व कीचक प्रवेश करतात.)

<ब्रिटिश राज्यकर्त्यांना [illegible] [illegible] सांगावयाचे आहे. जनतेस हे सरळ सरळ

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सैरं०—धर्मावतार विराट महाराज, ह्या गाईच्या लाजेचें ह्या दुष्ट लांडग्यापासून संरक्षण करा.

कीच०—ह्या बटकीची लाज कोण संभाळतो पाहूं दे.

विरा०—माझ्या दरबारांत–माझ्या समक्ष असलें वर्तन – मी नाहीं चालूं देणार.

गुरु० व पुरो०—(मिळून) काय हें राक्षसी कृत्य !

सुदे० व रत्न०—(मिळून) असलें पशुतुल्य पापाचरण !

कीच०—(सैरंध्री व कीचक ह्यांच्यामध्यें ओढाताण चालली असतां)—ह्या माझ्या कृत्याला पशुतुल्य पापाचरण म्हणा, राक्षसी कृत्य म्हणा, किंवा राजा विराट, तुझ्या डोळ्यादेखत झालेला हा तुझा अपमान समज. हा कीचक,–ह्या दरबारांत,–राजा, गुरु, पुरोहित व महाराणी ह्या सर्वांचे डोळे उघडे असतांना–ह्या सायंकाळचे वेळीं–सूर्य अस्तास जाण्यापूर्वीं दिवसा सृष्टीचें नियमन करणाऱ्या देवता शेवटची नजर पृथ्वीवर फेंकीत असतांना त्यांच्यासमोर –रात्रीच्या देवता उदयोन्मुख होऊन सृष्टीचा ताबा घेण्याकरितां पृथ्वीवर प्रारंभीची नजर फेंकीत असतांना त्यांच्याहि डोळ्यादेखत–हा कीचक–ह्या दरबारांत–ह्या सैरंध्रीचा पदर तिच्या अंगावरून जबरदस्तीनें ओढून काढून–आजच्या रात्रीं ही सैरंध्री खात्रीनें माझी रडी होणार, हें तिच्या अनुभवास आणून देणार.

सैरं०—दुष्टा, चांडाळा, पतिव्रतेचें सामर्थ्य किती असतें हें तुझ्या अनुभवास येण्याची वेळ आतांच आलीसें मला वाटतें—

कीच०—पांच नवऱ्यांची बायको द्रौपदी–तिची तूं दासी ! ह्या बाजारबसवी सैरंध्रीला पातिव्रत्याची घमेंड कशाला पाहिजे !

सैरं०—विराटमहाराज, ह्या गाईचें ह्या राक्षसापासून आपण संरक्षण केलें पाहिजे, नाहीं तर—

कीच०—काय, नाहीं तर काय–महाराज, आपण स्वस्थ बसावें–हिच्या ह्या पातिव्रत्याच्या ढंगाचा मला चमत्कारच बघावयाचा आहे.–नाहीं तर काय ?—बोल.

कंक०—कीचकमहाराज, सीता, मंदोदरी, सावित्री ह्या पतिव्रतांची उदाहरणें आठवन—

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

कीच०—अरे, जा, अशा पुष्कळ पतिव्रतांची नांवें मला माहीत आहेत. 'सुदेष्णा, रत्नप्रभा, मंदोदरी, सावित्री आणि सीता ह्या पांच कन्यांत आमचें हें रांडरूं पतिव्रता !'—अशी भीति दाखविणाऱ्यांना भीक घालणारा हा कीचक नव्हे–सैरंध्री, जगाच्या आरंभापासून आतांपर्यंत झालेल्या सर्व पतिव्रतांचें स्मरण कर, जगाच्या अंतापर्यंत पुढें होणाऱ्या सर्व पतिव्रतांच्या सामर्थ्यालाहि तुझ्या मदतीला बोलाव–पूर्वीच्या व पुढच्या सर्व पतिव्रतांच्या पुण्याईला पायाखालीं तुडवून तुला भ्रष्ट करण्यास हा कीचक समर्थ आहे, असें तुला–हा तुझा पदर–असा ओढून—

("हें काय, हें काय" असें म्हणत सर्व पुरुष कीचकाचे सभोंवतीं व "हिला सोडून देण्याची भीक आम्हांला घाला"असें म्हणून बायका सैरंध्रीच्या भोंवतीं रडत राहतात. "सैरंध्रीची लाज रक्षण करणारे यक्ष किन्नरहो, धांवा धांवा, ह्या राक्षसापासून मला सोडवा." असें सैरंध्री ओरडत राहते.)

कीच०—येऊं देत, यक्षकिन्नर म्हणवून घेणारे तुझें कोण कोण जार तुझ्या मदतीला यावयाचे असतील, ते येऊं देत.–दिवसा तुला नग्न पहाण्याची तुझ्या जारांची हौस जर आजपर्यंत कोणी पुरविली नसेल, तर कीचकाचा हा डावा हात त्यांचे डोळ्यांचें पारणें फेडल्यावांचून आतां रहाणार नाहीं.

सैर०—(कीचकाचे हाताला हिसका देऊन) राजा विराट, ह्या चांडाळाचा बंदोबस्त जर ह्याक्षणीं तुझ्या हातून झाला नाहीं तर माझें रक्षण करणारे यक्ष ह्या ठिकाणीं प्रगट होतील आणि तुझें हें पुरातन सिंहासन कीचकाच्या रक्तानें माखलें जाईल.

कंक०—राजा, सर्वांचा संहार न व्हावा असें जर तुझ्या मनांत असेल तर ह्या कीचकाला आवरून धर.–अधर्म अखेरीस सर्वांची पाळेमुळें खणून काढल्या-शिवाय रहाणार नाहीं.

(वरील कौंसांतील भाषणें वगैरे पुन्हां एकवार)

कीच०—या, सैरंध्रीच्या मदतीला धांवणारे यक्ष–किन्नर कोण येणार असाल ते लवकर या.

रत्न०—(कीचकाजवळ गुडघे टेंकून व कीचकाचे पाय धरून) महाराज, सर्व कुळाचा संहार करणारे हें अमानुष कृत्य–ह्या आपल्या विवाहित स्त्रीकडे

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

पाहून तरी,-आपण करू नका. महाराज, पूर्वीच्या पतिव्रतांच्या बद्दल आपल्या मनांत जरी आदर नसला, भावी पतिव्रतांबद्दल आपल्या मनांत पूज्यबुद्धि नसली, तरी ह्या गरीब दासीच्या-रत्नप्रभेच्या-आपणावरील निस्सीम प्रेमाविषयीं आपल्या थोर मनांत बिलकूल संशय नसून माझ्याविषयीं आपल्या मनांत निदान तिरस्कार नाहीं.-महाराज, आपण मजबरोबर प्रेमानें जो काळ घालविला असेल त्याची आठवण करा, ह्या गरीब दासीच्या हातून जी आपली सेवाचाकरी झाली असेल त्याचें स्मरण करा, आणि आपल्या ह्या अर्धांगीच्या पातिव्रत्याबद्दल मला भीक घाला कीं कोणाच्याहि स्त्रीची अशा रीतीनें अब्रू घेण्यास—

कीच०—जा, सैरंध्री जा, ह्या क्षणापुरतें तुला सोडून दिलें आहे.-ऊठ रत्नप्रभे ऊठ,-सवतीमत्सरानें तूं आपला डाव ह्यावेळीं जरी साधलास, तरी-ऊठ-ऊठ—

रत्न०—नाहीं, महाराज, नाहीं; सैरंध्रीच्या वाटस आपण कधींहि जाणार नाहीं, असें मला आश्वासन मिळाल्याशिवाय मी उठणार नाहीं.

कीच०—रत्नप्रभे, तुला कितीदां सांगितलें आहे, ह्या कामीं सवतीमत्सराचें कांहीं कारण नाहीं.-हा प्रश्न माझ्या इज्जतीचा आहे. माझी इज्जत राखण्या-साठीं-माझा शब्द खरा करण्यासाठीं मी काय पाहिजे तें करीन.-ऊठ, मुकाट्यानें ऊठ,-आज रात्रीं ही सैरंध्री माझी नाटकशाळा झालीच पाहिजे.

रत्न०—महाराज, हा हट्ट सोडून द्या.

कीच०—ऊठ, मुकाट्यानें ऊठ,-नाहीं ? नाहीं ? नाहीं ? सैरंध्री, पूर्वीच्याहि पतिव्रता तुझें रक्षण करणार नाहींत, पुढच्याहि पतिव्रता तुझें रक्षण करणार नाहींत, व सांप्रतच्या पतिव्रता तुझें रक्षण करणार नाहींत.-माझ्या पायांत अडकलेली ही लग्नाची बिडी अशी ताडकन् तोडून सैरंध्रीला ओढण्याची ह्या कीचकाच्या अंगांत शक्ति आहे.

(रत्नप्रभेला लाथाडून सैरंध्रीला धरावयास जातो. काय हा अविचार, काय हा अविचार, असें म्हणत पुरुष आडवे येतात. सुदेष्णा रत्नप्रभेला उठविते, रत्नप्रभा व सुदेष्णा दोघी मिळून "महाराज नका हो हें पाप करूं" असें म्हणत रहातात.)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

सैरं०—(सिंहासनाच्या मागें उभी राहून) विराट महाराज, आपल्या सिंहासनाचा आसरा घेऊन मी आपणास शरण आलें आहे,–आपल्या सिंहासनाची जी अब्रू तीच माझी अब्रू आहे. दोन्ही अब्रूंचें रक्षण करण्यास आपण समर्थ आहां.

कीच०—राजा विराट, माझा आपणाला एकच सवाल आहे. मी आपणास पाहिजे असेन तर ह्या सैरंध्रीला माझ्या ताब्यांत आतांच्या आतां दिली पाहिजे. जर ह्या क्षणीं सैरंध्रीला आपण माझ्या स्वाधीन केली नाहीं तर आपणास मी नको आहे असें मानून, सर्व अनुकीचक गोळा करून, आजच्या रात्रींचा अर्धा भाग–राजा विराट–तुझ्या सिंहासनाचा भंग करण्यांत खर्च करीन, व दुसऱ्या अर्ध्या भागांत ह्या सैरंध्रीच्या पातिव्रत्याचा भंग होईल.–राजा विराट, माझ्या बाहुबलानें स्थिर झालेलें हें तुझें सिंहासन उलथून पाडण्यास मला एक क्षणहि लागणार नाहीं, हें तुला माहीत आहेच.–राजा तुझ्या तोंडून निघणाऱ्या शद्बाची मी वाट पहात आहे.

सैरं०—महाराज, नीट विचार करून काय द्यावयाचें तें उत्तर द्या.– ह्या चांडाळाच्या हवालीं मला केल्यानें त्याच्या शरीराबरोबरच ह्याहि सिंहासनाचे तुकडे होतील, हें पक्कें लक्षांत ठेवा.–माझे पाठीराखे यक्ष किन्नर, कीचक व अनुकीचक ह्यांचाच केवळ समाचार घेऊन राहणार नाहींत, तर ह्या पापी कृत्याला जे जे संमति देतील त्यांचाहि संहार ते करतील.

विरा०—गुरु महाराज, पुरोहित महाराज, ह्या विकट प्रसंगीं मी राजा धृतराष्ट्राचें अनुकरण करणार.

गुरु व पुरो०—ह्या प्रसंगीं तसेंच करणें योग्य.

विरा०—कीचक महाराज, पांडव वनवासाला जाण्यापूर्वी द्रौपदीवस्त्र-हरणाचे वेळीं राजा धृतराष्ट्रानें जे हुकूम केले, तेच हुकूम मी आतां करीत आहे; व ते आपण सर्वांनीं मानलेच पाहिजेत.

कीच०—राजा, तुझे हुकूम जर योग्य असतील तर ते मी अलबत मान्य करीन.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

[विरा०---भरदरबारांत द्रौपदीचें वस्त्रहरण करण्याची धृतराष्ट्रानें मनाई केली, त्याप्रमाणें ह्या सैरंध्रीचें वस्त्रहरण करण्याची आम्ही तुम्हांस मनाई करीत आहों.–सुयोधन जसा धृतराष्ट्राला प्रिय त्याप्रमाणेंच आपणहि आम्हाला फार प्रिय असून आमच्या डोळ्यादेखत आपल्या हातून पापाचरण घडावें अशी आमची इच्छा नाहीं. तथापि एकाद्या दासीकरितां आपण व आम्हीं वैरी व्हावें हें इष्ट नसल्यामुळें आतांच्या आतां आम्ही ह्या सैरंध्रीला शहराबाहेर वनवासास पाठवून देतों.–आमचे दूत आतां हिला देवीवनांतील भैरवाचे देवालयांत सोडून येतील.–सैरंध्री, ह्या दरबारांत मी तुझी अब्रू राखिली आहे. तुझ्यासारख्या एखाद्या दासीसाठीं कीचकमहाराजांचा मी शत्रू होणें राजकाजास विघातक असल्यामुळें वनवासांत मजवर विसंबून न राहतां तूं आपल्या यक्ष किन्नरांचा धांवा कर.]

(पडदा पडतो)

अंक चवथा समाप्त.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

अंक पांचवा

प्रवेश पहिला.

स्थळ—जंगल. कंकभट व वल्लभ प्रवेश करितात.

कंक०—भीमा, नाइलाज होऊन कीचकवधाला मी संमति देतों खरा–परंतु—

वल्ल०—परंतु काय? –दादा, मला वाटतें, मी आणखी घटका दोन घटकांनीं कीचकाला मारून परत आल्यावरहि तुमचें परंतु शिल्लक राहील.–दादा,कीचकाला गुपचिप मारण्याची आयती संधि मिळाल्यानें मला कसा आनंद होतो आहे; आणि तुम्ही आपले उद्विग्न आणि खिन्न !

कंक०—असें आहे खरें.–काय होईल–कसें होईल–आमच्या हातून कांहीं पातक होते आहे किंवा काय–ज्ञानवृद्ध ऋषींनीं आंखून ठेवलेल्या पुण्य मार्गापासून आम्ही दूरदूर जातों आहों किंवा कसें–असे विचार मनांत येत चालले म्हणजे मन अधिक अधिक उदास होत जातें; आणि जगांतील ह्या उलाढालींचा कंटाळा येऊन द्यूतांतील पैजेमध्यें जन्मभर अरण्यवास माझ्या कपाळीं सुयोधनानें कां मारला नाहीं, असें मला वाटूं लागतें !

वल्ल०—अरण्यांत जन्म कंठून, पृथ्वीला दुर्योधनाच्या दुष्ट बुद्धीच्या ताब्यांत देण्याचा पापी व भित्रा हेका जर महाराजांना चालवावयाचा असेल, तर कीचकाला गुप्तपणानें तरी कशाला मारायला पाहिजे? भर दिवसा चवाठ्यावर कीचकाला मी मारतों, मग आपण सर्वजण प्रगट होऊ आणि जाऊ वनवासाला.

कंक०—भीमा, अविचारानें व आडदांडपणानें फजीत व पराभूत होऊन वनाकडे जाण्याची माझी इच्छा नाहीं. वनवासांत असतांना जी धर्मबुद्धि आम्हां पांडवांत जागृत होती, त्याच धर्मबुद्धीचें वळण संसारांतील लोकांना लावण्याची संधि मिळावी म्हणून इंद्रप्रस्थाचे सिंहासनावर पुन्हा बसण्याची माझी इच्छा आहे.–ही पांडवांची सात्विक महत्वाकांक्षा एकाच व्रताच्या साधनानें पुरी होणार आहे.

कंकभट - भारताची डाव प्रवृत्ती, आराखडा न मांडता मवाळ धोरणाने ते साधत लेकरा असे

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

वल्ल०—कोणचें तें व्रत ?

ch कंक०—लोभाला किंवा क्रोधाला बळी पडून अधर्म करण्यास प्रवृत्त न होणें. पांडवांची सात्विक महत्वाकांक्षा

वल्ल०—दरबारांतला सायंकाळचा प्रकार पाहिल्यावरहि कीचकवध हा अधर्म आहे, असें महाराज, आपल्याला वाटते काय ?—रत्नप्रभेच्या विनंतीनें, सुदेष्णेच्या सांगण्यानें, किंवा विराटाच्या भीतीनें कीचक ताळ्यावर येईल, असें महाराज, आपल्याला अद्याप वाटतें तरी कसें ?—कीचक विराटाला भितो, का विराट कीचकाला भितो, ह्याविषयीं दादा, आपले मनांत अद्याप शंका आहे काय ?

कंक०—केवळ कीचकाकडे पाहिलें म्हणजे कीचकवधांत अधर्म होत आहेसें मला वाटत नाहीं; पण—

वल्ल०—पुन्हां पण ?—पण–पण–पण—

कंक०—पण भीमा, असें आहे, आपण आज कित्येक महिने राजा विराटच्या आश्रयानें राहिलो आहों. तेव्हां कीचकवधामुळें राजा विराटाच्या ह्या मत्स्य-देशाची शक्ति लंगडी झाल्यानें राजा विराटाचें मन उदास नाहीं का व्हावयाचें ?

वल्ल०—दादा, ज्या आमच्या शक्तीनें कीचक मारला जाईल, तीच शक्ति पुढें विराट राजाचे उपयोगी नाहीं का पडावयाची ?—दादा, मला माहीत आहे, कीचकाचा वध मी आज रात्रीं केल्यावर त्रिगर्तांना मत्स्यदेशाचें भय रहाणार नाहीं. मग त्रिगर्त आणि कौरव एक होऊन मत्स्यदेशावर स्वारी करतील. पण दादा, त्यावेळीं आम्ही पांडवच त्रिगर्तांना व कौरवांना मागें परतवून लावू ! असें झाल्यावर कीचकवधाची आठवण विसरून राजा विराट पांडवांवर पूर्ण प्रेम नाहींका करूं लागणार ?

कंक०—असें होईल खरें; पण भीमा, कीचकाला न मारतांहि राजा विराटाचे प्रेमास जर पांडव पात्र झाले, तर अधिक चांगलें होईल.—भीमा, कीचक कर्ता असून अत्यंत उन्मत्त आहे, आणि अशा पुरुषांना मऊ पाडण्याचा एकच उपाय आहे. त्यांच्याहून श्रेष्ठ अशी शक्ति त्यांना दाखविली म्हणजे—ते मूळचे धर्मभीरु असल्यास—आपोआप सन्मार्गाला लागतात. भीमा, तुझी प्रचंड शक्ति कीचकाला दाखीव आणि नंतर पांडवांचा पक्षाभिमानी होण्याबद्दल त्याला विनंति कर.

भीम - जहाल[illegible] माणसांचे प्रतीक
[illegible] बादाय सोटयाने, [illegible] तोंड देणारा

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

वल्ल०——तें सर्व मी करतो.–दादा, आतां मला जाऊं द्या. ह्या वाटाघाटीनें भैरवाच्या मंदिरांत पोंहोंचण्यास मला उशीर होईल.

कंक०——जा, लवकर जा,–सर्व देवता ह्या वेळीं तुला आपलें बळ देवोत. पण–भीमा, ह्या बळाचा उपयोग कीचक शेवटीं ताळ्यावर येत असतां त्याला मुद्दाम म्हणून मारण्याकडे करूं नको.

वल्ल०——नाहीं दादा, तसा अधर्म माझ्या हातून होणार नाहीं. (जातो.)

कंक०——परमेश्वरा, कीचकाला मल्लयुद्धांत पराभूत करून प्राणघात करण्याच्या इराद्यानें भीम कीचकाच्या उरावर बसला असतां, मानापमानाच्या खोट्या कल्पनेचा पगडा कीचकाच्या मनावर बसू देऊ नको, व कीचक पांडवांचा पक्षपाती होऊन विराट नगरींतील पांडवांचा अज्ञातवास पांडवांना शांतिदायक व विराट राजाला कीर्तिदायक कर. (जातो.)

प्रवेश दुसरा

स्थळ——कीचकाचे महालापुढील पटांगण. कीचक, चंचला व चपला प्रवेश करितात.

कीच०——चपले, हें माझें धनुष्य आंत नेऊन ठेव, हा भाताहि घे.

चप०——मग काय महाराज, गदा आणून देऊं का ?

कीच०——नको, गदेची जरूर नाहीं. जा, आणि असें पहा, हा महाशंखहि नको. हाहि नेऊन ठेव.

चप०——महाराज, शस्त्रास्त्रेंहि बरोबर नेणार नाहीं, तर कवच–कुंडलें तरी आणून देऊं का ?

कीच०——नको, कांहीं नको, जा तूं. (चपला धनुष्यबाण घेऊन जाते) चंचले, हे खड्ग नेऊन ठेव. हेंहि बरोबर मला नको.–हें पहा, सारथ्यानें रथ कां अद्याप आणला नाहीं, त्याची चौकशी कर. मी ह्या पटांगणांत केव्हांचा उभा आहे.–खड्ग नेऊन ठेव आणि रथाची चौकशी कर. (चंचला जाऊं लागते) ए चंचले, इकडे ये, सैरंध्रीला देवीवनांत पोहोंचविल्याबद्दल वर्दी आली कीं नाहीं, त्याचा अगोदर पहारेकऱ्यापाशीं तपास कर.

[illegible]

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

चंच०—हें काय महाराज, सरकार महालांत असतांनाच सैरंध्रीला वनांत पोंचविल्याबद्दल पहारेकऱ्यांनीं वर्दी दिली, आणि नंतरच महाराजांनीं सारथ्याला रथ सिद्ध करावयास हुकूम केला !

कीच०—हो मी विसरून गेलों ! देवीवनांत भैरवाच्या देवालयांत सैरंध्रीला केव्हां प्रेमालिंगन देईन असें मला होऊन गेल्यामुळें आठवण राहिली नाहीं.–जा खड्ग ठेऊन रथाची चवकशी कर. (चंचला जाऊं लागते.) चंचले, जरा परत ये.–हें पहा, पलंगावर माझ्याकरितां आणि तुझ्या यजमानणीकरितां गुंफलेले हार ठेवलेले असतील ते घेऊन ये.

चंच०—आज्ञा महाराज, (जाऊं लागून व पुन्हा परतून) पण महाराज, त्यांनीं ताकीद दिली, तर मी काय करूं ?

कीच०—चंचले, तुझा स्वभावच रडका !–असें झालें–तसें झालें–तर मी काय करूं ? रडत बैस. रिकामी भीति मनांत आणायची, आणि दुःख करीत बसायचें ! जा, मुकाट्यानें हार घेऊन ये. (चंचला जाते.) सैरंध्रीला भेटायला निघतांना उगीच वेड्यासारखा शस्त्रास्त्रें घेऊन निघालों होतों. सैरंध्रीसारख्या मानी बायकांचा एकांतात एकदां हात धरला म्हणजे माझ्यासार-सारख्या प्रतापी पुरुषांशीं तिला फुलांच्या हारांनीं गच्च बांधून टाकलें पाहिजे. (चंचला परत येते.) का, अर्ध्या वाटेंतूनच परत आलीस ! मोठी अपशकुनी ! केव्हां कोणतें काम सांगितलें, आणि वांकडे तोंड न करतां–आढेवेढे घेतल्या-शिवाय–ह्या रडक्या पोरीनें तें केलें, असें व्हावयाचेंच नाहीं !–काय रडूबाई. आतां कोणचें रडें रडणार ? सांगा, हं सांगा.

चंच०—महाराज, माझ्या मनांत मघाशीं उगीच नाहीं शंका आली. त्या पहा राणीसाहेब इकडेच येताहेत. मग मी हार कसे घेऊन येऊं ?

कीच०—रडकी ती रडकी.–तुझ्यांत उत्साह म्हणून कसा तो नाहींच.–चंचले ती जर इकडे आली, तर तुझें बरेंच झालें. पलंगाजवळ जा आणि हार परस्पर रथांत नेऊन टाक.–जा आतां तोंड नको वाकडें—

चंच०—पण आतां महाराजांना महाराणीसाहेब बाहेर तरी जाऊं देतील का ?

कीच०—तुला कोणी ही उठाठेव सांगितली ? जा–एकदम जा.—मोठी

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

अपशकुनी बोवा ! (चंचला जाते व रत्नप्रभा येते.) महाराणीसाहेब, रात्रीं अपरात्रीं महालांतून बाहेर पडण्याची ह्या कोमल चरणकमलांना तसदी देण्याची कां खुशी झाली ?—विनंति केल्याची कसूर दयाळू अंतःकरणानें माफ करून, हुकूम काय आहे तो सांगण्याची सरकारनीं मेहेरबानी करावी; दास सेवेला तत्पर आहे.

रत्न०—महाराज, ह्या आपल्या गरीब दासीला आपण कितीहि झिडकारून दूर केलें–कुठें, कसें, लाथाडलेंत–तरी आपणावरील निष्कपट प्रेमामुळें–रात्र अपरात्र न पहातां–ही दासी वारंवार ह्या पायापाशीं विनंति करणारच.

कीच०—(गुडघे टेकून) सुंदरी, लाडके, मला आज्ञा करण्यापूर्वी एक प्रहर दीड प्रहराची मला फुरसत दे. (उठून) एवढ्या अवधींत तुझ्या पायांवर लोटांगणें घालण्याकरितां सैरंध्रीला घेऊन येतों.

रत्न०—महाराज, आपल्या मनाला दुःख होईल, तेव्हां आपण जें कृत्य करण्यास निघालां आहां तें वाईट आहे, असें मी कसें म्हणूं ? महाराजांना नांवें ठेवण्याची माझी योग्यता नाहीं. पण महाराज, (कीचकाचे अंगावर पडून) आपले वाडवडिल मोठे सद्‌गुणी, पापभीरु, व धर्मनिष्ठ होते, अशी ह्या मत्स्यदेशांत आपल्या घराण्याची ख्याती आहे. त्या पुण्यश्लोक पूर्वजांच्या कीर्तीची महाराजांना ह्या वेळीं ह्या दासीनें आठवण करून दिली, तर महा-राजांच्या जीवाला कष्ट होणार नाहींत ना ?—खुद्द प्राणनाथांचें आजपर्यंतचें चरित्र किती तरी बाई शुद्ध आहे !—महाराज, ती पापी प्रतिज्ञा पुरी करण्याचा हट्ट धरून कीचकानुकीचकांच्या कुलांना कलंक लावून आपला व आपल्या घराण्याचा नाश करायला प्रवृत्त होऊं नका.

कीच०—(स्वतःस सोडवून घेऊन तिला दूर सारून) रत्नप्रभे, तुझ्या नवऱ्याच्या मनांत मानापमानाचे–इज्जतबेइज्जतचे–कोणचे विचार घोळत असतात, याची तुला कल्पनाहि नसावी, हें माझें दुर्दैव होय.–बायका नुसत्या सुंदर, प्रेमळ, आणि विवेकी असून भागत नाहीं. नवऱ्याच्या मानानें नवऱ्याचा मानापमान समजण्याची त्यांच्या अंगीं जर बुद्धिमत्ता नसेल तर, प्रतापी व महत्वाकांक्षी पुरुषांचा संसार असल्या बायकांच्या सहवासानें दुःखमय होतो; हा विद्वानांचा सिद्धांत, रत्नप्रभे, तूं आपल्या वर्तनानें ह्या वेळीं खरा करून दाखवीत आहेस.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

रत्न०——महाराज, मी बुद्धिहीन तर खरीच, पण पदरीं पडून पवित्र झालें आहे, म्हणून या पायांपाशीं विनंति करतें. कैलास पर्वताला बाहुबलानें डोलायला लावणारा—आणि स्वतःच्या सामर्थ्यानें तेहतीस कोटी देवांना बंदींत टाकून घरचीं झाडलोटीचीं कामें सर्व देवांना करायला लावणारा——चौदा चौकडचांचा राजा रावण स्वतःच्या प्रतापासंबंधाच्या–मानापमानासंबंधाच्या–इज्जतबेइज्जतसंबंधाच्या–चुकीच्या कल्पनेला बळी पडला.–त्याच्या दृष्टीनें क्षुल्लक दिसणाऱ्या मानवस्त्रीला त्यानें पळवून नेली. मंदोदरीपेक्षां सीता त्याला विशेष सुंदर दिसत होती असें नाहीं; आणि त्या महासाध्वी मंदोदरीवरचें त्याचें प्रेम सीतेला लंकेंत नेली म्हणून कमीहि झालें नव्हतें. पण सीतेला सोडून दिल्यानें आपला लौकीक जातो एवढचाच हट्टानें रामाशीं युद्ध करण्याकरितां रावण बाहेर पडला.—महाराज मी अज्ञानी आहें; या पायापाशीं विनंति कशी करावी हें समजण्याइतकी मला बुद्धि नाहीं. तथापि आपल्यावरील निष्कपट प्रेमामुळें विनंति करण्याचें धाडस करत्यें. युद्धाला निघण्यापूर्वी सीतेला सोडून देण्याविषयीं मंदोदरीनें रावणाला केलेली शेवटची विनंति रामकथेंत आतांच मी नुकती महालांत वाचीत होतें. येथें थोडा वेळ उभें रहावयाचें होतें. तेवढी पोथी आणतें आणि महाराजांना मंदोदरीची विनंति वाचून दाखवितें. इकडून जर ती विनंति ऐकण्याचें झालें, तर इकडचें मन बदलल्याशिवाय रहाणार नाहीं, अशी माझी खात्री आहे.

कीच०—जा; तुझीं पोथ्या पुस्तकें असतील नसतील तीं सर्व घेऊन ये. सगळचा पोथ्या चाळून तुझी खात्री करून देतों कीं, हा कीचक सवाई रावण असून त्या सैरंध्रीला सीतेच्या पायाच्या धुळीचीहि योग्यता नाहीं. जा, सगळचा पोथ्या घेऊन ये, एकहि पोथी मागें ठेवूं नकोस, म्हणजे एकदाची माझ्या मागची ही पोथ्या पुस्तकांची पिरपिर कायमची तरी सुटेल ! (रत्नप्रभा जाते) वेडे रत्नप्रभे, एकदां हा शद्ब तर एकदां तो शद्ब अशा रीतीनें क्षणाक्षणाला आपलें वचन बदलणाऱ्या आणि बोलण्यांत बोलवणें नाहीं असें बदनाम झाल्यामुळें दुतोंडचा इतकेंच नव्हे तर दहा तोंडचा म्हणून लोकांनीं नांव ठेविलेल्या रावणावरहि मंदोदरीच्या ज्या उपदेशाचा कांहीं परिणाम झाला नाहीं, त्याच उपदेशानें ह्या एकवचनी कीचकाचा शद्ब फिरेल असें तुला वाटतें तरी कसें ? वेडगळ खरी वेडगळ !——आकाशांतून मनुष्याकडे पाहून मानवदोषांची

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

आपआपसांत निंदा करण्याकरितां देवता नेहमींच डोळे मिचकावीत असतात; आणि आतां तर, रत्नप्रभे, आकाशांत चमकणारे हे तारे–देवतांचे हे डोळे– तुझा वेंडगळपणा पाहून देवता फारच निर्भर्त्सना करीत आहेत हें दाखविण्या-करितां विशेषच लिकलिकूं लागले आहेत. (चंचला येते)

चंच०––सरकार, हार रथांत नेऊन ठेवले असून सारथ्यानें रथ तयार केला आहे.

वज्रच०––चंचले, मघाशीं तूं माझ्या कामाला अपशकून केला होतास, पण ह्या वेळीं तूं रत्नप्रभेला अपशकून केलास म्हणून तुला हें बक्षिस घे. (कंठा देतो) तुझी यजमाणीन महालांतून येथें परत येण्यापूर्वीच मी येथून चालता होणार. ती येथें आल्यावर तिला सांग, कीं तिनें आणलेल्या पोथ्यापुस्तकांतून तिच्याविरूद्ध निरनिराळीं वचनें तिला दाखवून तशा रीतीनें तिची समजूत घालीत बसण्यापेक्षां प्रहरा दीड प्रहरांत प्रत्यक्ष कृतीनेंच तिची मी खात्री करून देणार असल्यामुळें देवीवनांत सैरंध्रीचें हरण करण्याकरितां मी निघून गेलों,—चल मला रथाकडे घेऊन चल.

चंच०––असें,–असें–यावें महाराज. (जातात).

प्रवेश तिसरा

स्थळ––देवीवनांतील भैरवाचें देवालय. सैरंध्री मूर्च्छित पडली आहे.

सैरं०––(शुद्धीवर येऊन) गेले वाटतें सर्व चांडाळ, मला एकटीला येथें टाकून निघून गेले !––मी किती वेळ मूर्च्छित होतें बरें ?––या देवळांत भैरवाशिवाय दुसरे कोणी नाहींना ?––द्रौपदी काय ही तुझी स्थिति ! त्या दुष्ट दु:शासनानें भर दरबारांत माझी अब्रू घेण्याचा प्रयत्न केला,आणि दैवी चमत्कारा-नंतर शुद्धीवर येऊन धृतराष्ट्र मामंजींनीं मला वनवासाला धाडून दिलें, त्यावेळीं पांडवांची ही भार्या वनांत एकटी तरी नव्हती.––आज माझा पदर ओढणाऱ्या कीचकाला दरबारांत विराट महाराजांनीं थांबवून धरलें खरे, पण डोळ्यांवर कातडें ओढून, मला एकटीला वनवासांत पाठवून, कीचकाला मी वळीं पडावें अशी व्यवस्था त्यांनीं केली !––जरासंध, बकासूर, किर्मिर वगैरे दैत्यांना मारणारे भीम महाराज माझें रक्षण करण्यास वनांत यावयास चुकणार नाहींत,

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

या आशेनें विराटाचे दूत मला वनांत आणीत असतां मी हंबरडा फोडला नाहीं.–पण आतां वनांत–हा कोणाच्या पावलांचा आवाज दुमदुमत आहे–चाहूल जवळ येत चालल्यासारखी दिसते–तो–चांडाळ–कीचक तर येत नसेलना ! (उठून ऐकल्यासारखें करून) हा त्या चांडाळाच्या पावलांचा आवाजच नव्हे !––ह्या आवाजावरून––चालतांना प्रत्येक पावलासरशी पृथ्वीला वाकायला लावणारे––वीररसाची मूर्ति––माझें प्राणनाथ––पुन्हा आवाज जरा पलीकडे गेला !––वाट चुकून दुसरीकडेच जातील––मोठ्यानें हांका मारल्या पाहिजेत––विश्वांतील सर्व मल्लांमध्यें श्रेष्ठ, गदाधरांचे अग्रणी, शौर्याचे प्रवर्तक––रणभूमीवरील प्रत्यक्ष भैरव–माझे प्राणनाथ––

(गळ्यांत हार घातलेला कीचक प्रवेश करितो)

कीच०––(हार पुढें करून) हा प्रेमाचा हार घालण्याकरितां––

सैरं०––(हार फेंकून देऊन) राक्षसा, इतका वेळ ज्या ठिकाणीं लपून होतास त्याच ठिकाणीं जाऊन बैस.–काय ? तुला ह्या पावलांचा आवाज ऐकूं येत नाहीं ?–तुझ्यासारख्या हलकट पाप्यांचा संहार करण्याकरितां अवतरलेले माझे प्राणनाथ––

कीच०––आतां ह्या वीराशिवाय दुसरा कोण तुझा प्राणनाथ आहे ?––बायाबापड्यांच्या देखत यक्षकिन्नरांच्या गोष्टी सांगून सुदेष्णेला आणि रत्न-प्रभेला भीति घातलीस, त्या वेळीं तुझी युक्ती साधली. पण आतां ह्या भैरवाला साक्षी ठेवून–साक्षी काय करावयाचा–हा भैरव म्हणजे माझा बिछाना साफ करणारा पानदानावरील माझा हुजऱ्या आहे असें समजून––

सैरं०––दुष्टा, देवांची अशी निर्भत्सना करतोस ?

कीच०––माझ्याशिवाय ह्या विश्वांत दुसरा कोणीहि श्रेष्ठ नाहीं. मी प्रथम आणि मग देवबिव सर्व मागाहून.–सैरंध्री, देवांचा देव मी आहे.––राजांचा राजा मी आहे.– जगांतील सर्व सुंदर तरुणींचा भोक्ता मी आहे असें मानून माझ्या गळ्यांतला हा हार तुझ्या गळ्यांत घालण्यास मला परवानगी––

(हार गळ्यांतून काढून तिच्या गळ्यांत घालूं लागतो.)

सैरं०––(हाराला झिटकारून) दूर हो, चांडाळा, तुझी वेळ भरत आली.–मृत्यूच्या मुखांत आपण होऊन पडूं नकोस.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

कीच०—(तिचा हात धरून) हा हट्ट आतां पुरे–तुझी इच्छा असो वा नसो, तुला येथून उचलून नेऊन रथांत घालून माझ्या मंदिरांत आतांचे आतां नेऊन ठेवतो. (ओढूं लागतो).

सैरं०—प्राणनाथ, धांवा, धांवा, हा चांडाळ कीचक–ह्या द्रौपदीची अब्रू— (स्वतःस सोडवून घेते).

कीच०—काय तूं द्रौपदी आहेस ?–वाः फारच उत्तम झालें. जी गोष्ट सुयोधनाच्या हातून सिद्धीस गेली नाहीं, ती मी आज शेवटास नेतो.—द्रौपदी, कौरवेश्वर व पांडव ह्यांच्या युद्धानंतर–तूं माझी नाटकशाळा व्हायची, ती ह्या क्षणालाच होणार.‹तरी मला वाटलेंच होतें कीं, तूं फार मोठ्या कुलांतली असावीस म्हणून, कारण माझ्यासारख्या श्रेष्ठ धनुर्धराचें मन एखाद्या क्षुल्लक सैरंध्रीवर कसें बसेल ?›

सैरं०—हे अर्जून कसे येत नाहींत !—प्राणनाथ भीम महाराज, धांवा हो धांवा.

कीच०—द्रौपदी, तुझे यक्षकिन्नर कोण तें मी आतां समजलों; तुझी वेणी कां घातलेली नसते, हें माझ्या ध्यानांत आलें.–द्रौपदी, कौरवांशीं लढून दुःशासनाच्या रक्तानें भिजलेल्या हातांनीं भीम तुझी वेणी घालील असें मनांत देखील आणूं नकोस; माझ्याशीं विलास करण्यापूर्वीं माझ्या हातांनीं मला तुझी वेणी घालूंदे.

सैरं०—प्राणनाथ भीम महाराज, धांवा हो धांवा.

कीच०—द्रौपदी, तूं माझी नाटकशाळा होणार हें ब्रम्हदेवानें तुझ्या व माझ्या ललाटीं स्पष्ट अक्षरांनीं लिहून ठेविलें आहे.—तूं ह्या वेळीं आपखुशीनें माझी प्रियतमा हो, आणि माझा पराक्रम पहा. शहरांत जाऊन, मत्स्यनगरींत गुप्तपणानें राहणाऱ्या पांडवांशीं एकट्यानें युद्ध करून, तुझ्या स्वयंवराचेवेळीं गैरहजर राहण्याच्या माझ्या चुकीची भरपाई म्हणून पांचहि पांडवांचीं शिरे उद्यां सकाळीं–मी तुझ्या–माझ्या ह्या प्रियतमेच्या–चरणयुगुलांवर अर्पण करीन.

सैरं०—दुष्टा, राक्षसा, तुझें शीर ह्या भैरवाचे पायांवर अर्पण केलेलें पाहिल्याशिवाय ही द्रौपदी ह्या मंदिरांतून बाहेर पडावयाची नाहीं, हें पक्के समज. (भैरवाचे जवळ जाऊन) भैरव महाराज, ह्या पाप्याचा बळी घेऊन ह्या दीन गाईला ह्या संकटांतून सोडवा.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

कीच०—द्रौपदी, माझ्या ताब्यांतून तुला सोडविण्याची ह्या भैरवाची काय प्राज्ञा आहे ?—प्यारी, माझ्या शक्तीचा आतांच चमत्कार पहावयाचा असल्यास मला आज्ञा कर; डाव्या हातानें ह्याची शेंडी धरतो, आणि उजव्या हातानें एक बुक्की ह्याच्या छाताडावर मारून ह्याच्या धडाचें चूर्ण करून, निराधार झालेलें ह्या भैरवाचें शीर तुझ्या पायावर वाहतों.

सैरं०—चांडाळा–नराधमा–पाप्या–राक्षसा—

कीच०—द्रौपदी, कोणाला ह्या शिव्या देत आहेस ? तोंड संभाळून बोल, नाहीं तर—

सैरं०—(भैरवाचे एका बाजूला उभी राहून) दुष्टा नाहीं तर काय रे ? ह्या ठिकाणीं जर कोणी माझ्या मदतीला आलें नाहीं तरी मी एकटी तुला शिक्षा करण्यास समर्थ आहे.

कीच०—(भैरवाचे दुसऱ्या बाजूस चवताळून उभा राहून) द्रौपदी, बऱ्या बोलानें माझ्या म्हणण्यास रुकार दे—

सैरं०—भीम महाराज, धांवा हो धांवा, प्राणनाथ भीम महाराज—

कीच०—बोलाव, अर्जुनाला बोलाव–भीमाला बोलाव,–अर्जून येऊं दे, भीम येऊं दे, शक्तीबद्दलच्या सर्व पांडवांच्या घमेंडीबरोबर पातिव्रत्याच्या तुझ्या वल्गना लयाला नेण्याची वेळ जवळ आली म्हणून समज.

सैरं०—धांवा हो धांवा, प्राणनाथ भीम महाराज धांवा.

कीच०—द्रौपदी, मत्स्यभेद करणारा व हिमाचलावर तपश्चर्या करून प्रत्यक्ष शंकरापासून अस्त्रविद्या शिकून आलेला तो सव्यसाची अर्जुन जरी ह्या क्षणीं येथें येऊन ठाकला, तरी एक लाथेसरशी त्याचा प्राण घेऊन, त्याच्या बाणांच्या भात्याला तुझ्या व माझ्या ह्या ठिकाणच्या विलासशय्येवरील उशी केल्यावांचून मी राहणार नाहीं. सहस्त्रनागांची शक्ति असलेला तुझा तो आवडतमा भीम जरी येथें ह्या वेळीं प्रगट झाला, तरी त्या घमेंडखोराच्या रक्तानें भिजलेल्या माझ्या ह्या हातांनीं तुझ्या चोळीची गांठ सोडल्यावांचून मी राहणार नाहीं.–द्रौपदी, माझ्या प्रचंड शक्तीचा तुला प्रत्यय यावा म्हणून एका बुक्कीसरशीं ह्या फत्तराचें पीठ करून दाखवितो. (बुक्की भैरवाच्या छातीजवळ नेतो, भैरव एका हातानें कीचकाचें मनगट धरून दुसऱ्या हातानें त्याची मान धरून त्याला पुढें खेचीत आणितो.)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

भीम०---कीचका, घुंघुटर्या, तुझी छाती असली तर, ह्या भीमाकडे पहा. वल्लभ म्हणतात तो हा मी–भीम म्हणतात तो हा मी–तुझ्या मानगुटीवर वसून तुझ्या नरडीचीं हाडें फोडण्याला तयार आहें. चांडाळा, तुझ्या काय काय प्रतिज्ञा आहेत त्यांचा उच्चार तरी कर पाहूं, एकादा शद्ब तुझ्या तोंडून निघतो न निघतो तोंच तुला यमसदनाला पाठवितों.

कीच०---(स्वत:स सोडवून घेऊन) तूं भैरव ऐस किंवा भीम ऐस, तुझ्याशीं मल्लयुद्ध करायला मी तयार आहें.–तूं जर भीम असलास, तर युद्धांत तुला जिंकतों; आणि तुझ्या छातीवर मी मारलेल्या लाथेनें तुझ्या हृदयांतून निघणाऱ्या रक्तांत भिजलेल्या ह्या प्रतापी हातांनीं द्रौपदीची वेणी बळजोरीनें घालीत असतांना तुझी प्रतिज्ञा अशा रीतीनें शेवटास नेणाऱ्या ह्या कीचकाकडे डोळयांतून निघून जाऊं लागलेल्या तुझ्या प्राणांना अखेरीस पहावयास लावतों. चल, मल्लयुद्धास तयार हो.

भीम०---(त्याचा हात धरून त्याला खालीं पाडून उरावर बसून)—गर्दभा, तूं काय माझ्या बरोबरीचा म्हणून तुझ्याशीं युद्ध करीत बसूं ? एक बुक्की तुझ्या छातीवर मारतो आणि देतों तुला टाकून गिधाडांच्या पुढें.—रत्नप्रभेकडे व विराटाकडे लक्ष देऊन एका अटीवर पाहिजे तर तुला जीवदान देण्याविषयीं धर्मराजांची मला आज्ञा आहे. वनवासांत जयद्रथानें द्रौपदीवर वलात्कार करण्याचा प्रयत्न केला; त्या वेळीं त्याचे तीन पाट काढून गाढवावरून त्याची धिंड काढून द्रौपदीचा गुलाम असें त्याच्या तोंडून वदवून, मग धर्मराजांनीं त्याला जीवदान दिलें. त्याप्रमाणें सैरंध्रीच्या यक्षकिन्नरांनीं मला गुलाम करून तीन पाट काढून जीवदान दिलें, असें विराटाच्या दरबारांत जाहीर करण्याला जर तूं नरपशो, तयार असलास, आणि आमचे अज्ञातवासाचें दिवस संपेतोंपर्यंत आमच्याविषयीं मौन व्रत धरावयास जर कवूल असलास, तर कीचका, रत्नप्रभेकरितां व विराटाकरितां---धर्मराजाच्या आज्ञेनें—तुला जिवंत सोडतो.

सैरं०—कीचका, बायकोच्या सद्‌गुणांमुळें तुझा प्राण वांचला ह्यावद्दल वाईट वाटून घेऊं नकोस.–रत्नप्रभेकरितां तुला जीवदान देण्यास माझी ना नाहीं.

कीच०–<जिवंत राहून द्रौपदीचा गुलाम होण्यापेक्षां युद्ध करून जिवंत राहिलों, तर द्रौपदीला माझ्या रंगमहालांत ठेवीन.> म[illegible]

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

भीम०—आपला रंगमहाल आतां गिधाडांच्या वस्तींत.

कीच०—खरा क्षत्रीय असशील तर गदायुद्ध—

भीम०—गदायुद्ध ? आतां काय म्हणून गदायुद्ध ?—ज्या चिलटाचा चिटकी वाजवून प्राण घ्यावयाचा त्याच्याकरितां कोण गदा आणीत बसतों ! —धर्मराज, जित्याची खोड मेल्याशिवाय जावयाची नाहीं.–द्रौपदी, कीचक-वधाशिवाय पांडवांना गत्यंतर नसल्यामुळें मी ह्याला आतां यमसदनास पाठवितों. (छातींत बुक्की मारतो. कीचक मरून पडतो.) चल, द्रौपदी, ह्या वनांतून शहरांत जाऊं व धर्मराजांचें दर्शन घेऊन पुढें काय करावयाचें तें ठरवूं.

सैरं०—पण प्राणनाथ, आपण येथें केव्हां आलात, तें अगोदर सांगायचें होतें.

भीम०—कीचकवधासंबंधानें धर्मराजांची शेवटची आज्ञा ऐकून मी वनाकडे आलो. वनांत कोणी निशाचरानें चुकून मला पाहिलें तर दैवी चमत्कारानें कीचक मारला गेला असें त्याला वाटावें म्हणून वनाजवळ येतांच मी भैरवाचें सोंग घेतलें.–इतक्यांत रथांत किरीट वगैरे फेकून देऊन सडसर्डीत होऊन जंगलांत घाईघाईनें शिरतांना कीचकाला मी पाहिलें. तेव्हां जलदीनें पुढें येऊन तूं मूर्च्छित असतांनाच भैरवाला उचलून आंत ठेऊन (भैरवाची मूर्ति आंतून आणतो) ह्याच्या जागीं मी उभा राहिलो व जीवदानास कीचक सत्पात्र आहे किंवा कसें, ह्यासंबंधानें धर्मराजांनीं सांगितल्याप्रमाणें त्याची परीक्षा करण्याकरतां तुम्हां दोघांचा संवाद ऐकत होतों. (भैरवाची स्थापना करून) द्रौपदी, ह्या भैरवाला नमस्कार कर. (दोघेहि नमस्कार करतात.) हा प्रसाद ललाटाला लाव. (दोघेहि शेंदूर कपाळाला लावतात.) चल, द्रौपदी, धर्मराजाला ही सर्व हकीकत कळवूं. (जातात).

अंक पांचवा समाप्त.

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)

Digitization by American Academy of Indic Studies. AAIS(USA)